२५६ म. ग्रं. सं. ठाणें

विषय
निबंध

लेखक गणेश त्र्यंबक देशपांडे

सन

संग्रहालय क्रमांक
39
२५६

पुस्तकाचें नांव माझी समजूत

39

सं. क्र.

# माझी समजूत

निबंध

ग्रं. सं. ठाणें
२५५५
1883

# ...मजूत.

...रणा

...संग्रहा...

पुस्तक

गणेश व्यंकटेश काणे

हलीं मुक्काम आपटें, तालुका पनवेल,

जिल्हा ठाणें.

यांनीं तयार केलें.

तें

रामचंद्र वासुदेव घांगुर्डे

यांनीं मालकीचे वगैरे सर्व हक्क ठेवून

मुंबईत

"इंडियन प्रिंटिंग" छापखान्यांत छापविलें.

सन १८८३.

---

(सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें नोंदून या पुस्तकासंबंधी सर्व हक्क छापविणारानें आपणाकडे ठेविले आहेत.)

---

किंमत ६ आणे.

# माझी समजूत.

सखाराम निळकंठ पटवर्धन
यांचे [illegible],
मराठी [illegible] पुस्तका ठाणें,


गणेश व्यंकटेश काणे
[illegible]
हल्लीं मुक्काम आपटें, तालुका पनवेल,
जिल्हा ठाणें.


यांनीं तयार केलें.

तें


रामचंद्र वासुदेव घांगुर्डे
यांनीं मालकीचे वगैरे सर्व हक्क ठेवून
मुंबईंत
"इंडियन प्रिंटिंग" छापखान्यांत छापविलें.
सन १८८३.


---


( सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें नोंदून या पुस्तकासंबंधीं सर्व हक्क छापविणारानें आपणाकडे ठेविले आहेत. )


---

किंमत ६ आणे.

## विशेष सूचना.

हें पुस्तक ज्यांस पाहिजे असेल त्यांनीं खालील पत्त्यावर टपालहांशिलासुद्धां पैसे पाठविले असतां पुस्तक रवाना करण्यांत येईल.

पत्ता.

"मुंबईंत फणसवाडींत पारशाचे चाळींत
रा. रा. हरि गोविंद त्रिडकर यांस देणें."

नो - १४४

# श्रीलक्ष्मीनारायण प्रसन्न.

## सूचना.

हें पुस्तक वाचूं इच्छिणाऱ्याच्या, किंवा ऐकूं इच्छिणाऱ्याच्या संबंधानें माझा विचार असा आहे कीं, हें पुस्तक कोणी वाचावें, किंवा न वाचावें, ऐकावें, किंवा न ऐकावें, याकरितां मी हें केलें नाहीं. तर वेदशास्त्रपुराणादि जे कर्म, उपासना, ज्ञान, संबंधानें ग्रंथ आहेत; त्यांतील वास्तविक उद्देशांविषयीं श्रीलक्ष्मीनारायणाच्या कृपेनें जी माझी समजूत झाली आहे, ती लिहिलेली आहे, अशी त्याच्याच प्रेरणेनें माझे ठिकाणीं इच्छा प्रगट झाल्यावरून केलें आहे. त्या इच्छेंत आणखीं एक इतकाच भाग आहे; तो हा कीं, ज्याला न्याय सोडून केवळ कुचेष्टा करावयाची आहे, किंवा वाईट ह्मणावयाचें आहे, त्यानें हें पुस्तक वाचण्याविषयीं श्रम न घ्यावे. कारण असले श्रम सुखदायक असें विवेकांत मानलेलें नाहीं.

गणेश व्यंकटेश काणे,
पुस्तककर्ता.

# प्रस्तावना.

या ग्रंथास "माझी समजूत" हें नांव मीं दिलें आहे. याचें कारण असें आहे. जगांत अनेक ग्रंथकार झाले, होताहेत, होतील. त्यांतील कितिएकांचा मनोदय जग सुधारणा करावी, कितिएकांचा आपल्याला जो विचार समजला आहे; तो आपण लिहिला, ह्मणजे अधिक दृढ होईल; व लिहिण्याची जुळणी साधेल. कितिएकांचा ही संधि बरी आहे. अमुक ग्रंथ केला असतां द्रव्य मिळेल. कितिएकांचा आपल्या बुद्धींत जे विचार स्फुरतात; त्यांचें स्मरण राहावें, याकरितां ते जसजसे स्फुरतील; तसतसे लिहून ठेवावे; इत्यादि अनेकांचे अनेक मनोदय होत. त्याप्रमाणें माझी जी समजूत कर्म, उपासना, ज्ञान, यांविषयीं झाली आहे; ती आपल्याजवळ लिहिलेली असावी; असा एका प्रकारचा माझा मनोदय होऊन हा ग्रंथ मीं लिहिला. यांत ती माझी समजूत आहे.

सदरहू ग्रंथांत मीं जे विचार दाखविले आहेत; त्यांविषयीं ग्रथांतरांतील प्रमाण वचनें मीं लिहिलीं नाहींत. याचें कारण ज्याला वाचल्याचा अर्थ व त्यांतील निर्णय जाणण्याची शक्ति आहे, त्याला त्या वचनांची अवश्यकता आहेच असें मला वाटत नाहीं. ज्याला ती शक्ति नाहीं, त्याला तरी त्या वचनांनीं ह्मणजे समजूत पडते, असेंही नाहीं. इतकेंच होतें कीं, "बाबा वाक्यं प्रमाणं." ह्मणजे हा गूळ चांगला कशावरून तर बाबा चांगला ह्मणतात, यावरून. किंवा अमुक असें ह्मणतो, हें खरें कशावरून तर अमुक ग्रंथांत याज्ञवल्क्यांनीं असेंच ह्मटलें आहे, यावरून.

पण बाबाचें व याज्ञवल्क्यांचें नांव सांगणारांस त्या चांगलेपणाचा व खरेपणाचा स्वानुभव तीं नांवें सांगितल्यानें येतो, असें निखालस होत नाहीं. तर जेव्हां ते स्वतां विचार करून पाहतील, तेव्हांच येईल. एरव्हीं नाहीं येणार. तथापि ज्यांला वचनें हवीं असतील, त्यांनीं श्रीमद्भागवत, देवीभागवत, मार्कंडेयपुराण, अध्यात्मरामायण, वाल्मीकिरामायण, वाराहपुराण, स्कंदपुराण, योगवासिष्ठ, महाभारत, हरिवंश, गणेशपुराण, शिवपुराण, भागवतमाहात्म्य, वायुपुराण, गरुडपुराण, पंचदशी, इत्यादि संस्कृत ग्रंथ, व भृगु, ब्रह्मविद्या, आनंदवल्ली, वज्रशुचि, हीं उपनिषदें; पुरुषसूक्त, रुद्र, पवमान, हे वेदभाग; रामविजय, हरिविजय, पांडवप्रताप, दासबोध, मनाचे श्लोक, ज्ञानसागर, आनंदसागर, बोधसागर, विवेकसिंधु, वेदोक्तधर्मप्रकाश, इत्यादि प्राकृत ग्रंथ हे ग्रंथ पहावे, ह्मणजे मिळतील. वरील ग्रंथांपैकीं मीं कांहीं सर्व वाचले आहेत. कांहीं अर्धमुर्धे. कांहींतील कांहीं भाग पाहिले आहेत. कांहींतील कांहीं थोडेसे श्लोक वाचले आहेत. कांहीं फक्त दुसऱ्याचे तोंडानें ऐकले आहेत. कांहीं ऐकले असून वाचलेही आहेत. कांहींतील एखाददुसरें वचनच पाहिलें आहे. कांहींकांच्या टीकांतून जे भाग आले आहेत, ते तात्पर्यार्थ थोडथोडे ध्यानांत आहेत. अशा प्रकारानें माझी समजूत स्वानुभवाशीं ऐक्य पावली आहे.

ग्रंथकर्ता.

श्री लक्ष्मीनारायणप्रसन्न.

श्री प्रयोज्यप्रयोजकरूपिणे लक्ष्मीनारायणपरब्रह्मणेनमः

# माझी समजूत.

## भाग १ ला.

### प्रपंच व परमार्थ.

एकंदर ह्या जगांत प्रपंच आणि परमार्थ असे दोन प्रकार आहेत. जग हें पंचमहाभूतांची रचना आहे. तीं पंचमहाभूतें खालीं लिहिल्याप्रमाणें होत.

१ आकाश, २ वायु, ३ तेज, ४ आप, ५ पृथ्वी.

पंचमहाभूतांचे गुण, खालीं लिहिल्याप्रमाणें होत.

१ शब्द, २ स्पर्श, ३ रूप, ४ रस, ५ गंध.

वरील पांच गुण तेच पांच विषय समजावे. प्रकर्षेंकरून पंचविषय ज्यांत आहेत, तो प्रपंच. व परम ह्मणजे उत्कृष्ट जें ब्रह्म, त्याची स्फूर्ति ज्यांत आहे, तो परमार्थ. ह्याप्रमाणें प्रपंच आणि परमार्थ यांचे भेद व अर्थ समजावे. स्त्रिया, पुरुष, मुलें, इष्टमित्र, घर, इस्टेट, इत्यादि ह्यांत केवळ माझी स्त्री, माझा भ्रतार, माझे पुत्र, माझ्या कन्या, माझी माता, माझा पिता, माझे इष्ट, माझे मित्र, माझें इस्टेट, शरीरच मी, तीं इत्यादि जीं त्यांचा मी, त्यांच्या यथास्थितपणानें मला, आणि माझ्या यथास्थितपणानें त्यांना सुख, नाहीं तर दुःख, ह्याहून दुसरें काहीं नाहीं-

असा जो मनाचा मुख्यार्थ, त्यानें युक्त जो मनुष्य, तो प्रापंचिक मनुष्य. व वरील समजुतीच्या उलट समजूत ह्मणजे, सर्व जग परमात्म्याची माया, ह्मणून तें मिथ्या, एक अद्वैत ब्रह्म सत्य, यास्तव तीं इत्यादि माझीं कोण? आणि मी त्यांचा कोण? कोणी नाहीं. जगही नाहीं, शून्यही नाहीं. तर सच्चिदानंद शून्यसाक्षी जो परमात्मा; तोच एक अद्वैत आहे. व तो आहे, असें ह्मणणारा मी-ही, त्याशिवाय नाहीं मग काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सरादि, कसचे? व कशासाठीं? आणि कोणी ते धारण करावे? त्यांचें कांहींच कारण नाहीं. असा जो मनाचा मुख्यार्थ, त्याणें युक्त जो मनुष्य, तो पारमार्थिक मनुष्य, असें समजावें.

---

## भाग २ रा.

### कर्मकांड.

पहिल्या भागांत प्रपंचाचें लक्षण सांगितलें आहे. त्याप्रमाणें ज्यांचे मनाचा कल, त्या मनुष्यांचा तसा कल, जोंपर्यंत आहे, तोंपर्यंत त्यांनीं कसें वागावें? आणि आपणांस सुखप्राप्ति कशी करून घ्यावी? व ती प्राप्ति करून घेतली नाहीं, ह्मणजे तें सुख प्राप्त होण्याच्या साधनांचें काया, वाचा, मनें, करून आचरण नाहीं केलें तर, दुःखप्राप्ति होते. इत्यादि निर्णय श्रुति, स्मृति, पुराणादिकांत जेथपर्यंत केला आहे, तेथपर्यंतच्या भागास कर्मकांड असें ह्मटलें आहे प्रापंचिक मनुष्यांचे प्रकार, पुढें लिहिल्याप्रमाणें समजावे.

१ ला, जगाचा कर्ता कोणी नाहीं. तें आपोआप झालें आहे. खावें, प्यावें, चैन करावी. या जगांत जन्मास आल्याचें दुसरें कांहींच सार्थक नाहीं. खाणें, पिणें, चैन, प्रतिष्ठा, इतक्यापुरतेच उद्योग करावे आणि द्रव्यादिक मिळवावीं. इत्यादि समजुतीचे मनुष्य.

२ रा, जगत्कर्ता ईश्वर ह्मणून कोणी एक आहे, असें मानतात व पहिल्या प्रकारच्या मनुष्यांपेक्षां विशेष उद्योगी, नानाप्रकारच्या व्यावहारिक विद्या, कला, व कुशलता, इत्यादि संपादन करण्यांत श्रेष्ठत्व मानतात, व झटतात. कित्येक पूर्वापार चालीप्रमाणें धर्मसंबंधीं कृत्यें करण्यांत अभिमान बाळगितात व कित्येक श्रुति, स्मृति, पुराण, यांस कांहीं अंशीं धरून, व कांहीं अंशीं सोडून, अथवा मुळींच सोडून, नव्या नव्या कल्पना काढून, वरील कृत्यें करण्यांत अभिमान धरतात. परंतु त्या दोघांतही धर्माचे वास्तविक विचारांची बहुतकरून शून्यता असते, यास्तव ते परस्परांस नांवें ठेवितात, असे मनुष्य.

३ रा, परब्रह्म परमात्मा ईश्वर आहे, त्याची आराधना निष्कामबुद्धीनें केली असतां, मोक्षप्राप्ति होते; यास्तव विषयांकडे गुंतूं नये. काम, क्रोधादि रिपु आवरावे. अशी श्रद्धा धरून, तदनुसार श्रुति, स्मृति, पुराण, यांत सांगितल्याप्रमाणें, कर्म, उपासना, आणि ज्ञान, हीं साधण्यास झटतात. परंतु त्यांचे मनांत भेद ह्मणजे मी, तूं, तो, इत्यादि द्वैत प्रपंच सत्य आहे, असा विश्वास असतो. कांकीं, ते प्रपंचांतून सुटावें, आणि मोक्षास जावें, असें इच्छित असतात. असे मनुष्य.

वर प्रापंचिक मनुष्यांचे तीन प्रकार सांगितले. त्यांती-

ल तिसऱ्या प्रकारचे लोक पारमार्थिक मनुष्यांतही मोडतात. ह्मणून त्यांस उभयविध ह्मणण्यास चिंता नाहीं. एकूण प्रापंचिक मनुष्यांचे तीन प्रकार वरप्रमाणें समजावे.

वरील या भागाचे पहिले विवेचनांत सांगितलेलें कर्मकांड, व त्या शिवाय दुसरीं उपासना, आणि ज्ञान, अशीं दोन कांडें मिळून, तीन कांडें श्रुति, स्मृति, पुराण, यांचीं होत. पहिल्या व दुसऱ्या प्रकारच्या लोकांस कर्म व उपासना हीं मुख्य व तिसऱ्या प्रकारच्या लोकांस उपासना व ज्ञान हीं मुख्य असें आहे.

प्राण्यास जन्मास आल्यावर चार अवस्था प्राप्त होतात. त्यांचीं नांवें:–१ बाल्य, २ यौवन, ३ वार्धक्य, ४ मरण. त्यांत मरण या अवस्थेंत शेवटीं तो या देहीं राहत नाहीं; परंतु मी आतां वांचेन, असें मला वाटत नाहीं, असें बोलूं लागतो व तत्संबंधीं कांहीं प्रकार त्याचे लक्षांत येऊं लागतात, व कित्येकांस भानही नसतें. इत्यादि अनेक प्रकार घडतात. जन्म हीही एक अवस्थाच होय. ती सुद्धां एकंदर पांच अवस्था झाल्या. ह्या पांचही अवस्था जागृतीच्या अंतर्गत समजाव्या. मुख्यावस्था तीन त्यांचीं नांवें: १ जागृति, २ स्वप्न, ३ सुषुप्ति. त्यांत द्वैतप्रपंच जो आहे, तो जागृतींत व स्वप्नांत अनुभवास येतो. सुषुप्तींत त्याचें भान नसतें इतकेंच नव्हे, तर आपलेपणाचेंही भान नसतें. स्वप्नांत जरी प्रपंचानुभव आहे, तरी तो ज्याचा त्यालाच बहुतकरून आहे. आपण स्वप्नांत कांहीं मनुष्यें पाहिलीं, तेथें त्यांनीं आपल्यालाही पाहिलें, पण जागृतींतील तींच मनुष्यें त्यांस तें पाहणें, माहीत नसतें. आतां राहिली जागृति, ती परस्परांची परस्परांस कळते.

त्या जागृतीचे प्रकार खालीं लिहिल्याप्रमाणें समजावे.

उठणें, बसणें, बोलणें, चालणें, नानातऱ्हांचे उद्योग करणें, परस्परांचें मनोगत जाणणें, मारणें अथवा दुःख देणें, सुख देणें, ईश्वर आहे अथवा नाहीं ह्मणणें, अनेक मतें काढणें, सिद्धांत करणें, ईश्वरआराधना करणें, अथवा न करणें, मत खंडन करणें, सन्मार्ग किंवा असन्मार्ग धारण करणें, चिंताग्रस्त असणें, स्वस्थ असणें, विवाहादि संस्कार करणें, परस्परांशीं कलह किंवा प्रीति करणें, राज्य करणें, श्रीमंती व गरिबी अनुभवणें, परोपकार करणें, इत्यादि.

यावरून श्रुति, स्मृति, पुराणें, यांचा मनुष्यांशीं जो संबंध तोही जागृति खेरीज नाहीं. जागृतींत तरी पांचवे वर्षापासून ह्मणजे समजूं लागल्यापासून, लागू होतो. श्रुति ( वेद ), स्मृति, आणि पुराणें, इतिहास, व यांच्याशीं लागून असणारीं शास्त्रें, या सर्वांचें अर्थतात्पर्य एकच असून, अधिकाराप्रमाणें रचना गूढ व स्वल्प होत गेली. वेदावरून कळण्याचा अधिकार नाहीं, तेव्हां स्मृतीवरून. तीवरूनही नाहीं, तेव्हां पुराणावरून. त्यांतही ज्यांस कळत नाहीं, त्यांच्या संबंधानें देशभाषांतूनही ग्रंथ होत गेले. कोणी ह्मणेल कीं, मनुष्यांस त्या ग्रंथांचा अभ्यास कशाकरितां पाहिजे? तर त्याचें कारण असें आहे कीं, उपजतच कोणी शहाणा नसतो. कोणी अति तीव्रबुद्धि, कोणी तीव्रबुद्धि, कोणी मध्यम बुद्धि, कोणी कनिष्ट बुद्धि, व कोणी तर अति मंदबुद्धि; असे असतात. कोणी कसाही बुद्धिमान् असो, त्याला थोडाबहुत तरी ग्रंथाभ्यास पाहिजेच. त्या ग्रंथांच्या अभ्यासानें आपण करावें काय? न

करावें काय? सृष्टि कशी झाली? तिचा कर्ता ईश्वर आहे, त्याला शरण जावें. त्या शिवाय संकटापासून कोणी सोडविणारा नाहीं. त्याचे आज्ञेप्रमाणें वर्तावें, कामक्रोधादि जे वेग आहेत, ते आवरावे कां? व कसे? त्यांची योजना व्यवहारांत कशी करावी? थोरांशीं कसें वर्तावें? बरोबरीच्यांशीं कसें वर्तावें? व कनिष्ठांशीं कसें वर्तावें? परब्रह्म तें काय आहे? आपण ब्रह्मच आहों, जगत्मिथ्या कसें? कोणालाही दुःख देऊं नये, सर्वांशीं मैत्रीनें वागावें, प्रपंच कसा करावा? परमार्थ कसा साधावा? सुख कशानें होतें? दुःख कशानें होतें? आत्मवत्सर्व भूतें पहावीं, जीव काय आहे? ईश्वर काय आहे? साकार तें कोणतें? निराकार निर्गुण तें काय? आत्म्याचा शरीराशीं संबंध आहे किंवा नाहीं? आहे तर तो कसा? नाहीं तो कसा? माया ती काय? सृष्टि अनंत आहे, तींतील सर्व पदार्थांचें ज्ञान आपल्यास अवश्यक, किंवा कांहीं यत्तेपर्यंत अवश्यक. बंध तो काय? मोक्ष कसा? इत्यादि विचार समजून, मनुष्याला शांति प्राप्त होते, व शांति हेंच परम सुख समजावें. एकूण जागृति ही कर्म, उपासना व ज्ञान प्राप्त करून घेण्याची जागा, परंतु ती जागृति आणि तें ज्ञान प्राप्त करून घेणें, हीं दोन्ही सुवर्ण कुंडलाप्रमाणें एकच आहेत. जसा सुवर्ण आणि कुंडल यांचा पृथक्पणा होणें नाहीं, तसा त्यांचाही होणें नाहीं. मनुष्याचे मनांत प्रापंचिकपणा जोंपर्यंत आहे, तोंपर्यंत शरीरसंबंध (अहंत्व) व स्त्री, पुत्र, गृह, बांधवादि संबंध (ममत्व) हीं त्याला आहेतच. आणि त्या संबंधांनींच तो सुख मानितो. एवंच, प्रापंचिक सुख जें आहे, तें द्वैत पदार्थांशिवाय नाहीं. कारण आपण

व आपल्याहून दुसरे मनुष्यादि यांचा परस्पर यथायोग्य योग झाल्याशिवाय, तें सुख घडत नाहीं, हा सर्वांस अनुभव आहेच. सारांश, द्रव्यादि व मनुष्यें यांची अनुकूलता झाली पाहिजे ह्मणजे प्रपंचांत सुख घडतें. ती अनुकूलता होण्यास ज्ञान पाहिजे, व ज्ञान होण्यास कर्म, उपासना, ज्ञान, या त्रिकांडांचा विचार ज्यांत आहे, असे जे श्रुति, स्मृति, पुराणें, इत्यादि ग्रंथ त्यांचा अभ्यास झाला पाहिजे. तो अभ्यास पांचवे वर्षापासून ह्मणजे, समजूं लागल्यापासून करावा. प्रथम लेखन, वाचन, गणित, यांचा अभ्यास जरूर तितका मौंजीबंधनापर्यंत संपादन करून, नंतर वेद, शास्त्र, पुराण, यांचा अभ्यास सार्थ व्हावा. ज्यांस वेदाचा अधिकार नाहीं, त्यांनीं स्मृतीवरून व तोही नाहीं, त्यांनीं पुराणोक्त विचार पहावा. तोही अधिकार नाहीं, त्यांनीं प्राकृत अथवा श्रवणद्वारा विचार पहावा. कोणीकडून तरी ज्ञान व्हावें, हेंच मुख्य आहे. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, हे मुख्य चार वर्ण. यांच्या परस्पर संकरानें अवांतर वर्ण झाले. पूर्व युगांत ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, या त्रिवर्णांस वेदाचा अधिकार होता. प्रस्तुत कलियुगांत क्षत्रिय, वैश्य, या दोन वर्णांचे निवळ भेद कोठें नाहींत; आहेत ते सरासरी, यामुळें केवळ ब्राह्मणांसच वेदाचा अधिकार राहिला. कोणी ह्मणेल कीं, प्रस्तुत ब्राह्मण तरी शुद्ध कोठें आहेत? तर त्याचें उत्तर असें आहे कीं, ब्राह्मण ह्मणून जितके आजकाळ आहेत, त्यांच्यांत प्रवरसंबंध अव्याहत चालू आहे. तसाच तदंतर्गत गोत्रसंबंधही चालू आहे. व प्रवर ह्मणजे मुळचे जे वेदनिष्ठ व परब्रह्मनिष्ठ श्रेष्ठ ब्राह्मण, त्यांणीं युक्त परंपरा व गोत्र ह्मणजे त्या प्रवरांतून कोणी

तरी एक, कीं त्याच्या परंपरेंत झालेला जो तो आपल्या त्या परंपरेस त्या एकाचें नांव सांगतो, अशी ती त्या नांवानें युक्त परंपरा. अस्तु. हा जो प्रवर व गोत्र यांचा वरप्रमाणें संबंध त्याप्रमाणें अमुक एक प्रकारचा संबंध, आपणांस क्षत्रिय, वैश्य, ह्मणविणारांच्यांत नाहीं, ह्मणून त्यांस निवळ असें ह्मणवत नाहीं. व वरप्रमाणें ब्राह्मणांत तो आहे, ह्मगून त्यांस शुद्ध ह्मणण्यास हरकत दिसत नाहीं. तथापि त्यांच्यांत कर्मप्रमाणें क्षत्रिय, वैश्य, शूद्रादि संज्ञा देण्यायोग्य जे ब्राह्मण असतील, त्यांस ती ती संज्ञा देण्यास, व वेदबहिष्कृत करण्यायोग्य जे असतील, त्यांस वेदबहिष्कृत करण्यास हरकत नसून, फायदाही आहे. परंतु तसें करणें सत्ताधीशावांचून होणें नाहीं. कितीएक अन्य जातीचे लोक आह्मी ब्राह्मण आहों, किंवा आह्मांस वेदोक्ताचा अधिकार आहे, असें दाखविण्याकरितां ब्राह्मण जातींतील एखाद्यास द्रव्यादि देऊन, त्या लोभिष्टाच्या सहाय्यानें आपल्या मतास अनुकूल असा ग्रंथ तयार करून तसें दाखवूं लागतात, पण असें आहे कीं; पूर्व युगांत सत्य व वास्तविक विचार यांची प्रीति विशेष होती. आणि लोभ, मत्सर, ममतादिक विचाराच्या स्वाधीन होतीं. यामुळें कितीएक क्षत्रिय ब्राह्मणधर्मास अनुसरले. परंतु बहुतकरून क्षत्रियादिकांस आपण ब्राह्मणांत शिरावें, असें वाटत नसे व तसें करवतही नसे. प्रस्तुत तर कलियुगाचा अम्मल आहे. मग एखादा कोणी ब्राह्मणादि वरिष्ठ वर्णांत जर शिरूं पहातो आणि क्षणभर तो त्यांच्यांत शिरण्या योग्य आहे, असें जरी मानलें, तरी शिरणारांच्यानें आपले माता, पितर, बांधवादि ज्ञातिसंबंधी, यांचा त्याग करवेल काय? किंवा त्यांसुद्धां

जर तो शिरूं पहातो, तर त्याच्यासारखे ते सगळे त्या एकट्यामुळें शिरण्या योग्य होतील काय! व तो एकटाच शिरला तर, त्याचा वियोग त्यांना सहन होईल काय? तर वरील पैकीं कोणताही प्रकार घडणार नाहीं. आणि जो एखादा खरोखर शिरण्यायोग्य असेल, तो शिरण्याची इच्छा करणारही नाहीं. ज्यांच्यांत योग्यता नसत्ये, तो बाह्यात्कारीं मोठेपणा मिळवावा, ह्मणून वरिष्ठांत शिरूं पहातो; पण तसें करणें चांगलें असें विचाराअंतीं सिद्ध होत नाहीं. याकरितांच तुकारामबोवांसारखे योग्य असूनही वरिष्ठांत शिरले नाहींत, तथापि संतोषवृत्तींत होते. सारांश, आपले स्वधर्माप्रमाणें सर्वांनीं वागून, आपला जो धंदा असेल, त्याप्रमाणें उद्योग करून, निर्वाह करावा, हेंच योग्य. पुराणोक्त क्रिया केल्या ह्मणजे स्वर्गादि फळें मिळत नाहींत, आणि वेदोक्त केल्या ह्मणजे तीं फळें मिळतात, असें अगदीं समजूं नये. ईश्वराला सर्व लोक सारखेच आहेत. इतकेंच कीं, जातीप्रमाणें क्रिया व धंदे करावे आणि त्याला स्मरावें हेंच उत्तम होय. ह्या लोकीं व परलोकीं श्रेष्ठांत गणना होण्यास वेद, पुराण किंवा प्राकृत मंत्र व क्रिया केवळ कारण नाहींत, तर सत्य, शौच, दया, ईश्वरभाव, अहिंसा, शम, दमादि हीं मुख्य कारण होत. अस्तु. आतां थोडासा अधिकाराविषयीं विचार करितों. ब्राह्मण ह्मणजे-शम, दम, तप, शौच, शांति, आर्जव (सरळपणा,) ज्ञान, विज्ञान, आस्तिक्य, व आपल्या खेरीज त्रिवर्णांचीं लक्षणें मनांत समजणें, अशा या दहा लक्षणांनीं युक्त जो तो. क्षत्रिय ह्मणजे-शौर्य, तेज, धृति, दाक्ष्य, युद्धीं न पळणें, दान, ईश्वरभाव, व आपल्या खेरीज

त्रिवर्णांचीं लक्षणें मनांत समजणें, अशा या आठ लक्षणांनीं युक्त जो तो. वैश्य ह्मणजे—कृषि, गोरक्ष्य, वाणिज्य, व आपल्याखेरीज त्रिवर्णांचीं लक्षणें मनांत समजणें, अशा या चार लक्षणांनीं युक्त जो तो. शूद्र ह्मणजे—परिचर्या ( वरील त्रिवर्णांची सेवा, ) व आपल्याखेरीज त्रिवर्णांचीं लक्षणें मनांत समजणें, अशा या दोन लक्षणांनीं युक्त जो तो. वैश्य व शूद्र यांच्या लक्षणांत दान आणि ईश्वरभाव जरी सांगितले नाहींत, तरी सर्व वर्णांस जे साधारण अवश्यक नियम—अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, दान, दया, ईश्वरभाव, संतोष, शौचादिक, सांगितले आहेत. त्या दृष्टीनें पाहिलें असतां, ते आहेतच, असें सिद्ध होतें.

हा प्रत्येक वर्णाच्या विशेष व साधारण कर्मांविषयीं विचार झाला. वेदाचा पूर्ण अधिकार ह्मणजे अध्ययन व अध्यापन करणें, दान देणें, व घेणें, यजन व याजन करणें; हा होय. तो ब्राह्मणांसच आहे. व क्षत्रिय वैश्यांस त्रिकर्मांचा ह्मणजे, अध्ययन करणें, दान देणें व यजन करणें, हा अधिकार; कारण क्षत्रियांस जर प्रजापालन संबंधीं कामें करणें आहेत, तर वर सांगितल्या त्रिकर्मांहून अधिक अधिकार उपयोगाचा नाहीं. तसाच वैश्यांसही कृषि, गोरक्ष्य, वाणिज्य, हीं कामें करणें आहेत, तर त्यांनांही अधिक अधिकार उपयोगाचा नाहीं. त्रिकर्मांचा तरी त्यांचीं इतर कामें उत्तम रीतीनें होऊन जितका अवकाश मिळण्यासारखा तितक्याच बेताचा. आणखीं असें आहे कीं, शिकविणारास विद्या व आचार जास्ती पाहिजेत. कां कीं, एकपट जर शिकवावयाचें आहे तर त्याच्या तिप्पट किंवा अधिक विद्या व आचार आंगीं पाहिजेत. ब्रा-

ह्मण, क्षत्रिय, वैश्य यांच्याहींपेक्षां मंद, व वेदाचा अर्थ न समजण्यासारखी ज्यांची बुद्धि, व दुसऱ्यांची हलकी चाकरी करून निर्वाह करण्याची ज्यांना बहुतकरून अवश्यकता, असे जे शूद्र, त्यांना आपलें स्वतांचें काम जी चाकरी ती उत्तम रीतीनें बजावून, अवकाश मिळेल त्यांत आपले बुद्धीप्रमाणें सार्थकाचा विचार बवगें आहे; तेव्हां वेदासारखे खोल विचाराचे जे ग्रंथ त्यांचें अध्ययन त्यांना काय उपयोगी ? त्यांनीं श्रवणद्वारा, फार झालें तर प्राकृत ग्रंथ द्वारा, विचार पहावा हेंच ठीक दिसतें. कोणी अशी शंका काढील कीं, तुह्मीं ह्मणता तो अधिकार खरा; परंतु त्या त्या विशेष कर्मांत जो पडेल, त्याला तो असावा, त्याविषयीं जातिनियम कशाकरितां पाहिजेत ? तर त्याचें असें उत्तर आहे कीं; धंद्यावरून जाति, अथवा प्रत्येक जातीस भिन्न भिन्न धंदा असें झाल्यानें, त्या त्या जातींत तो तो धंदा वंशपरंपरा चालत असल्यानें, त्याची जशी सुधारणा होते तशी कांहीं दिवस हा केला, कांहीं दिवस तो केला, तर होत नाहीं. आणखीं असें कोणी ह्मणेल कीं, सर्व मनुष्यांची एकच कामांत बुद्धि चालते कीं काय ? तर असें आहे कीं, त्या त्या जातींत जो जो धर्म व धंदा आहे, त्याचें उत्तम रीतीनें त्या त्या जातीकडून आचरण घडलें ह्मणजे त्यांतील निपजलेल्या मनुष्यांची बहुशः तशीच वृत्ति व बुद्धि होते. ह्मण आहे कीं "खाण तशी माती" आणि "बीज तसा अंकुर". शाळेंतील मुलांचें जसें वर्गीकरण तसें जगांतील लोकांचेंही वर्गीकरण राजानें बंदोबस्तानें चालवावें. आणि असें होईल तरच तें चालल, नाहीं तर संकर होईल. प्रजेच्या धर्माकडे राजानें लक्ष दिलें, ह्मण-

जे ते यथास्थित चालतात, नाहीं तर नाहीं. कोणी ह्मणेल कीं राजा कां नको ह्मणतो आहे? ज्याचा त्यानें धर्म चालवावा. तर बाबारे, तसें नव्हे. राजा कां नको ह्मणतो आहे? ज्याचा त्यानें आपल्या जमिनीचा धारा त्याला द्यावा, तर अशा व्यवस्थेनें नियमित वेळीं अवश्य जें सरकारास देणें प्रजा देते, तें दहशतीशिवाय ती कसें देईल? नाहींच देणार. तसाच, धर्मही आचरण करणार नाहीं हें उघड आहे. राजनीतींत असें आहे कीं, राजानें ज्यांचा जसा धर्म असेल, तसा त्यांचा नीट चालवावा. वर ब्राह्मणादिकांच्या विशेष धर्मांत असें ह्मटलें आहे कीं, आपल्या खेरीज त्रिवर्णांचीं लक्षणें मनांत समजणें. त्यावर अशी शंका येईल कीं, जर लक्षणें मनांत समजलीं, तर समजणारांकडून बाह्यात्कारीं तसें आचरण घडण्यास काय हरकत आहे? याबद्दल निवारण असें आहे कीं, जारकर्माची जिला प्रीति अशी जी जारिणी स्त्री, तिनें प्रसंगवशात् पतिव्रतेचा प्रभाव पाहिला ह्मणजे, तें पतिव्रतेचें लक्षण व त्याचा चांगुलपणा तिच्या मनांत भरून, कांहीं वेळ तिलाही चांगलें वाटतें. पण तितक्यांतच जर सुंदर, तरूण व ऐश्वर्ययुक्त पुरूष दृष्टीस पडला, तर वृत्ति चमत्कारिक होऊन जाऊन, इंद्रियांची धांदल उडते. पहा, पतिव्रतेचे गुण ती मनांत समजली, परंतु स्वतांचे विशेष जारत्वगुणामुळें वृत्ति बहकली. या दृष्टांताचा एक उद्देश घेऊन पाहिलें, ह्मणजे समजेल कीं, क्षत्रिय, वैश्य, शूद्र इत्यादि वर्णांस आपल्यापेक्षां जे श्रेष्ठ त्यांच्या गुणांचा प्रभाव मनांत समजतो, परंतु वृत्ति स्वतांच्या विशेष गुणांप्रमाणें फांकते. जो विशेष गुण तो अधिकार. हा अधिका-

र अर्जुनाचें व शंकराचें युद्ध ज्या कारणानें झालें त्यावरून व विश्वामित्र आणि वसिष्ठ यांचा प्रसंग धेनुहरण संबंधीं जो झाला, त्यावरून चांगला ध्यानांत येईल. अस्तु प्रकृतीस अनुसरतों. सारांश, ज्ञान (प्रपंच परमार्थ या दोहोंचें किंवा नुसतें प्रपंचाचें मग पुढें दुसरें) प्राप्त झालें ह्मणजे सुखप्राप्ति. उपनयन संस्कार होण्यापूर्वी लेखन, वाचन, व्यवहारापुरतें गणित, इतका अभ्यास झाला ह्मणजे तें काम पुढें राहत नाहीं. उपनयनानंतर वेदशास्त्राध्ययन. तें असें: प्रथमतः नित्यकर्मसंबंधीं अध्ययन व तत्संबंधीं शास्त्रार्थ यांची चांगली माहिती, पुढें संहिता, ब्राह्मण, पदें, क्रम, इत्यादि अध्ययन उपग्रंथांसुद्धां. मौंजी पूर्वी रूपावळी, धातुरूपावळी, समासचक्र, व अमरकोश हे ग्रंथ पाठ करावे, व उपग्रंथांबरोबर तीन चार सर्ग काव्य व एखादा चंपुसारखा ग्रंथ, पुढें कौमुदी (व्याकरण), धर्मशास्त्र, न्याय, मीमांसा, आणि पुराण यांसंबंधीं अवश्यक विषय यांचें ज्ञान, याप्रमाणें अभ्यास करावा. आठवे वर्षी मौंजीबंधन झाल्यापासून एकसारखा आठ वर्षे व पूर्वीचीं तीन वर्षे मिळून एकंदर अकरा बारा वर्षे अभ्यास ह्मणजे सोळावे वर्षापर्यंत वरील अभ्यास होण्यास कांहीं हरकत नाहीं. जर रोगादि निरुपायिक अडथळे आले तर पुढें आणखीं तीन चार वर्षे अभ्यास केला ह्मणजे झालें. पुढें गुरूचे संतोषानें विवाह करून, संसार करावा. त्यांत नित्यनैमित्तिक, पंचमहायज्ञादि कर्मे करावीं. संतति (पुत्र कन्या) झाल्यावर तिला विद्यासंपन्न करून, तिची व्यवस्था ह्मणजे मौंजी, लग्नें, इत्यादि करून देऊन उपजीविकेची सोय करून ठेवावी. संसारांत असतां मनुष्याचें नित्याचें जें कृत्य ईश्व-

राचा मान राखणें, त्याला न विसरणें, त्याच्या कृपेनें आत्मविचार जाणणें, आणि परोपकार करणें, यांत कसाही प्रसंग आला तरी शक्तिप्रमाणेंच पण हयगय अगदीं होऊं देऊं नये. संसारकृत्याला जितक्या जिनसा अवश्यक तितक्या प्रयत्न करून आपल्या करून ठेवाव्या. नाइलाज होईल तर दुसऱ्याकडून आणाव्या, आणि कार्य होतांच किंवा मुदत भरतांच परत कराव्या. आपल्यास कर्ज होऊं देऊं नये, व लेंकरांवर कर्जाचें ओझें ठेवूं नये. त्यांचे पुढें कलह न होतील अशी योजना करून ठेवावी, परंतु संसारकृत्यांस जें द्रव्य लागेल तें अन्यायानें संपादन करूं नये. न्यायानें संपादन करावें. कोणी ह्मणेल कीं संसारांत खोटें केल्याशिवाय चालत नाहीं, तर असें समजूं नये. ज्याचीं इंद्रियें स्वाधीन, व ज्याजवळ उत्तम विचार अशा मनुष्यास खोटें केल्याशिवाय संसार करितां येतो. तो कसेंही उच्च, नीच, खाणें, पिणें, वस्त्र, पात्र, व स्थळ असलें तरी सुखदुःखांत निमग्न होत नाहीं. पण ज्याचीं इंद्रियें स्वाधीन नाहींत, आणि उत्तम विचाराची ज्याजवळ कमताई आहे, अशा मनुष्याची आळस डामडौल, उत्तम प्रतीचें खाणें पिणें, वस्त्रपात्र, भूषण, स्थळ, इकडे विशेष प्रीति असते, व तोच खोटसाळपणा करण्यांत तत्पर होतो. वास्तविक पाहिलें तर अगदीं कनिष्ट प्रतीचे अन्नादिकांनीं सुद्धां निर्वाह होतो, मग खोटसाळपणा करून डामडौल करण्यांत व श्रीमंती दाखविण्यांत काय हांशील आहे? कांहींच नाहीं. सर्व सुखदुःख, बरें वाईट, श्रीमंती गरीबी, हीं ईश्वरी सत्तेनें प्राप्त होणारीं आहेत. न्यायानें वर्तल्यानें ह्मणजे श्रीमंती येत नाहींच, असें नाहीं. व अन्यायानें वर्तल्यानें ती येतेच, असेंही नाहीं. मग

न्याय सोडून अन्यायानें कशाकरितां द्रव्य मिळवावें ? मिळवूं नये हेंच योग्य आहे. व अशी ज्याची समजूत आहे, तोच खरा समजूतदार. अस्तु. संसारी मनुष्याकडेसच याचकजन बहुतकरून येणारे आहेत, यास्तव त्यांच्याशीं त्या संसारी मनुष्यानें कठोरपणा न करितां, नम्रतेनें वागावें. शक्ति असेल त्याप्रमाणें मूठ, चिमूट किंवा अधिक द्यावें. नसेल तर दुखविल्याशिवाय जितकें होईल, तितकें करून, नाहीं ह्मणून सांगावें. व्यवहारनीतींत, नीतिमानाशीं नीति, अनीतिमानाशीं अनीति करावी असें आहे. पण केव्हां ? आपल्याशीं त्याशीं प्रसंग येऊन, तो जर आपल्याशीं नीतीनें वागतो आहे तर, किंवा अनीतीनें वागतो आहे तर. एरव्हीं नाहीं. मुख्य पक्ष ह्मटला तर, सर्वांशीं नीतीनेंच वागावें. नाइलाजास्तव अनीतिमानाशीं अनीति करण्याचा प्रसंग येईल, तेव्हां तो अनीति सोडील, अथवा श्रेष्ठांस आपलें करणें पसंत वाटेल, अशा तजविजीनें करावी. उगीच पाहिला अनीतीचा मान कीं वाग त्याच्याशीं अनीतीनें, असें करूं नये. अधिकारावांचून वरचढपणाचें बोलणें, चालणें, करणें, इत्यादि व्यवहार करूं नये. कारणावांचून कोणाकडे जाऊं नये. आपण होऊन गेलें असतां मानापमानाकडे लक्ष ठेवूं नये. आणि एरव्हीं तरी त्यांत निमग्न होऊन रहावें, असेंही करूं नये. आपले एथें कोणी आला असतां, त्याचा अनादर कदापि करूं नये. योग्यतेप्रमाणें मान करावा. सन्मार्गाचें श्रवण, मनन, निदिध्यासन, निरंतर करावें. हलकटपणा सोडावा. संपत्ति ही अनित्य आहे, ह्मणून गर्वानें वागूं नये. मादक पदार्थ सेवन करूं नयेत. आपल्याकडे अधिकार आहे ह्मणून को-

णास उगीच दुःख देऊं नये. फार तर काय, पण आपला कोणाशीं द्वेष असेल, तो अधिकाराचे नात्यांत मनांत सुद्धां आणूं नये. व द्वेष एरव्हीं सुद्धां उपयोगी नाहीं. सर्वांशीं प्रेमानें वागावें. दोन किंवा चार घटका रात्र राहिली आहे तों निजून उठावें. कारण पांहटेस पांघरूण घेऊन निजलें असतां बरें वाटतें, पण पूर्वरात्रीस घेतलेली झोंप खरोखर सुखदायक होते. निजून उठल्यावर हंतरूणावर असतांच बसून, भूमीस नमस्कार करून, मग खालीं उतरून, शुचि होऊन ईश्वराचें व पुण्यरूप स्त्रिया आणि पुरुष यांचें प्रातःस्मरणांत सांगितल्याप्रमाणें स्मरण करावें. स्मरणाचा मुख्य हेतु असा आहे कीं, आपला कर्तृत्वादिकांचा अहंकार जावा. कर्ता ईश्वर आहे, त्याचे कृपेशिवाय कधींही हित होणार नाहीं, व त्याच्या कोपानें शिक्षा होईलच, हें नेहमीं लक्षांत रहावें; आणि तो कोप न होई व ती कृपा होई असें वागावें. वसिष्ठ, धर्मराज, गजेंद्र, द्रौपदी, अहल्या, रामचंद्र, परशुराम, पुण्य क्षेत्रें, पुण्य तीर्थें, इत्यादिकांचे स्मरणानें त्यांचे जे गुण-सत्य, शौच, दया, ज्ञान, परोपकार, ईश्वरभाव, अनुकूलतेनुरूप नित्यनैमित्तिक धर्मविधि, निराळस, व निष्कपटपणानें आचरणें, परस्त्री आणि परपुरुष यांकडे चित्त न ठेवणें, स्वपति व स्वस्त्री यांच्याशीं प्रेमानें शास्त्रमर्यादा न सोडून वागणें, मातापितरांची अवज्ञा न करणें, सर्वांशीं सद्धर्मानें व प्रेमानें वागणें, आणि सर्वांचें कल्याण चिंतणें, इत्यादि संपादन करण्यास झटावें. प्रातःस्मरण करण्याचा हेतु असा आहे कीं, निजून उठल्यावर पुढें रात्रीस फिरून निजेपर्यंत, सर्व उद्योग करावयाचे तेव्हां तत्पूर्वी तें स्मरण योग्यच

होय. तेणेंकरून त्या उद्योगांत अविचार सहसा घडाव-याचा नाहीं. एखादा गृहस्थ अनीतीनें वागतो आहे, त्याला दुसरा ह्मणतो, अरे! तूं असें काय करतोस? आपल्या वडिलांचें स्मरण कर. त्याच्या ह्मणण्यांत इतकाच अभिप्राय असतो कीं, तुझे वडील जसे नीतीनें वागत होते, तसा तूं वाग. सारांश, ज्यांचें स्मरण करावयाचें त्यांच्या सद्गुणाचें अनुकरण स्मरण करणारानें करावें हेंच स्मरण आहे. व प्रातःस्मरण सांगितलें ह्मणून अन्यवेळीं स्मरण करूं नये, असें नाहीं. इतकेंच कीं मुख्य वेळ ती. केवळ श्लोक, भूपाळ्या ललकारीनें ह्मटल्या, तर प्रातःस्मरण घडत नाहीं. अस्तु. नंतर शीतोदकादिकांनीं सविधि भगवत्स्मरणानें स्नान करावें, व तत्पूर्वीं शौचविधि, मुखमार्जन, करावें. स्नानानंतर अधिकाराप्रमाणें संध्या, देवपूजादि करून कुटुंब निर्वाहाचा उद्योग करावा. माध्यान्हकालीं स्नानादि उक्त क्रिया करून भोजन करावें. पुढें तांबूल भक्षण व शतपावली झाली ह्मणजे अंमळ विसांवा घेऊन, इष्टमित्र यांचपाशीं चांगल्या व करमणुकीच्या गोष्टी बोलून पुनः निर्वाहाचे उद्योगास जावें. पुढें घटकाभर व्यायाम करणें, त्यांतच अवकाशानुरूप देव व साधुसंत यांचे दर्शनास जाण्याची योजना असावी. मग घटकाभर दिवस आहे तों घरीं यावें. नंतर शुचि होऊन, संध्यादि उक्त क्रिया कराव्या. सायंकाळीं गृहस्थाश्रम्यास स्नान सांगितलें नाहीं. त्याचें तात्पर्य इतकेंच कीं, दोनप्रहरच्या भोजनानंतर, फिरून निर्वाहाचा उद्योग, दुसऱ्या दिवसाच्या त्या उद्योगाच्या वेळेखेरीज करावयाचा नाहीं. त्या उद्योगानंतर फिरून सायंकाळापर्यंत तसा उद्योग

घडेल, आणि शूद्रस्पर्शादि मळीणपणा प्राप्त होईल, तर स्नान झालें पाहिजे. असो. पुढें भोजनोत्तर तांबूल, शतपावली झाल्यावर पुराणादिकांतल्या उत्तम भगवत्कथा ऐकाव्या, किंवा वाचाव्या. याप्रमाणें प्रहर दहा घटिका रात्र गेल्यावर सर्वांनीं एकमेकांस विचारून, शुचि व स्वस्थपणानें भगवत्स्मरणपूर्वक निद्रा घ्यावी. हा वरप्रमाणें नित्यक्रम करावा. त्यांतील कांहीं गोष्टींचें विवरण खालीं लिहिल्याप्रमाणें समजावें.

१ प्रातःस्मरण आटोपल्यावर, आज रात्रीं निजेपर्यंत कोणकोणतीं कृत्यें करावयाचीं, त्यांचा विचार करून, त्याप्रमाणें तीं कृत्यें जेव्हांचीं तेव्हांच करावीं. निरुपाय होईल तर त्यांपैकीं दुसरे दिवसाला शिल्लक राहिलीं तरी चिंता नाहीं. परंतु शिल्लक बहुशः राहणार नाहींत, व पुढें तरी फार तुंबणार नाहींत, असें लक्ष ठेवावें.

२ शौचविधि प्रकार तो असा. शौच दोन प्रकारचा. बाह्य व अंतर. बाह्य ह्मणजे स्थूल शरीरशुद्धि, व अंतर ह्मणजे लिंगदेह शुद्धि. बाह्य शुद्धि मृत्तिका जलादिकेंकरून, व अंतरशुद्धि काम, क्रोदादि रिपु आवरून, इंद्रियें सन्मार्गाकडे लावून, निष्कपट व निरहंकारानें मन ईश्वरभक्तींत तत्पर करून शांत करणें. शौच प्रकाराविषयीं शास्त्रांत पुष्कळ प्रकार सांगितला आहे. पण त्यांतलें तात्पर्य इतकेंच कीं, मल व दुर्गंध दूर होईल, खाणें, पिणें, व विषय यांत अनियमित व असत्प्रवृत्ति न होईल, अशी सावधगिरी राखावी. मल व दुर्गंधयुक्त हस्तपादादि अवयव, जल, मृत्तिकादिकांनीं क्षालित झाल्याशिवाय, शरीराचे अन्य शुद्ध भाग, व वस्त्रपात्रादिकांस त्यांचा स्पर्श

होऊं नये. शौच ह्मणजे परसाकडणें, असें न समजतां वरप्रमाणें समजावें; व वस्त्र, पात्र, स्थळ, हीं शुद्ध राखणें, हेंही शौच या शब्दानें समजावें; आणि अवकाश व शक्ति यांप्रमाणें तो करण्यास झटावें. वर दोन प्रकारचा शौच सांगितला, तो तितक्या प्रकारचा केलाच पाहिजे. पण त्यांत अंतर शौच श्रेष्ठ होय. भगवद्भक्ति व भगवन्नामस्मरणासारखें शुद्धिकर तर दुसरें कांहींच नाहीं. ह्मणून बाह्य साधेल तितका करावाच; परंतु अंतर आणि भक्ति व नामस्मरण यांवाचून तो बाह्य निरर्थक जाणावा.

३ आचार, स्वपरग्रामीं व आपत्काळीं साधेल त्या रीतीनें, पण कपटरहित करावा.

४ गृह, सभोंवारच्या जाग्यासुद्धां. त्याचे विभाग ह्मणजे, स्वयंपाकघर, मध्यघर, देवघर, ओटी, मागील दारची ओटी, पाण्याच्या व वस्त्रपात्रादि ठेवण्याच्या जागा, गृहाराम, (फलपुष्प, तुळसी, भाजीपाला इत्यादींची जागा,) तुळसी अंगण, वाळवणाची जागा, मलमूत्र विसर्गाच्या जागा, इत्यादि योजना त्यांत असावी, ती सोयीप्रमाणें. वस्त्रपात्र पदार्थ जेथचे तेथें असावे. अस्ताव्यस्त नसावे.

५ घरांतील मनुष्यें, यांकडे मालकासुद्धां कामें वांटलेलीं असावीं. खरोखर अडचणीवांचून आपलें काम दुसऱ्यावर पडूं देऊं नये. भलत्याच गोष्टीविषयीं कोणी रुसूं फुगूं नये. अनुकूलतेवर लक्ष देऊन, शास्त्रमर्यादा न उल्लंघितां अधिकाराप्रमाणें मनाची हौस पुरविण्याकडे लक्ष द्यावें. अधिकाराप्रमाणें बसणें व पोषाक खेरीजकरून, बाकी भोजनादि प्रकार समान रीतीनें असावे. विद्वान, सभ्य कोणी आहे तर, तो उच्चस्थानीं बसण्यास व शाल इत्यादि उच्च

वस्त्र धारण करण्यास योग्य आहे. परंतु बाकीच्यांना सरासरी अन्न, आणि मालकास किंवा मिळविणारास श्रेष्ठ प्रतीचें अन्न, हें अयोग्य होय. विद्वान, प्रतिष्ठित मालक, मिळविता, वडील, असे लोक भोजनाविषयीं कनिष्ठांशीं समान समजावे. आपले एथें देव किंवा पितर या उद्देशानें ब्राह्मण बोलावले आहेत, किंवा पुण्यरूप, विद्वान, साधुसंत, असे आले आहेत तर त्यांसुद्धां सगळ्यांना समान अन्न घालण्याचें सामर्थ्य नसेल तर, त्यांना मात्र उच्च अन्न वाढून बाकीच्यांनीं साधें सेवन केलें असतां दोष नाहीं; तथापि त्यांसुद्धां सर्वांस शक्तीप्रमाणें समान अन्न वाढलें तर चांगलें. जसें अन्नाविषयीं तसेंच भोजनपात्रांविषयीं समजावें. एखादा शक्तीनें विशेष आहे, किंवा त्याला तसदी अधिक पडते, तर त्याला अधिक अन्न वाढावें हें योग्य पण अपूर्वाईचा पदार्थ सर्वांस समान घातला पाहिजे. देवतोद्देशानें ब्राह्मणसमाराधना घातली तर त्यांत विद्येनें, प्रतिष्ठेनें किंवा द्रव्यानें कोणी कमी अधिक असला तरी, त्यांचा मान समान राखला पाहिजे. लहान मुलांस कामकाजाची तसदी बहुतकरून नसावी. पांचवे वर्षापर्यंत क्रीडा, नंतर सोळावे वर्षापावेतों किंवा विसावे वर्षापर्यंत विद्याभ्यास हेंच मुख्य काम त्यांना असावें. त्यांना शुचिर्भूतपणाची वहिवाट लावीत लावीत लावावी. त्यांनीं भोजनापुरतें व लहान आहेत तोंपर्यंत निजण्यापुरतें मात्र घरीं यावें. बाकी अभ्यास करणें, व कंटाळा न यावा व आंगांत चपळपणा राहावा, याकरितां कांहीं वेळ क्रीडा करणें इत्यादि उपयुक्त प्रकार शिक्षकाचे मार्फतीनें असावे. मुळाक्षरें, शंभर अंक, वीस पाडे, बालबोध बाराखड्या, इतका अभ्यास सवड असेल तर घरींच होईल

तितका बरा; परंतु सर्वच अभ्यास घरीं होण्याची सवड असेल तर शाळेंत जावयास हवेंच असें नाहीं. एकंदर अहोरात्र दिवस मिळून चोवीस तास, त्यांची वांटणी याप्रमाणें समजावी: स्वतांकडे आठ तास, निद्रा आठ तास, धंदा आठ तास, एकूण तीन भाग झाले. त्यांतील प्रत्येक भागांत दोन दोन तास विसावा किंवा कांहीं तरी चांगली स्वेच्छेप्रमाणें करमणूक असावी. खर्च शक्तीप्रमाणें करावा. एकंदर उत्पन्नाचे चार भाग करावे: त्यांतून दोन भाग कुटुंब खर्चाकडे, एक भाग संचय, व राहिला एक भाग त्याचे दोन वांटे करावे, आणि त्यांतील एका वांट्यानें इष्टसंतोष, व बाकीच्या एका वांट्याचे पांच भाग करावे, ते असे: धर्मदान, दयादान, भयदान, अर्थदान, व त्याखेरीज याचकांस दान. धर्मदान ह्मणजे एखादी पर्वणी इत्यादि कांहीं प्राप्त होईल, त्यासंबंधानें तद्देवताप्रीत्यर्थ ब्राह्मणांस देणें. दयादान ह्मणजे दीन, अंध, पंगू, इत्यादिकांस देणें. भयदान ह्मणजे कोणी एखादा खावयास मिळत नाहीं, तें मिळेल इत्यादि आशेनें धर्मभ्रष्ट होणार, त्यानें तसें न व्हावें याकरितां त्यास देणें. अर्थदान ह्मणजे शेजारीपाजारी किंवा मित्र आपल्या हरवक्त उपयोगी पडणारे, त्यांस लग्नादि समारंभाचे संधीस सर्वांदेखत गौरव करून देणें, व खेरीज दान ह्मणजे वर सांगितल्या प्रकारांखेरीज कोणी मुंज किंवा विद्या संपादन किंवा यात्रा किंवा विवाह इत्यादिकांकरितां येणारे ब्राह्मणादि यांस देणें. याप्रमाणें उत्पन्नाचे भाग सांगितले. परंतु असे भाग पाडण्याची सवड नसेल तर, साधेल त्याप्रमाणें कुटुंब निर्वाह होऊन बाकी उरेल तो अजमास बघून कमीजास्ती ह्मणा, वर प्रमाणें

भाग प्रभाग पाडावे, आणि खर्च करावा. व्याज, इष्ट व याचक व पर्वणी या कामीं दान देण्याकरितां मुद्दलावर घ्यावें. त्याचा उपयोग आपत्कालाखेरीज आपल्याकडे करूं नये. सणवार, लग्न, मुंज, इत्यादि संबंधानें खर्च करणें तो, कर्ज न होई, कुटुंब उपाशीं न मरे, व शास्त्रप्रयोगाविरुद्ध न होई, असा करावा. त्यांत लग्नासारखे व यात्रेसारखे मोठाले खर्च संचयांतून करावे. कुटुंबांतील मनुष्यांचीं मुख्य कामें खालीं लिहिल्याप्रमाणें समजावीं.

झाडणें, सारवणें, पाणी आणणें, वस्त्रें धुणें, स्वयंपाक करणें, भोजन, उष्टीं काढून शेण लावणें, दानधर्म करणें, स्नान करणें, मुलांची व्यवस्था राखणें, गुरांची व्यवस्था राखणें, घराची उजूतवाजू करणें, गृहारामाची व्यवस्था पाहणें, जमाखर्च लिहिणें, ईश्वराराधना करणें, संपत्ति विपत्तिकाळीं कसें वर्तावें, कसा खर्च करावा, हा विचार करणें, उत्तम व्यावहारिक व पारमार्थिक गोष्टी बोलणें, ऐकणें, मनन करणें, इष्ट, मित्र, दीन, यांचा समाचार घेणें, निर्वाहाचा धंदा योग्य रीतीनें करणें, विद्वान साधुसंत यांचा समाचार घेणें, इत्यादि.

आपले घरीं अन्य लोक कामें करण्याकरितां जे ठेवणें, ते घरांतील मनुष्यांच्यांनीं कामें उरकत नाहींत तितक्यापुरते ठेवावे. स्नान, संध्या, देवपूजा, इत्यादि कामें ज्याचीं त्यानेंच केलीं पाहिजेत. अनुकूलता व प्रतिकूलता यांकडे लक्ष देऊन, घरांतील सर्व कृत्यें योजलेलीं असावीं. दुसऱ्याचा ऐषआराम पाहून आपल्याला तसा असावा, ही हांव धरणें निरर्थक आहे, पण त्याचे उत्तम गुण व आचार पाहून, तसे संपादन करण्याची हौस असणें निर-

र्थक नाहीं. कोणताही पदार्थ न बाधे अशा बेतानें त्याचा उपभोग करीत जावा. कोणी ह्मणेल कीं, तुह्मीं संसार-संबंधीं विचार दाखविलेत हें बरें आहे; पण ईश्वर आराधना जी सांगितलीत ती कशाला? व ईश्वर कोठें आहे? दुसरा असें ह्मणेल कीं, ईश्वर आहे; परंतु त्याची आराधना रोज रोज कशाकरितां करावी? आठा पंधरा दिवशीं थोडा वेळ केली ह्मणजे झालें. तिसरा ह्मणेल, हे सर्व पदार्थ व त्यांचा कर्तभोक्तेपणा व्हावा, याकरितां शरीर हीं सर्व ईश्वरानें जर उत्पन्न केलीं आहेत, तर त्याच्या इच्छे-प्रमाणें त्या पदार्थांचा त्या शरीरद्वारा उपभोग आह्मीं घे-तों, ही त्याची सेवा घडल्यावर आणखीं त्याची वेगळी आराधना ती कोणती? चौथा ह्मणेल कीं, ईश्वर आहे अ-थवा नाहीं ही चौकशी करण्याची गरजच नाहीं; कारण तो असता तर कधीं तरी दिसता. ज्यापेक्षां दिसत नाहीं, त्यापेक्षां तो नाहींच. खावें, प्यावें, चैन करावी, ईश्वर कसला घेऊन बसलां? पांचवा ह्मणेल, सृष्टी हीं ईश्वरानें उत्पन्न केली आहे. तींतील पदार्थांचें ज्ञान संपादन करण्याकडे आपला काळ घालवावा. ज्ञानाचा पार अद्यापि कोणाला लागला नाहीं; परंतु आपल्याच्यानें होईल तितकें तें संपादन करून, त्याचा जगाला व आपल्याला उपयोग करून घ्यावा. इत्यादि ईश्वराविषयीं अनेक समजुतींचे लोक आहेत. यास्तव ईश्वराचे अस्तित्वाविषयीं, व ईश्वराची नित्य आराधना करण्याविषयीं, इत्यादि विचार ईश्वर शब्दाचा अर्थ शक्तिमान् असा आहे. ह्मणून अनंतकोटी ब्रह्मांडांची उत्पत्ति, स्थिति, लय, एतद्रूप जी शक्ति तिणें युक्त जो

तो ईश्वर असें झालें. करणें योजनेशिवाय नाहीं. योजना ज्ञानाशिवाय नाहीं. जर तो वरील सृष्टिसंबंधीं तिन्ही कार्यें करतो, तर तो ज्ञानी आहेच, असें ठरलें. आतां एवढी मोठी आपल्या शरीरासुद्धां सर्व सृष्टि ही उत्पन्न झाली आहे, कांहीं काळ ती टिकत्ये, आणि क्रमानें नाश पावत जात्ये, तर तिचे तसे प्रकार होण्याला वरप्रमाणें ईश्वर ह्मणून कोणीएक असलाच पाहिजे. मी कर्ता असें जर मनुष्यानें मानावें, तर त्यानें इतकेंच सांगावें कीं, ज्या शरीरानें तूं कार्यें करतोस आणि कर्तेपणा आपल्याकडे मानतोस, तें शरीरच अगोदर कोणी केलें? तूं केलेंस असें तर होणारच नाहीं. मग त्या शरीरानें होणारीं कार्यें शरीराचा कर्ता, तोच त्रिगुणात्मक शक्तीचा कर्ता. त्याचे प्रयोजक व प्रयोज्यरूपी कर्तृत्वाबाहेर नाहींत, हें सहज सिद्ध झालें. कदाचित् असें वाटेल कीं, सृष्टि आपाप झाली, तर असें पहा कीं, पंचभूतात्मक सर्व पदार्थ जड आहेत, त्यांना कोणी चलित केल्याशिवाय ते चलन पावत नाहींत व चलन पावल्यावर अन्य प्रतिबंधाशिवाय स्वतां थांबायाचे नाहींत. असें जर आहे तर त्या पदार्थांनीं झालेली सृष्टी आपाप झाली असें होणें नाहीं. व ती चेतनात्मक दिसते, तेव्हां चेतविणारावांचून ती सचेतन कशी झाली? यास्तव चेतविणारा चित् ह्मणजे ज्ञान तेणेंकरून युक्त असा ईश्वर सर्व सृष्टीच्या अंतर्बाह्य आहेच, असें समजावें.

दुसऱ्याचें उत्तर—जो प्रकार नित्य अवलोकनांत आहे, तो लक्षांत चांगला राहतो व तोच हितकारक असून, आपल्यास अति प्रिय आहे, तर त्याची आपली गांठ आठ किंवा पंधरा दिवसांनीं पडून जसें नित्याच्या सहवासानें

समाधान होणारें आहे, तसें समाधान होईल काय? खचित नाहीं होणार. या दृष्टांतानें असें समजावें कीं, जो सर्वांस उत्पन्न करणारा, रक्षणारा, संहारणारा, त्याची आवड सर्वांस असलीच पाहिजे. तो जर आवडता आहे, व त्याच्या कृपेशिवाय कोणाचें हित व्हावयाचें नाहीं, यावरून हितकारीही आहे, तर मग त्याची आराधना रोज करण्याविषयीं ज्याला कंटाळा येतो, त्याला त्याची आवड आहे असें वडणें नाहीं. भक्तिमान् जो आहे, तो रोज रोज त्याला भजतोच; आणि तसें भजणें उत्तम समजावें. तिसऱ्याचें उत्तर,—शरीर व त्याचे उपभोगाकरितां सर्व पदार्थ हीं ईश्वरानें उत्पन्न केलीं आहेत खरीं, परंतु असा विचार करावा कीं, एका अतिसमर्थ गृहस्थानें आपल्यास घर व त्याची उजूतवाजू राखण्याकरितां माती, चुना, विटा, लांकडें, इत्यादि सामान आणि सुतार, गंवडी, मजूर, इत्यादि लोक दिले आहेत. आतां असें मनांत आणलें कीं, त्या देणाऱ्या गृहस्थाच्या इच्छेप्रमाणें आपण त्या पदार्थांचा उपयोग त्या घराकडे करीत आहों, मग याखेरीज त्याचें वेगळें गौरव कशाला करायास पाहिजे? नकोच. तर अशा समजुतीप्रमाणें वागल्यानें त्याचा कोप होऊन, पुन्हा ते पदार्थ व घर आपणास मिळेल काय? तर नाहीं मिळणार. यास्तव त्याचे इच्छेप्रमाणें वागून, खेरीज तो आपल्या दृष्टीस पडला किंवा आपल्याकडे कांहीं निमित्तानें आला, तर त्याचा मान (उत्थापन देणें, नम्रतेनें भाषण, आपल्या कृपेशिवाय आमच्यासारख्यांचें कल्याण व्हावयाचें नाहीं असें ह्मणणें, इत्यादि) राखणें अवश्य आहे, त्याप्रमाणें शरीरद्वारा पदा-

र्थांचा उपभोग सुख होईल, तशा रीतीनें घ्यावा; व अनार्थांसही द्यावा; परंतु या खेरीज नित्य त्या ईश्वराचें स्मरण, पूजन, प्रार्थना, आणि स्तुति करीत जावी, हेंच योग्य समजावें. चौथ्याचें उत्तर—बाबा, सृष्टीचा कर्ता आहे किंवा नाहीं, ही चौकशी करणें अवश्य आहे पहा, आपल्या उपयोगाचे पदार्थ आपल्याजवळचे सरले, व आणखी पाहिजे आहेत तर, ते ज्याकडे मिळतील तो कोण, व कोठें असतो, इत्यादि चौकशी करणें खरोखर अगत्याचें आहे. मग ते पदार्थ आपल्याजवळचे संपले नाहींत, व पुष्कळ आहेत, तोंच ह्मणा, अथवा संपत आल्यावर ह्मणा, किंवा अगदीं सपल्यावर ह्मणा, ती चौकशी जन करतातच. पशु करीत नाहींत, व त्यांजवळ तितकी बुद्धिही नाहीं, ह्मणून त्यांकडे न करण्याचा दोषही नाहीं. जनांला करणें अगत्याचें आहे, यास्तव त्यांनीं करावी. त्यांतही पहिल्या प्रतीचा करणारा उत्तम समजावा. त्याप्रमाणें शरीर व त्याकरितां सर्व पदार्थ यांचा करणारा, ह्मणूनच त्याजवळ ते मिळावयाचे, असा जो ईश्वर त्याची चौकशी करणें, योग्य व अवश्य आहे. तो दिसतोही. कसा तो पहा. आपल्या समोर कोणी प्राणी उभा आहे, त्याच्या शरीरांत शरीरद्वारा उठणें, बसणें, बोलणें, चालणें, इत्यादि क्रिया करणारा चालक जीवात्मा आहे; पण तो आहे हें कशावरून आपण ठरवितां? तर त्या शरीरसंबंधीं क्रियांवरून. एरव्हीं शरीरा खेरिज केवळ जीवात्मा दिसतो का नाहीं, ह्मणून तो त्या शरीरांत नाहीं का? तर आहे. त्याप्रमाणें हें सृष्टिरूपी कोणीएक शरीर, यापासून अनेक क्रिया घडतात, व त्या

क्रियांचा संबंध सर्व प्राण्यांशीं आहे. अशा क्रिया करणारा, चालक परमात्मा ईश्वर, सृष्टिखेरीज केवळ जरी दिसला नाहीं, तरी तो आहेच. यास्तव त्याला ओळखून व नित्य स्मरून योग्य रीतीनें पदार्थ सेवन करावे. दिनदुनया खातरेंत नाहीं, असें असूं नये. पांचव्याचें उत्तर—ईश्वराचें नित्य स्मरण, पूजन, व नित्य निर्वाहाचें कृत्य करून, अवकाशानुसार पदार्थांचें ज्ञान, व त्या ज्ञानानें त्या पदार्थांचा उपयोग, आपणास व लोकांस करून घ्यावा, हें योग्य आहे. परंतु वास्तविक पाहिलें तर, आपला सर्व काळ ईश्वराकडेसच घालवावा. कारण सृष्टि अनंत आहे, तेव्हां तींतील पदार्थ व चमत्कारही अनंत आहेत. ते पाहण्याकडेसच जर आपण काळ घालवूं लागलों, तर ईश्वरमार्गाकडे केव्हां घालवावा? न घालविला तर त्याची कृपा व प्राप्ति कशी होईल? व्हावयाची नाहीं. व पुष्कळ पदार्थांचें ज्ञान जरी झालें, तरी तें शरीरनिर्वाह व ईश्वरस्वरूप विचार या दोहों ज्ञानांच्या पोटांतच आलें. पहा, आगगाडी आणि तारायंत्र इत्यादि चमत्कारिक ज्ञानांची प्रवृत्ति जेव्हां नव्हती, तेव्हां का लोक उपाशीं मरत होते? मग आतां अधिक तें काय झालें? उलटें ते लोक हल्लींच्यापेक्षां जास्ती सुखी होते, ह्मटलें तरी चालेल. तथापि शरीरनिर्वाह व ईश्वरी विचार इत्यादि नित्य क्रिया करून, अवकाशानुसार उत्तम कला शोधून काढणें, व त्या कामीं झटणें, हें वाइट असें माझें मत नाहीं.

६ वरील विवरणांत दाखविलेले जितके प्रकार आहेत, यांपैकीं शरीरनिर्वाहाशीं ज्यांचा संबंध ते सर्व व्यवहारांत

मोडतात. व ईश्वरप्रीत्यर्थ आणि तत्प्राप्त्यर्थ जितके आहेत, तितके धर्माकडे मोडतात. मिळून सर्व कर्मकांड समजावें. परंतु तें सर्व कर्तव्य (निष्काम) कर्म होय. आणि नानाप्रकारची (मला संतति असावी, द्रव्य मिळावें, रोग जावे, आरोग्य असावें, राज्य मिळावें, प्रतिष्ठा मिळावी, आयुष्यवृद्धि व्हावी, इत्यादि) इच्छा धरून, जीं कर्में केलीं जातात, तीं सर्व काम्य होत. कर्ममार्गांत अनेकप्रकारचीं कर्में, व ब्रह्मा, विष्णु, महेश, इंद्र, चंद्र, वायु वरुण, कुबेर, अग्नि, यम, गणपति, देवी, नाग, यक्ष, गंधर्वादि, मुख्य व उपदेवता आहेत. तथापि सर्वज्ञ, सर्वशक्तिमान्, अनंतकोटी ब्रह्मांडनायक असा ईश्वर एक आहे. पण तो सर्व सम आहे. वरील देवता आणि मनुष्यादि सर्व प्राणी त्याच्या अंगभूत समजावे. आतां अशी शंका येईल कीं, मुख्य जो सर्वज्ञादि लक्षणांनीं युक्त ईश्वर सांगितला, तो आहे असें विचारा अंतीं सिद्ध होतें, व मनुष्यादि प्राणी हे प्रत्यक्षानें अनुभवास येतात, तशा त्या विष्णवादि मुख्य व उपदेवता आहेत, अशी खातरी होत नाहीं. तर याचें उत्तर असें आहे कीं, सर्वसम जो ईश्वर तो जगाची उत्पत्ति, स्थिति व लयरूप कार्यें करितो, पण प्रेरक व प्रेर्यरूपानें करितो, असें समजावें. त्यांत प्रेरकरूपानें स्वतां, व प्रेर्यरूपानें उच्च नीच जे सर्व प्राणिमात्र त्यांच्या हातून करतो. पहा, राजा प्रजेचें पालन आपण स्वतांही करितो, व आपले प्रधानादि जे कारभारी त्यांच्या हातूनही करवितो, याचा असा अर्थ समजावा कीं, राजा आपले जे राज्य चालविण्याचे विचार आहेत, ते आपल्याजवळचे जे प्रधानादिक त्यांच्या मनांत भरतील असें करितो. मग ते प्रधानादि

आपआपला अधिकार चालवितात. या एकदेशीय दृष्टांता-प्रमाणें विचार केला ह्मणजे, प्रेरक व प्रेर्य हे दोन्ही प्रकार चांगले लक्षांत येतील. ईश्वर प्रेरकरूपानें त्रिगुण, पंचमहाभूतें, इंद्रियें, इंद्रियदेवता, अंतःकरणें, व त्या अंतःकरणांत प्रवेश, इतकीं कार्यें, व प्रवेशरूपी जो जीव त्याच्या मनांत अनेक विचारांची प्रेरणा प्रगटविणें, हीं कार्यें करतो. व प्रेर्यरूपानें ह्मणजे जीवांकडून सूक्ष्म, स्थूल देहद्वारा करवितो. जीवांमध्यें जे सर्वज्ञादि ईश्वरगुणांनीं युक्त आहेत, ते ईश्वरकोटींत; व त्या गुणांनीं युक्त जे नाहींत ते जीवकोटींत मोडतात. ईश्वरकोटींत जे आहेत, त्यांतही उच्च नीच पायऱ्या आहेत, व जीवकोटींत जे आहेत, त्यांतही तशा पायऱ्या आहेत. जीवकोटींतले जे प्राणी आहेत, ते पृथ्वीसारख्या गोलांवर आहेत, आणि ईश्वर कोटींतले जे ते सूर्य, चंद्र, इंद्र, वरुण, यम, सत्य, ध्रुव, सप्तर्षि, नाक्षत्र, वैकुंठ, कैलास, गोलोक, इत्यादि जे अनेक गोल व अंतरिक्ष ( भूवर्लोक ) या स्थानीं आहेत. जसा पृथ्वीवर राजा व प्रजा हा प्रकार आहे, त्याप्रमाणें वेगळ्या वेगळ्या तऱ्हेचा ह्मणा, प्रकार वरील स्थानांतून आहे. जे प्रकाशमान गोल आहेत, त्यांवरील अधिकारी व प्रजा प्रकाशज्ञानादि लक्षणांनीं युक्त आहेतच. जसे वैकुंठावर विष्णु, सत्यलोकावर ब्रह्मदेव, कैलासावर शिव, इंद्रगोलावर इंद्र, यमावर यम, गोलोकावर श्रीकृष्ण, इत्यादि. व विद्याधर, यक्ष, गंधर्व, अप्सरा, पिशाचादि अंतरिक्षांत वास करितात. विद्याधरादि जे उपदेवतागण त्यांहून इंद्रादि देवता श्रेष्ठ; व इंद्रादींहून ब्रह्मा, विष्णु महेश, देवी, इत्यादि श्रेष्ठ समजाव्या. पहा, सूर्यगोल सूर्यच, व त्यावरील अ-

धिकारी बारा रूपांनीं सूर्यच. भूमीवरील राजा अनियमित, तसे ते अधिकारी त्या लोकांवर अनियमित नाहींत; तर नियमित काल पावेतों होत. ह्मणजे कोणी कल्पपर्यंत, कोणी मन्वंतरपर्यंत, कोणी अनेक कल्पपर्यंत, कोणी तर याहीपेक्षां विशेष कालपावेतों. वरील सर्व देवतांचा अधिकार त्यांच्याहून कमी कमी, पायरीचे देव, उपदेव, आणि पृथ्वीसारख्या गोलांवरील मनुष्यादि यांच्यावर आहे. त्याप्रमाणें ते आपली सत्ता चालवितात. त्यांचे जे लोक तेच स्वर्ग होत. हें आकाश स्वर्ग समजावें. त्या ठिकाणच्या स्थानैश्वर्याप्रमाणें तेथें पुण्यवान् जे जातात, त्यांस त्यांच्या कर्माप्रमाणें अनेक प्रकारचे सुखभोग प्राप्त होतात; व पापी जे आहेत, त्यांना त्यांच्या कर्माप्रमाणें अनेक दुःखभोग भोगावे लागतात. पापी व पुण्यवान् यांस यमदूत व विष्णुदूत अथवा देवदूत कर्माप्रमाणें भोग देण्याकरितां घेऊन जातात, इत्यादि जो त्या लोकांचा भूलोकासारख्या लोकांशीं व्यवहाररूप संबंध, तो चालण्यास ऐच्छिक गति व रूपें धारण करणें, विमानादिकांतून संचार, अशा प्रकारच्या योजना असल्याच पाहिजेत. त्या, ते जर ईश्वरकोटींतले व देवयोनी आहेत, तर त्यांजवळ असाव्याच. असे जे वर सांगितलेले देवादि त्यांचीं कामें: खरी आराधना करणारावर प्रसन्न होऊन इच्छित वर देणें, किंवा कपटी, दुराचारी, संसारग्रस्त, यांस त्यांच्या वागणुकीप्रमाणें फळें देणें, उष्णता, थंडी इत्यादि उत्पन्न करणें, अथवा नाहीं सारखीं करणें, पर्जन्य पाडणें, अवर्षण करणें, अनेक प्रकारचे उत्पात किंवा स्वास्थ्यें उद्भविणें, उत्पत्ति करणें, पालन करणें, संहार करणें इत्यादि समजावीं. जसा राजा प्रजेचें

पालन करतो, आई मुलाचें पालन करत्ये, किंवा कोणी जें कांहीं करितात; तें सर्व करणें, त्यांच्या रूपानें (प्रेर्य-रूपानें) ईश्वरच करतो. त्याप्रमाणेंच वरील देवतांचीं कामें त्यांच्या रूपानें (प्रेर्यरूपानें) तोच ईश्वर करितो, असें समजावें. ब्रह्मदेवाचें मुख्य काम उत्पत्ति करणें. विष्णूचें मुख्य काम पालन. शिवाचें मुख्य काम संहार. इंद्राचें मुख्य काम त्रैलोक्याचें राज्य करणें. सूर्याचें मुख्य काम प्रकाशादि करणें. चंद्राचें मुख्य काम शांत प्रकाश, वनस्पति, इत्यादिकांस उपयोगी पडणें. अग्नीचें मुख्य काम पाक करणें, देवादिकांस उपासकांनीं होमरूपानें अर्पण केलेले पदार्थ पोंचविणें. पितरांचें काम जे जे मनुष्य मरतात, त्यांच्या पुत्र, नातु, बंधु, स्त्री, इत्यादिकांनीं श्राद्धरूपानें त्यां प्रीत्यर्थ अर्पण केलेले पदार्थ ते मेलेले ज्या ज्या योनींत जन्मास गेले असतील, तेथें तेथें त्यांस त्यांच्या भोग्यवस्तुरूपानें प्राप्त करून देणें. एथें अशी दीर्घ कल्पना कोणी काढतील कीं, आमचें आंब्याचें किंवा दुसरें कसलें तरी झाड नुकतेंच लावलेलें आहे, त्यास पाणी घालण्यास आह्मीं दूरदेशीं असल्याकारणानें आह्मांस सवड नाहीं. तर ह्या श्राद्धरूप युक्तीनें त्या झाडाच्या नांवानें पाणी अर्पण केलें असतां, त्यास पोंचावें. तर या कल्पनेवर उत्तर. बावांनो, तुमची कल्पना दीर्घच खरी. अहो, सरकारानें कागदपत्र इत्यादि जिकडले तिकडे पोंचते व्हावे याकारितां पोष्टखातें आणि त्यावर कामदार नेमले आहेत. ते कायद्याच्या नियमाप्रमाणें ते कागदपत्रादि पोंचते करतील, त्या नियमाबाहेर कदापि पोंचविणार नाहींत. त्याचप्रमाणें मेलेल्यां प्रीत्यर्थ योग्य श्राद्ध-

रूपानें अर्पण केलेले पदार्थ, त्यांकडे पोंचविणें इत्यादि जो नियम ईश्वरानें बांधलेला आहे, त्याबाहेर त्या पितृदेवता कशा वागतील? नाहींच वागणार. अस्तु. यमाचें काम मेलेले प्राण्यांस धरून नेणें; त्यांच्या पुण्यपापाचा निवाडा करणें; व योग्यतेनुरूप स्वर्ग किंवा नरक देणें. इत्यादि मुख्य देवतांचीं कामें समजावीं. आतां उपदेवतांचीं कामें हींच कीं, त्यांनीं वरील ज्या मुख्य देवता सांगितल्या त्यांच्या आज्ञेप्रमाणें वर्तन करावें. पृथ्व्यादि पंचमहाभूतें चैतन्ययुक्त व ज्ञानी आहेत; त्याचप्रमाणें सूर्य, चंद्र, नक्षत्र, ग्रह, वैकुंठ कैलासादि गोलही चैतन्ययुक्त व ज्ञानी आहेत. अग्नि जो आपल्याला डोळ्यांनीं दिसतो तें अंग होय, व त्यांत त्या अंगाचा अभिमान धरणारा जो देवतारूपी आत्मा आहे तो हा अग्नि या शब्दानें वर्णित आहे. पहा, अग्नि अमुकाकडे गेला, अमुकाकडून आला, अग्नीची स्तुति वेदादिकांत केलेली आहे, हे सर्व प्रकार वर सांगितलेला जो अग्निरूपाभिमानी देवतारूपी आत्मा, तत्पर समजावे. ह्याचप्रमाणें स्पर्शरूप अंग, व त्याचयांत अभिमानी देवतारूप आत्मा, यालाही वायु ही संज्ञा आहे वरील अग्नि व वायु यांच्या सांगितल्या प्रकाराप्रमाणेंच अवशिष्ट पृथ्वी, आप् हीं भूतें व सूर्यादि गोल जे आहेत, तीं अंगें समजावीं. व त्यांच्यांत तत्तदंगाभिमानी देवतारूपी आत्मे, त्या त्या विशेष नांवांनीं वर्णित समजावे. चुंबकादिकाकर्षणशक्तीहून भिन्न व मुख्य जी गुरुत्वाकर्षण शक्ति, ती जर वरील गोलांतून आहे, तर त्यांच्यांत ज्ञानतत्व असलेंच पाहिजे. कारण गुरुत्वाकर्षणशक्तिरूप कार्याचें कारण, ज्ञानतत्व आहे. पृथ्वी ब्रह्मदेवाकडे गोरूप धरून गेली, ती कोण तर पृथ्वीगो-

ळांत तदभिमानी देवतारूप जो आत्मा, तो गो रूप धरून गेला, असें समजावें. याचप्रमाणें सर्व गोलादिकांविषयीं समजावें. वरील विचाराप्रमाणें सर्व गोलांतून आत्मे असून तेच अंशरूपांनीं आपल्या गोल रूपांवर देवतादिरूपांनीं मागें सांगितल्याप्रमाणें वास करताहेत, बाह्य जडरूपी जीं पंचमहाभूतें, तीं आंतील चैतन्याखेरीज न्यूनाधिक्यादि प्रकारांप्रत कशीं पावतील? नाहींच पावणार. एखादे वर्षी उन्हाळा विशेष झालेला नसून, पुढें पर्जन्य त्या मानापेक्षां अधिक पडतो. इत्यादि कालांत जो फेरफार होतो, तो होण्यास चैतन्य पाहिजे. उपदेवतागण जे विद्याधर, अप्सरा, भूत, प्रेत, पिशाचादि आहेत, ते दृष्टिगोचर जरी झाले नाहींत, तरी आहेत. कारण, गांवांतून, घरांतून, कधीं कधीं अतर्क्य गोष्टी घडलेल्या अनुभवास येतात. पिशाचादिक दाखवा, असें कोणी ह्मणेल तर, त्याविषयीं असा विचार आहे कीं, ते मुख्य देवतांचे ताबेदार असून, मनुष्याहून कांहीं विलक्षण त्यांची शक्ति पडली, यामुळें कोणी दाखविण्यास तयार जरी झाला, तरी ते दृष्टीस पड, किंवा नको पडूं, चमत्कार कर, किंवा नको करूं, असें ह्मटल्यानें तसे कहींत वागणारे नव्हत. जे नेहमीं उद्योगी, भगवद्भक्तींत तत्पर, शुचि, धैर्ययुक्त, परोपकारी, यांच्या वाटेस ते कधीं जावयाचे नाहींत. जारण, मारण, उच्चाटन, वशीकरणादि कांहीं प्रकार आहेत, त्या प्रकारांनीं उपदेवतागणांपैकीं कांहीं मंत्रतंत्रादिकांनीं प्रसन्न होणारे आहेत, परंतु प्रस्तुतकाळीं ते प्रकार बहुतकरून नाहींतच, असें समजलें पाहिजे. कितीएक लोक मंत्र, तंत्र, छांछूं करण्याच्या नादांत आहेत, पण त्यांच्यांत बहुतांशीं ठकवाठकवीच असते. कितीएक

पिशाचादि मुळींच नाहींत, असें ह्मणतात; पण त्यांच्या अस्तित्वाविषयीं कितीएक लोकांस अनुभव आलेले आहेत. पण लोकांची गोष्ट कशाला पाहिजे? मीं आपलीच सांगतों. माझा जन्म सचिवांच्या हद्दींत पडवळी गांवीं असून, मीं लहानाचा मोठा मुंबई इलाख्यांतील ठाणे जिल्ह्याचे ठाणे गांवीं झालों. व लहानपणीं विनायक पंतोजी यांच्या गांवठी शाळेंत जात असें. त्यांची ती शाळा एदलजी पारशी यांचीं रिकामीं दोन घरें जवळ जवळ अशीं, एक मोठें व एक लहान, खाटीक आळीच्या पुढें जवळच होतीं, त्यांत असे. एकेदिवशीं संध्याकाळीं परवाच्याच्या वेळेस लहान घरांत बसणारे सर्व मुलगे, नित्याप्रमाणें मोठ्या घरांत परवाचा ह्मणण्याकरितां गेले, त्यांत मीही गेलों. परवाचा आटोपल्यावर आपले रुमाल व पाट्या घेण्याकरितां पुन्हा लहान घराकडे आह्मीं सर्व आलों; तों त्याचीं दोन्ही दारें आंतील कड्या लागल्यामुळें बंद झालीं होतीं. दोन दारें ह्मणजे त्या घराला दोन खण. त्यांच्यामध्यें भिंत, तिला त्या दोन खणांत इकडून तिकडे जातां यावें, याकरितां एक दार होतें. त्यांच्या मागच्या आंगास भिंत, व बाहेरून आंत येण्याकरितां वर सांगितलेलीं दोन दारें, मिळून दारें काय तीं तीन. त्यांशिवाय चौथा मार्ग त्यांत नव्हता. असो. तीं दोन दारें बंद झाल्यामुळें आमच्या रुमाल पाट्या त्यांत अडकल्या. मोठाले मुलगे व पंतोजी यांणीं आंतील कड्या कशा लागल्या असाव्या, हा तपास लागण्याकरितां पुष्कळ यत्न करून, शेवटीं त्या दारांच्या बाहेरच्या कड्या लावून, कुलुपें ठोकून, ते व आह्मीं सर्व मुलें आपआपल्या घरीं निघून गेलों. मग दुसरे दिवशीं

सकाळीं मालकास बोलावून आणिलें, व त्यानें येऊन दारें हलकींच होतीं, पैकीं एक दार लाथ मारून हात आंत शिरेसें केलें, आणि आंत हात घालून कडी काढून, मग आंत जाऊन दुसऱ्या दाराची कडी काढली. आंत पाहिलें तो कोणीही नव्हतें. अशी ही माझी स्वानुभवाची गोष्ट आहे. तीवरून असें खास होतें कीं, या अंतरिक्षांत मनुष्यादिकांच्या दृष्टीस अगोचर असे सूक्ष्म देवयोनि प्राणी असावेत. त्याशिवाय वरील गोष्टीसारख्या गोष्टी कशा घडाव्या? नाहींच घडणार. वरील प्रकार घडला, तेव्हां माझें वय सुमारें दहा, अकरा वर्षांचें होतें, व हल्लीं पंचेचाळिसावें चाललें आहे. जारण, मारणादिक साधनें जीं आहेत, तीं मोठ्या महत्वाचीं आहेत, असें नाहीं. याकरितां त्यांत पडणें, प्रतिष्ठितपणा नव्हे. ईश्वराची आराधना करून, त्याच्या आज्ञेप्रमाणें कायावाचामनानें वागलें ह्मणजे, त्यांत सर्व उत्तम प्राप्ति आहे, असें समजावें. वर सांगितलेल्या देवता व उपदेवता इत्यादि सर्व ईश्वराचीं अंगें होत. ह्मणून उत्तम कर्ममार्गेंकरून त्यांची आराधना केली असतां, तींत त्या ईश्वराचा संतोष आहे; एरव्हीं नाहीं. पहा, आपलीं अंगें अस्वस्थ आहेत, आणि आपल्यापुढें कोणी एखादा डोळे मिटून, हात वर करून, उभा राहून, आपली प्रार्थना करील तर आपला संतोष होईल काय? कधीं होणार नाहीं. त्याप्रमाणेंच अंगदेवता व ईश्वर यांविषयीं समजावें. व मनुष्यादि सर्व प्राणीही त्याचींच अंगें होत. यास्तव त्या अंगदेवतांनीं पर्जन्यादिकेंकरून त्यांस संतुष्ट करावें; यांतही त्या ईश्वराचा संतोष आहे. याप्रमाणें परस्परांनीं

एकमेकांचा संतोष केल्यानें, ईश्वरप्रीति होते. येथें अशी शंका येईल कीं, केवळ ईश्वराची आराधना केली ह्मणजे झालें, अन्य देवांची कशाला हवी? तर असें आहे. राजा व राजाचे कारभारी, आणि विद्वान्, श्रीमंत इत्यादिकांची जशी आपण मानमान्यता, गौरवरूप आराधना जशी केली पाहिजे, तशी शक्त्यनुसार करितों, ती तरी काय ह्मणून करावी? फक्त ईश्वराची केली ह्मणजे झालें. तर असें ह्मटल्यानें व तसें वागल्यानें, राजादि जीं ईश्वराचीं प्रेर्यरूपें, त्यांस कोप येऊन, आपलें अकल्याण होईल. त्या प्रमाणेंच देवतारूपी जीं त्याच ईश्वराचीं प्रेर्यरूपें, त्यांसही कोप येऊन तो कोप आपल्या अकल्याणास कारण होईल. यास्तव शरीराचा अहंकार आहे, व त्या शरीरासह सर्व जग सत्य आहे, असें जोंपर्यंत आपण समजतों, व कामक्रोधादि रिपूंचा उदय आपल्या अंतःकरणांत जोंपर्यंत आहे, तोंपर्यंत, कर्ममार्गांत सांगितल्याप्रमाणें वागलेंच पाहिजे. अस्तु. कर्म दोन प्रकारचें. पुण्यरूप व पापरूप. पुण्यरूप कर्म तें हें. वेदशास्त्रांत सांगितल्याप्रमाणें आपल्या अधिकारानुरूप नित्य (स्नान, संध्या, पंचमहायज्ञादि, देवपूजा, भगवद्विचाराचें श्रवण, मनन, निदिध्यासन, इत्यादि), नैमित्तिक (मौंजीबंधन, विवाह, गर्भाधान, जातकर्मादि), परोपकार करणें, तीर्थयात्रा, ईश्वरध्यान, सत्समागम, कामक्रोधादि रिपु आवरणें, वृक्षारोपण, तलाव, विहिरी, धर्मशाळा बांधणें, विद्या, भूमि, जल, अन्नदानादि दानें सत्पात्रीं देणें, नास्तिकादि दुष्ट मतांचें खंडन करणें; आस्तिक जो श्रुति, स्मृति, पुराणोक्त सिद्धांत, त्याचें स्थापन करणें, ज्या पदार्थांच्या सेवनानें आपल्या सद्बुद्धीचे ठिका-

णीं असत्कल्पनेचा प्रवेश होतो, शरीरांत अस्वस्थता होते, मनाचे ठिकाणीं अति चंचलता प्राप्त होते, आणि अप्रतिष्ठितपणा प्राप्त होतो, त्या पदार्थांचें सन्मार्गास्तव वर्जन करणें, ईश्वर व तदंग देवता यां प्रीत्यर्थ होमहवनादि अहिंसायुक्त अनुष्ठानें करणें, इत्यादि. पापरूप कर्म तें हें. वर सांगितल्याच्या उलट वागणें. ज्यांच्या समागमानें बुद्धींत असत्कल्पनेचा प्रवेश, शरीरांत अस्वस्थता, मनाचे ठिकाणीं अति चंचलता, आणि अप्रतिष्ठितपणाची प्राप्ति, हीं घडतात, त्या मनुष्यांचा समागम करणें, इत्यादि. अशीं हीं वर सांगितल्याप्रमाणें पुण्यरूप व पापरूप कर्मैं समजावीं. पुण्यकर्मानें ब्रह्मज्ञानास योग्य अशी अंतःकरणशुद्धि, मोक्षप्राप्तीचा अधिकार येईपर्यंत उत्तम स्वर्गप्राप्ति, उत्तम पुनर्जन्म, व ब्रह्मज्ञान प्राप्त झाल्यावर, मोक्षाधिकार, इतकें प्राप्त होतें. व पापकर्मानें त्याच्या उलट होतें. पुनर्जन्माविषयीं असें आहे कीं; स्वस्वरूप जें सच्चिदानंद ब्रह्म, त्याचें ज्ञान होऊन वृत्तींची तन्मयता झाली नाहीं, आणि अज्ञानजन्य मी शरीर, स्त्रीपुत्रादि माझीं, अशी भावना जोंपर्यंत आहे, तोंपर्यंत वारंवार अनेक जन्म व त्या जन्मांत सुख किंवा दुःख किंवा दोन्ही-स्वर्ग व नरक-ही प्राप्ति आहेच. पहा, कोणी एखादा मनुष्यादि प्राणी जन्मतांच किंवा अन्याय किंवा सदाचरण यांवांचून दुःखेंकरून, किंवा सुखेंकरून, किंवा दुःखसुखेंकरून युक्त दिसतो. तर पापपुण्याखेरीज तसें कसें होईल? नाहींच होणार. जर पापपुण्यानें तसें खचित होतें, तर मागील जन्मींचें पापपुण्य असलेंच पाहिजे. कारण प्रस्तुतच्या जन्मांत पापपुण्य नाहीं, ईश्वराचें अस्तित्व व उत्पत्ति, स्थिति, लय ह्याच्या स्वाधीन. हें जर

सिद्ध आहे, तर पापपुण्यावांचून वाईट किंवा चांगली स्थिति तो कशी करील? कारण तो न्यायी आहे. यावरून मागील जन्म सिद्ध झाला. त्याचप्रमाणें पापपुण्याचें फळ भोगल्याशिवाय जर तो मरतो, तर तें भोगण्याकरितां पुनर्जन्म आलाच असें समजावें. कर्म करणें तीं अशीं करावीं कीं तत्संबंधीं देवता, ब्राह्मण, सुवासिनी, यांच्यापेक्षां आपला वरचढपणा कोणत्याही प्रकारानें होतां कामास नये. स्थल, द्रव्यादि पदार्थ व आपण व ऋत्विजादि शुचि असले पाहिजेत. जें जें साहित्य लागेल, त्याची त्याची तयारी वेळच्यावेळीं ठेविली पाहिजे. नम्रता असावी. धैर्य, इंद्रियमनोनिग्रह, आणि मनाचे ठिकाणीं शांति, इतके प्रकार असावे. न्यायार्जित द्रव्यापासून कार्यसिद्धि होईलच. अशी कर्मावर श्रद्धा, देवब्राह्मणांचे ठिकाणीं भक्ति, दीनांवर दया, असे हे शेवटले चार प्रकार इतके मुख्य आहेत कीं, त्यांशिवाय कर्म निष्फळ होतें, असें समजावें. ज्या कामनेनें आपण या प्रपंच घोटाळ्यांत वारंवार पडतों, त्या कामनेनें युक्त जें कर्म तें सकाम व ज्या कामनेनें आपण निष्पाप होऊन, त्या घोटाळ्यांतून सुटतों, त्या कामनेनें युक्त जें कर्म तें निष्काम असें जाणावें. काम्य कर्में न केलीं, आणि केवळ निष्काम कर्में केलीं, तरी दुःख दूर होऊन सुखप्राप्ति होते. परंतु अविचारी व अधिरे जे आहेत, त्यांना काम्य कर्में केल्याशिवाय राहवत नाहीं. वर कर्म करण्याचा जो प्रकार सांगितला, त्याप्रमाणें केलेलीं, व निष्काम जीं कर्में तीं सात्विक, बाकीचीं राजस तामस समजावीं.

## विशेष विचार.

एवढा वेळपर्यंत, कर्मकांडाचें विवेचन केलें. पण,

त्यांत, ब्राह्मणादि वर्णांच्या गुणांचे विवेचनांत, राजानें बंदोबस्त ठेविला, तर वर्णव्यवस्थेचे प्रकार नीट चालतील; एरव्हीं नाहीं चालावयाचे, असें दर्शविलें आहे. त्याचें मुख्य कारण असें आहे कीं, अनेक प्रकारचे लोक व त्यांच्या प्रकृतीही सत्व, रज, तम या त्रिगुणांप्रमाणें अनेक प्रकारच्या; यामुळें, त्या सर्व लोकांचें ऐक्य होऊन, परस्परांशीं उत्तम वर्तन झालें पाहिजे. तें होण्याला नियमन पाहिजे. तें नियमन जो करणारा, तो त्यांचा नियामक समजावा. परस्परांशीं उत्तम वर्तन घडल्यानें परस्परांस सुख प्राप्त होतें. तें जर, त्या नियामकाच्या योगानें होतें, एरव्हीं होत नाहीं, तर तो नियामक, त्या लोकांचा राजा होय. कारण प्रजेचें रंजन त्याच्या हातून होतें, आणि प्रजेच्या रंजनाशिवाय राजा हा शब्द लागू होणें नाहीं. अज्ञान जोंपर्यंत आहे, तोंपर्यंत, शरीरादि नानात्वाच्या योगानें अज्ञान्याला सुख वाटतें, त्याशिवाय, त्याला सुख वाटतच नाहीं, तें त्या नानात्वांत, परस्परांचा परस्परांशीं काल, देश, वर्तमानाप्रमाणें यथायोग्य योग झाल्याशिवाय नाहीं. यास्तव नाटकांतील सूत्रधाराप्रमाणें, वर सांगितलेला जो राजा, तो अवश्य असला पाहिजे. राजाचे प्रकार इतके समजावे. सुख देणारा तो राजा, " असें ह्मटलें ह्मणजे, " १ प्रत्येक मनुष्य आपले देहाची व्यवस्था नीट ठेवून, आपल्याला सुख करणारा. २ कुटुंबाची अनुकूलतेप्रमाणें व्यवस्था नीट ठेवून, त्यांतील मनुष्यांस सुख देणारा. ३ गांवांतील सर्व लोकांची व्यवस्था नीट चालवून, त्यांस सुख देणारा. ४ देशास सुख देणारा. ५ अनेक देशांना सुख देणारा. ६ सर्व पृथ्वीला सुख देणारा ( सार्वभौम ). इत्यादि. हे सर्व

राजे होत. जेवढ्या प्रदेशावर राजाची सत्ता, त्या बेतानें, द्रव्य व मनुष्यादिकांची साह्यता, त्याला आपल्या प्रदेशाची व्यवस्था राखण्याला, असली पाहिजे. व त्याचे आंगीं इंद्रियनिग्रह, मनोनिग्रह, दया, उत्तम विद्या, सद्विचार, इश्वरभक्ति, आत्मानात्मविचार, इत्यादि उत्कृष्ट गुण असलेच पाहिजेत. तसेंच त्याचे प्रधानादि जे मुख्य अधिकारी, त्यांच्याही आंगीं ते गुण असले पाहिजेत. ते जर नसले, तर त्यांचे हातून, जी व्यवस्था व प्रजेला जें सुख व्हावयाचें, तें नीट होत नाहीं; इतकेंच नव्हे, तर त्यांची स्वतांची सुद्धां सुखरूपता राहत नाहीं. याकरितां वरील सर्व अधिकाऱ्यांनीं, अगोदर ते उत्कृष्ट गुण संपादन करून, मग अधिकारांवर आरूढ व्हावें; ह्मणजे ठीक. आपले ताब्यांतील प्रजा व लहान मोठे कारभारी हे सर्व; आपण चांगलें वागल्याशिवाय चांगले वागणार नाहींत; असें राजांनीं समजावें. प्रजेची व्यवस्था राजानें ठेवणें ती अशी. प्रजेनें सद्धर्मानें ईश्वरास भजावें. कोणाला लुटूं नये, फसवूं नये. स्वच्छता राखावी. खाणें, पिणें, उठणें, बसणें, बोलणें, इत्यादि व्यवहार शुद्ध व बेताचे राखावे. निर्वाहाचे व परोपकाराचे उद्योग योग्य रीतीनें करावे. आपल्या वर्णाश्रमधर्माप्रमाणें वागावें. आपल्याहून जे श्रेष्ठ त्यांचा अपमान करूं नये, तर मान राखावा. बरोबरीच्यांशीं स्नेहानें व कनिष्ठ, दीन, दुर्बल, यांच्याशीं प्रेमानें व दयेनें; आणि सर्वांशीं निष्कपटपणानें, सद्धर्मानें व प्रेमानें वागावें. इत्यादि. राजानें प्रजेपासून, जमिनीवर व अन्य प्रकारानें धारा, कर, इत्यादि घेणें घ्यावयाचें तें, वरील व्यवस्था ठेवण्यास आणि शत्रु प्राप्त झा-

ल्यास, त्याच्या निवारणाकरितां अवश्य तितकें सैन्य तयार ठेवण्यास व विद्वान्, तपस्वी, साधु, आत्मनिष्ठ, दीन, दुर्बल, इत्यादि जे निराश्रित, त्यांच्या योग्यतेनुरूप पालनास व प्रसंगोपात अधिक गरज लागल्यास अडचण पडूं नये, याकरितां भांडारांत शिल्लक राखण्यास आणि आपला व आपले नेमलेले अधिकारी यांचा मानमरातब राखण्यास पुरेल, इतकें घ्यावें. राज्यांत पाण्याचा व धान्य, वस्त्रपात्रादिकांचा पुरावा, जाण्या येण्यास चांगले मार्ग, रोगांपासून व चोरादिकांपासून लोकांच्या शरीरांचें आणि मालमत्तेचें संरक्षण; काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर, भय, चिंता, आळस, इत्यादि शत्रूंपासून, त्यांच्या अंतःकरणाचें संरक्षण होण्याकरितां, सत्कथा श्रवण, मनन, निदिध्यासन, यांचे क्रम चालू ठेवणें, इत्यादि प्रकारांविषयीं राजानें हयगय अगदीं होऊं देऊं नये. राजानें दुसऱ्या राजाचें राज्य घेणें तें, तो राजा, राजा या पदवीपासून भ्रष्ट झाला आहे ह्मणजे, आपण कामादि रिपूंच्या स्वाधीन होऊन, प्रजेच्या पालनाकडे लक्ष पुरवीत नाहीं व एक दोन वेळां त्याला सूचना दिली असतांही ऐकत नाहीं, तर घ्यावें; एरव्हीं आपली भर करण्याकरितां घेऊं नये. परंतु तो जर पश्चात्तापानें सन्मार्गवर्ती होईल तर, अथवा त्याचा मुलगा किंवा अन्य कोणी वंशांतला, राज्यास योग्य असा असेल, तर त्याचे हवालीं करावें. आपले हाताखालीं राज्याचा बंदोबस्त करण्याकरितां प्रधान नेमावे ते असेः १ आपल्या वतीनें राज्याची सर्व व्यवस्था पाहणारा. २ सर्व प्रकारच्या वसुलाची व्यवस्था पाहणारा. ३ युद्धसंबंधीं फौजेचा अधिकारी. ४ राज्यांत चोरादिकांचा उपद्रव न व्हावा या-

करितां ठेवलेल्या फौजेचा अधिकारी. ५ देणें, घेणें, मारामारी, शिवीगाळ, चोरी, इत्यादिकांचा न्याय व बंदोबस्त करणारा. ६ कलाकुशलता, विद्या, यांची वृद्धि करून, राज्याला उपयोग करणारा. ७ धर्माचा विचार करणारा, वेदशास्त्रसंपन्न, स्वानुभवी विद्वान. ८ परराज्यांशीं अनेक प्रकारचा संबंध, त्याविषयीं व्यवस्था पाहणारा. ९ गुप्त बातम्या व विचार आणि राज्यसंबंधीं मसलती, एतद्रूप व्यवस्था बघणारा. १० मागील दाखले, कागदपत्र, इत्यादि व्यवस्था पाहणारा. याप्रमाणें कामदार नेमून, उत्तम बंदोबस्त ठेवावा. व त्या कामदारांच्या शाखा, देश, प्रांत, शहर, गांव, खेडीं, पाडीं, इत्यादि ठिकाणीं गरजेप्रमाणें वाढवाव्या. राजानें आश्रमधर्म, वर्णधर्म, व साधु, संत, बैरागी, गोसांवी, इत्यादिकांवर चांगली नजर ठेवावी. कारण, वरील रूपांनीं, चोर, ठक, शत्रूंचे गुप्त हेर, असले लोक; राजा व प्रजा यांस उपद्रव देऊं पाहतात. वर्णधर्म पूर्वीं थोडक्यांत सांगितले आहेत. आतां आश्रमादि धर्म सांगतों. आश्रम चार आहेत त्यांचीं नांवें; ब्रह्मचारी, गृहस्थ, वानप्रस्थ आणि संन्यास. गुरुगृहीं विद्या संपादन होईपर्यंत वास, भिक्षान्न सेवन, स्त्री, छानछुकी, मजा, इत्यादि मनमोहक व बुद्धिनाशक प्रकारांचा त्याग, गुरुसेवा, त्याची आज्ञा न मोडणें, स्नान, संध्या, इतके धर्म ब्रह्मचाऱ्याचे. विद्या प्राप्त झाल्यावर गुरूची आज्ञा ग्रहण करून, आपल्या योग्य, कुलीन, सदाचारी, स्त्री वरावी (विवाह करावा), पंचमहायज्ञ आचरावे. स्नान, संध्या, भगवद्भक्ति, सुविचार, परोपकार आणि निर्वाहाचा उद्योग न्यायानें करणें, इतके धर्म

गृहस्थाश्रम्याचे. अरण्यांत किंवा एकांतांत वास, दुःख सोसण्याची संवय होण्याकरितां, पंचाग्निसाधन, थंडीच्या दिवशीं पाण्यांत उभें राहणें, स्नान, संध्या, ईश्वरभक्ति, सुविचार, स्त्रीस्पर्श त्याग, कंद, मूल, फळें किंवा अल्पस्वल्प जें कांहीं योग्य अन्न मिळेल, त्यांत संतोष मानणें, इत्यादि वानप्रस्थाचे धर्म. आपलें अग्निहोत्र आपल्या जठराग्नींत स्थापून, सर्वसंगपरित्याग करावा. वेदांताचें श्रवण, मनन, निदिध्यासन, सर्व विश्व नारायणरूप आहे अशी ब्रह्माकारांत करणवृत्ति धारण करणें, इतके संन्याशाचे धर्म. त्यांत, शिखासूत्र, दंडयुक्त, कुटीचक, बहूदक, हंस, हे तीन भेद. शिखासूत्ररहित, दंडयुक्त, विविदिषु परमहंस आणि दंडरहित, विद्वत्परमहंस, असे चार भेद आहेत. फिरून गृहस्थाश्रमांत प्रवेश करतील, इत्यादि कारणांनीं, पहिले तीन भेद, कलियुगांत वर्ज्य. चौथा दोन्ही प्रकारचा ग्राह्य. विविदिषूंत, कर्म, श्रवण, मनन, निदिध्यासन, करणारे चार भेद. विद्वतांत, परमहंस, अवधूत, अत्याश्रमी आणि महापरमहंस, हे चार भेद. कुटीचक ह्मणजे अशक्त ह्मणून पुत्रबांधवादिकांनीं दिलेल्या जाग्यांत राहून, पूर्वगृहीं भोजन अथवा त्या पुत्रबांधवांनीं आणून दिलेलें भोजन करणें; आणि ब्रह्मविचार करणें. बहूदक ह्मणजे, भिक्षा मागून निर्वाह करणें; तीर्थयात्रा व ब्रह्मविचार करणें. हंस ह्मणजे भिक्षा मागणें, वेदांत श्रवण, मनन, निदिध्यासन करणें. हंसाप्रमाणेंच विविदिषुपरमहंस एकदंडी, परंतु शिखासूत्ररहित; त्यांत कर्मी ह्मणजे, संध्या, देवपूजा, तर्पणादि करणारा. श्रवण करणारा ह्मणजे, वेदांत श्रवण करणारा.

मनन करणारा, (मुनी) श्रवणाचें मनन करणारा. निदि-ध्यासन करणारा ह्मणजे, श्रवणमननांत, निश्चित झाल्याचें ध्यान करणारा. विद्वतांत परमहंस ह्मणजे, साक्षात्कार झालेला. अवधूत ह्मणजे, साक्षात्कारास न सोडतां, जसा कोणी भेटेल, त्याच्याशीं, तसा निगर्वीपणानें व प्रेमानें वागणारा. अत्याश्रमी ह्मणजे, आश्रमचिन्ह सोडून, बालोन्मत्त पिशाचादि वृत्तींतून, एखादीचें अवलंबन करून, स्वस्वरूपीं सावध राहणारा. महापरमहंस ह्मणजे, अत्याश्रमीच, पण जगावर परोपकार करण्याच्या संबंधानें, जशी वेळ येईल तशी वृत्ति धरून, ब्रह्मरूपतेंत स्थीर राहणारा. ही शेवटली पायरी, कृष्ण, ऋषभदेव, शंकर, दत्तात्रय, यांच्यासारख्यांसच योग्य. सन्याशानें, उपाधी न लागेल, स्वस्वरूपानुसंधान न सुटेल, अशा बेतानें; मोठें शहर, गांव, खेडें, पाडें, यांतून वास करावा. त्याचे मुख्य धर्म चार तेः स्नान (शरीरशुद्धि), शौच (अंतःकरण शुद्धि), भिक्षा, आणि एकांत (अद्वैत ब्रह्मसेवन), हे होत. याप्रमाणें सन्याशाचे धर्म समजावे. साधु ह्मणजे, कोणीही मनुष्य वाईट मार्ग सोडून, चांगल्या मार्गास प्रवृत्त झाला, व मुख्यत्वें ईश्वरभक्तींत काळ घालवितो तो. संत ह्मणजे, संन्यास घेण्याच्या पूर्वींच ज्याला ब्रह्मज्ञानाची प्राप्ति झाली आहे, यास्तव संन्यास घेण्याची गरज उरली नाहीं तो. बैरागी ह्मणजे, नाना-प्रकारच्या विषयोपभोगांची इच्छा सोडुन, निःसंग झालेला. गोसांवी (गोस्वामी) ह्मणजे, इंद्रियांचा मालक झालेला, याचा स्पष्टार्थ; इंद्रियें स्वाधीन ठेवून त्यांना कुमार्गाकडे न जाऊं देणारा. हे वरील साध्वादि प्रकार

सांगितले, ते, चार आश्रमांच्या अंतर्गत समजावे. ज्ञान प्राप्त झाल्यावर संन्यास घेणें न घेणें मर्जीवर आहे. ब्रह्मचारी आश्रमाचें कारण. ब्रह्म दोन प्रकारचें, एक शब्द-ब्रह्म आणि दुसरें परब्रह्म. शब्दब्रह्मांत निष्णात झाल्या-शिवाय परब्रह्मास पावत नाहीं; ह्मणून शब्दब्रह्म जे श्रुति, स्मृति, पुराणादि, यांची प्राप्ति प्रथम झाली पाहिजे; यास्तव, तें शब्दरूपी जें ब्रह्म, त्याचें अभ्यासरूप आचरण सांगितल्या नियमांप्रमाणें ज्यांत घडतें, त्या ब्रह्मचारी आश्रमाखेरीज अन्यांत घडत नाहीं. गृहस्थाश्रमाचें कारण, मनुष्याच्या अंतःकरणांत अनेक विषयवासना असतात, त्या एकदम जुलूम जबरी करून घालविणें दुर्घट; यासाठीं, सांगितल्या नियमाप्रमाणें त्या वासना अ-नुकूलतेप्रमाणें पुरवून, करीत करीत कमी कराव्या आणि त्यांत गर्क न होतां, सांगितल्या नियमाप्रमाणें ईश्वर-भक्ति, ज्ञान, यांकडे लक्ष लावावें. असें करणें गृहस्थाश्र-माखेरीज अन्यांत घडणें नाहीं हें. गृहस्थाश्रमांत मुख्य विषयवासना स्त्रीसंबंधीं होय, याकरितां विवाहित स्त्री खेरीज गृहस्थ नाहीं, असें समजावें. वासना पुरविण्याकरितां व धर्माचरण करण्याकरितां सुयत्न करून, द्रव्य संपादन करून, पंचमहायज्ञादि धर्माचरण व वासना पुरविणें हीं कृत्यें करावीं. त्यांत पंचमहायज्ञरूपानें परब्रह्म प्राप्ति, सत्कर्माचरण आणि परोपकार करीत असावें. पंचमहा-यज्ञ ते हे. वेदशास्त्रादिकांचें अध्ययन, होम, अतिथि संतोष, तर्पण, बळी. यांत वास्तविक पाहिलें तर, अध्य-यनेंकरून, प्रपंचपरमार्थरूप ज्ञान संपादन केलेलें; त्याची लक्षपूर्वक ईश्वरप्रीत्यर्थ आवृत्ति नित्य करून प्रपंचपर-

मार्थांत, विनचूक सावध राहणें, हा ब्रह्मयज्ञ. देवरूपी जे प्राणी त्यां प्रीत्यर्थ अग्नींत अन्नादि शुद्ध पदार्थांच्या आहुती देणें, हा होम. आपलेकडे भोजनादि समयीं, जे कोणी ब्राह्मणादि, भुकेले, तान्हेले, श्रमलेले, येतील; त्यांचा शक्त्यनुसार संतोष करणें, हा अतिथि यज्ञ. पितरादि जे प्राणी त्यांचा जलाहुतींनीं संतोष करणें, तसें तत्प्रीत्यर्थ श्राद्धादि करणें, हा पितृयज्ञ. आणि देवादि, भूतप्रेतादि, पशु पक्षी कीटकादि, या सर्वांस अन्नाहुती देणें हा बलीयज्ञ. वरील यज्ञांचा विचार केला तर, प्रपंचपरमार्थरूप ज्ञान संपादन करून, तद्द्वारा सर्व सृष्टि ब्रह्मरूप समजून, सर्व प्राणिमात्रांचा शक्त्यनुरूप संतोष करून, परमात्म्याची कृपा संपादन करून, त्याचे स्वरूपीं अनन्य व्हावें हाच मुख्यार्थ आहे. या पंचमहायज्ञांखेरीज नानाप्रकारचीं प्रायश्चित्तें, उपोषणें, व्रतें, नियम, यज्ञ, दानें, इत्यादि प्रकार गृहस्थाश्रमांत सांगितले आहेत; ते सर्व न्यूनाधिक्य पुण्य पापयुक्ततारूप अधिकाराप्रमाणें बाह्याभ्यंतर शुध्यर्थ आणि ईश्वरप्रीत्यर्थ होत. परंतु मुख्य मार्ग ह्मटला तर पंचमहायज्ञ होय; त्यांत सर्व उत्तम लाभ आहेत. वानप्रस्थाश्रमाचें कारण पुढें सन्यासाश्रमांत सुखदुःखाची बाधा होऊं नये याकरितां, दुःख सोसण्याची संवय; व स्त्रीपुत्र, गृहबांधव, संपत्त्यादिकांचा त्याग, हे दोन्ही प्रकार घडावे हें संन्यासाश्रमाचें कारण. जन्मास आल्याचें सार्थक जें कीं, स्वस्वरूप सच्चिदानंद परब्रह्म प्राप्ति, ती होण्याकरितां श्रवण, मनन, निदिध्यासनरूप, ज्ञानाभ्यास निर्वेधपणें व्हावा हें. वास्तविक धर्म ह्मणून जो कांहीं तो वर नुकताच सन्यासाश्रमानें दाखविलेला समजावा. बाकीचे धर्म,

भ्रष्ट होऊं नये व ईश्वरास विसरूं नये अशा बेतानें विषयांचें सेवन करावें; अशा रीतीचे, वैराग्य नाहीं झालें तोंपर्यंत या मनुष्यास लावलेले आहेत. विषयप्रीति जी आहे ती ब्रह्मचारी आश्रमापासून, तों वानप्रस्थापर्यंत, कमी करीत करीत अगदीं कमी होईसें करून, मग संन्यासाश्रम सांगितला. सारांश, कडकडीत वैराग्य झालें कीं संन्यास घ्यावा, ह्मणजे सर्व कर्मांचा त्याग करून, केवळ ब्रह्माभ्यासांत निमग्न व्हावें. आश्रम खुणा व वर्णखुणा ज्या आहेत त्या व अन्य खुणा या सर्व, कोण मनुष्य कोणत्या पद्धतीचा, जातीचा, इत्यादि जनभेद कळण्याकरितां होत. यज्ञ ह्मणजे कर्म तेणेंकरून, सोपाधिक अथवा निरूपाधिक जें परमात्मरूप त्याचा संतोष करणें आहे. सोपाधिकांत त्याचे अवयवरूपी ज्या देवता त्यांचा संतोष करणें आहे. त्या योगानें परमात्मा संतुष्ट होतो; यास दृष्टांतः कोणीही मनुष्य अथवा दुसरा प्राणी, त्याचा हात, अथवा पाय, किंवा अन्य अवयव, याचें आपण गौरव केलें तर, त्या प्राण्याला संतोष होतो. तद्वत्, इंद्रादि देवता ज्या, त्या परमात्म्याचे अवयवरूपी, त्यांचें योग्य रीतीनें गौरव केलें असतां, तो परमात्मा संतुष्ट होतो. लोकांत यज्ञ ह्मणजे, ज्योतिष्टोम, सौत्रामणि, वाजपेय, इत्यादि समजतात; परंतु तितकाच अर्थ नव्हे, तर वर यज्ञाचा विचार मी सांगितला त्याप्रमाणें समजावें. यज्ञ पुष्कळ प्रकारचे आहेत. ते: द्रव्ययज्ञ, तपोयज्ञ, योगयज्ञ, स्वाध्याययज्ञ आणि ज्ञानयज्ञ हे होत. देवता, मंत्र, ऋत्विज, यजमानादि मिळून, द्रव्ययज्ञ. इंद्रियनिग्रह, मनोनिग्रह करून उत्तम रीतीनें शक्त्यनुसार स्वधर्माचरण केल्याशिवाय न राहणें,

तपोयज्ञ. अष्टांगयोगेंकरून, वृत्ति स्वस्वरूपीं लीन करणें, योगयज्ञ. वेदशास्त्रादिकांचें अध्ययन, त्यांतील अभिप्रायाकडे लक्ष देऊन, तो समजत नसेल तर, नुसतेंच, ईश्वरप्रीत्यर्थ करणें, स्वाध्याययज्ञ. आपणासुद्धां सर्व विश्व रज्जुसर्पन्यायेंकरून, परमात्मरूप आहे, अशी मनाची समजूत होऊन, शम, दम, वैराग्यानें असणें, हा ज्ञानयज्ञ. याप्रमाणें मुख्यत्वें यज्ञप्रकरण समजावें. आतां हिंसायज्ञ ह्मणजे पशुयज्ञ त्याविषयीं विचार. हिंसा करणें ह्मणजे प्राण घेणें अथवा दुःख देणें असा अर्थ आहे. मग तसें कर्म ज्यांत आहे असा यज्ञ ईश्वर प्रीत्यर्थ कसा लागू होईल? आणि पशुयज्ञ तर वेदांत सांगितला आहे हें कसें? याचें उत्तर. क्षत्रियांनीं राज्य करावें असें आहे, तेव्हां क्षत्रियास (राजास) हिंसायज्ञ करण्याचा अधिकार, कारण, त्यानें प्रजेस तिच्या अपराधानुरूप शिक्षा केली तरी, तिला दुःखच होतें; व दुष्टांनीं त्याच प्रकारानें तिला दुःख दिलें तरी, तिला दुःखच होतें; पण दुष्टांनीं दिलेल्या दुःखास शिक्षा ह्मणणें नाहीं, व तसाच प्रकार अन्यायावरून, अन्याय करणाराला राजानें केला, तर त्याचें नांव शिक्षा. ती करण्याचा अधिकार क्षत्रियास ह्मणजे राजासच आहे. प्रजेचें पालन या संबंधानें दुसऱ्याचा प्राण घेणारा, अथवा त्या प्रतीचा मोठा अन्याय करणारा, अथवा तशा अन्यायास कारण, मनुष्य, घोडा, इत्यादि प्राणी (सप्त ग्राम्यपशूंपैकीं, अथवा सप्त अरण्य पशूंपैकीं) यांस राजानें सर्वदेखत सद्गति प्राप्त होईल अशी यज्ञरूप शिक्षा करण्याचा प्रकार, हा एक यज्ञ प्रकार. दुसरा कोणी देवादि शापेंकरून प-

शुयोनीस आलेले; त्यांना पूर्वयोनीची स्मृति तीमुळें ही योनी वाईट वाटून, ते राजांस किंवा ब्राह्मणांस आमचा यज्ञ करा ह्मणून शरण येत, त्यावरून त्यांचा यज्ञ ते करीत. तिसरा प्रकार. आपत्कालाचे योगेंकरून, कितीएकांस मांसादि भक्षणाची चट लागली, ती त्यांची सुटावी, पण एकदम कशी सुटेल? नाहीं सुटणार. यास्तव, त्यांना कांहीं नियम, संस्कार, लावून दिले; तोच मुख्य धर्म समजून, ते तसे वागूं लागले. चौथा प्रकार. मांसमद्याहारी लोकांची संगत लागल्यानें ज्यांना तें खावेंसें वाटूं लागलें, ते लोक यज्ञ करण्याचा शास्त्रार्थ दाखवून, व शब्दांचे हैसेप्रमाणें अर्थ करून, तसेंच, कलियुगांत यज्ञ करणारा क्षत्रिय कोणी नाहीं, तेव्हां आह्मीं ब्राह्मणांनीं यज्ञ न करावा तर कसें करावें, अशीं चमत्कारिक मतें लढवून, आपलें शेंपूट तुटलें तें साजरें करून दाखवून, आपल्या मालिकेंत पुष्कळ कोल्हे आणूं इच्छिणाऱ्या कोल्ह्याप्रमाणें, आपण एकदां त्यांत पडलों आतां तें साजरें करून दाखवून, कांहीं लोक आपल्या मालिकेंत दुसऱ्यांना आणूं लागले व ते दुसरे लोक त्यांच्यांत शिरूं लागले. अस्तु. मुख्यत्वेंकरून, पशुयज्ञ करण्याचा अधिकार पहिल्या व दुसऱ्या प्रकाराप्रमाणें क्षत्रियांसच व दुसऱ्या प्रकाराप्रमाणें क्वचित् ब्राह्मणांस आहे, मुख्यत्वें ब्राह्मणांस पशु यज्ञ नाहीं. देवसाळीच्या भातास पशु ही संज्ञा दिलेली आहे, ह्मणजे, त्यावरचीं कुसें तेच लोम, सालपट तें चर्म, इत्यादि; त्यांवरून पिष्टपशुही करूं नये असें झालें. धान्यादि शुद्ध पदार्थांचा होम करावा. मद्यमांसादि निषिद्ध पदार्थ भक्षणाची ज्यांच्या कुळांत चाल आहे त्यांनीं ती सोडावी हें उत्तम मा-

निलें आहे; मग ज्यांचे कुळांत ती चाल नाहीं, त्यांनीं नवीन चालू करणें हें सहजच नीच ठरलें. कांदा उळीचा मांसाशीं मिलाफ पावणारा व मांस खाणारांस तो लागतोच. तसेच दुसरे कांहीं पदार्थ असून, मुखास दुर्गंधी उत्पन्न करणारे इत्यादि, हे अगदीं वर्ज केले आहेत. मद्य, मांस, खाण्याची व पशु यज्ञ करण्याची ज्याला चटक त्या मनुष्यास दुसऱ्याला वाईट शब्द बोलण्यास व त्याचा प्राण घेण्यास अथवा त्याला दुःख देण्यास कांहीं कठीण नाहीं. अज ह्मणजे, वनस्पति व व्रीहि किंवा बीजें आणि आलभन ह्मणजे स्पर्श. वेदशास्त्रांत कांहीं विधि अवश्यक असून अज्ञानामुळें जनाच्या ध्यानांत येत नाहींत असे आहेत, जशी संध्या, अथवा वर्णाश्रमाप्रमाणें संध्येसारखे दुसरे प्रकार. कांहीं विधि, जनाला कांहीं प्रकार पहिल्यापासून ह्मणा, अथवा संगतीनें ह्मणा, त्यांत बहुशः संगतीनें प्रियकर, ते त्याचे कमी होऊन, ज्ञानवैराग्याकडे त्याचें लक्ष लागावें याकरितां, परंतु, तो संगदोष एकाएकीं उडवूं लागलें तर, श्रम व्यर्थ होऊन, फायदा होणार नाहीं याकरितां, बांधले आहेत; हा अर्थ मनांत न घेऊन शास्त्रानें जें लिहिलें आहे तें करण्याकरितांच असा अर्थ घेऊन, खेळ, स्त्रीविषय, मांस, मद्य, शृंगार करणें, यांत तत्पर होतात. कांहीं विधि, जन्मतः ज्या गोष्टी घडणाऱ्याच, जशी, निद्रा, बसणें, उठणें, बोलणें, खाणें, पिणें, इत्यादि; त्या करण्यांत जेणेंकरून, सुख होईल तसे बांधले आहेत. अस्तु. वरील विधींप्रमाणें विचार केला तर, श्रुति, स्मृति, पुराणांत, जे विधि आहेत, ते बरोबर आहेत; त्याप्रमाणें पाहिलें ह्मणजे, चोरून फुलें आणूनही, देवपूजा करावी

व शिमग्यांत विचकट शब्द बोलणें व काष्ठ चोरी करणें, करावें; असे जे शास्त्रार्थ आहेत, तेही बरोबर आहेत; परंतु नित्य फुलें वाहण्याचा नियम आहे आणि जर एखादेवेळेस कोणाजवळ मागून सुद्धां तीं मिळत नाहींत तर, देवापुरतीं चोरून आणून वाहावीं. याप्रमाणें थोडीं फुलें आणल्यानें मालकाचें अहित होत नाहीं. असा हा आपत्कालचा नियम समजावा. ज्यांना विचकट शब्द बोलण्याची हौस त्यांनीं शिमग्यांत बोलावें, पण त्या बोलण्यांत कोणाला इजा होऊं नये, व काष्ठ चोरी वरील फुलांप्रमाणें ह्मणजे काष्ठें न मिळाल्यानें होळी लावायाची राहत्ये व मागितल्यानेंही मिळत नाहींत तर, चोरावीं; असें जाणावें. हा शिमग्याचा विधि, बालिश, किंवा, विषयप्रीति ज्यांस आहे, त्यांस समजावा. हा विधि, विचकट शब्द बोलणारांची हौस व एक ढुंढानामक राक्षसी तिला झालेला शाप, असे दोन्ही प्रकार धरून, योजिला आहे. धर्माचा मुख्य अभिप्राय इतकाच कीं, कोणास इजा होऊं नये, ईश्वरसंतोष व ईश्वरप्राप्ति व्हावी, अमंगलता नष्ट व्हावी, परोपकार घडावे, इत्यादि, तो धरून पाहिलें असतां, शास्त्रांतील सर्व विधि बरोबर आहेत. ज्यांत दुसऱ्यास इजा आणि अमंगलता असून, ईश्वरप्रीति नाहीं व त्याची प्राप्ति नाहीं, तो विधि बरोबर नव्हे; असें समजावें. मौंजी संस्कार हा द्विजत्व प्राप्त होण्याचा आहे. संस्कार हा, जसा मणी संस्कारानें शोभा पावतो तशी शोभा देणारा आहे. तसाच गर्भाधान संस्कार स्त्रियांस लागू असून, सर्व संस्कारांचे अगोदरचा; कारण, गर्भाधान झाल्याशिवाय, पुत्र, कन्या यांची उत्पत्ति होत नाहीं, ती झाली ह्मणजे, पुढें, जातकर्म, नामकर्म, चौल,

द्विजत्वादि अंत्येष्टिपर्यंत, सर्व संस्कार होणारे, अगोदर नाहीं. सर्व संस्कार तरी, वेदाधिकार व वर्णाश्रम विभागांप्रमाणें, कोणास सर्व, कोणास थोडे, असे योजले आहेत; ते बरोबर आहेत. राजानें सर्व प्रजेंत वर्णाश्रमधर्माप्रमाणें शास्त्राला धरून, त्या त्या वर्णाश्रमांचे मनुष्यांची ओळख, हा अमुक वर्णाचा, अमुक आश्रमाचा, इत्यादि चटकन होईल, अशा खुणा सर्वांस कराव्या. उदाहरण ब्राह्मण ह्मटला ह्मणजे, सत्यगुणविशिष्ट इत्यादि लक्षणें धरून, शुभ्र गंध, शुभ्र यज्ञोपवीत. इत्यादि त्यास खुणा कोणाला लाल गंध कोणाला काषाय वस्त्र. कोणाला दुहेरी वस्त्र. दुहेरी वस्त्रानें, अग्नि संबंधानें व अन्य कांहीं प्रकारांनीं, धंदा करणारांच्या शरीरांस इजा होऊं नये, अशा सोयी धरून, तशा तशा, त्या त्या वर्णाश्रमाच्या मनुष्यास, त्याच्या धंदा किंवा स्वधर्माप्रमाणें सोयीवार, अधिकारानुरूप, उच्च नीच खुणा समजाव्या. दुहेरी वस्त्रवाल्यानें खिन्न होणें व एकेरी वस्त्रवाल्यानें त्यास कमी मानणें इत्यादि, यांत कांहीं हशील नाहीं. सर्व संकार, अधिकाराप्रमाणें व शक्तिप्रमाणें, लोभ सोडून व कर्ज किंवा हल्लींच्या खर्चानें पुढें ताणाताण न होई, असे करावे. विवाह संस्काराचे पुष्कळ प्रकार आहेत, परंतु, मुख्य प्रकार ह्मटला तर, चांगला, सुस्वभाव, सद्गुणी, इत्यादि श्रेष्ठ गुणांनीं युक्त जो त्यास, त्यापासून कांहीं न घेतां, आपली कन्या सालंकृत करून, विधियुक्त अर्पण करावी. व कन्या वरणारानेंही, ती, सुस्वभावादि चांगल्या गुणांनीं युक्त अशी पाहून, वरावी. दुसरा प्रकार. उभय पक्षांचें जमल्यावरून, त्यांनीं आपआपल्या मांडवाचा खर्च करून, विवाह करावा, वरपक्षानें, शक्त्यनुरूप, वधूस

वस्त्रालंकारादि द्यावें व वधुपक्षानेंही शक्त्यनुरूप वरास वस्त्रालंकारादि द्यावें. कन्याविक्रय करणें हा प्रकार वाईट होय. विवाहांत वधुवरांची जाती एक असावी हें उत्तम असून, कलियुगांत तोच प्रकार गृह्य समजावा. वाग्दानाचेवेळीं वरपक्षाकडून मिळालेलें द्रव्य आणि विवाहोत्तर, मुलीस भेटीस आल्यावेळीं, तिचे सासूनें, अथवा सासरा, मामा, इत्यादिकांनीं दिलेलें द्रव्य, किंवा कुळांतील चालीप्रमाणें, विवाहापूर्वी वरपक्षाकडून घेतलेलें द्रव्य, इत्यादिकांवर त्या मुलीचाच वारसा. दुसऱ्या कोणाचा नाहीं. तथापि, तिनें, आपला पति, सासू, सासरा, किंवा मातापितरादि, अथवा अन्य कोणी, आपत्कालांत सांपडल्यास, त्याप्रसंगीं योग्य खर्च त्यांतून करावा; कांहीं करूं नये. करील तर, अधर्मप्राप्ति खचित होईल. भर्त्यानेंही, धर्म, अर्थ, काम, या तिहींत; स्वशक्तिप्रमाणें तिला साह्य करून, संतुष्ट करावेंच. तिणेंही, त्याची अमर्यादा कदापि करूं नये, तरच, त्याचें अर्धे पुण्य प्राप्त होईल. फक्त बायको मिळाली, पगडी फिरवली, किंवा नवरा मनाजोगता मिळाला आणि अमर्याद वागलें, तर सहधर्माचें ( गृहस्थाश्रमाचें ) उत्तम फळ मिळणार नाहीं. कितीएक ठिकाणीं सांगतेबद्दल, शंभर, दोनशें, अशी संख्या लिहून, मग शक्तिप्रमाणें, असें ग्रंथांत असल्यामुळें मुंजीबद्दल शंभर ब्राह्मण जेवलेच पाहिजेत, असा बहुतेकांचा समज आहे, तो बरोबर नाहीं. पहा कीं, ज्याला शक्ति नाहीं, त्यानेंही, शंभर ब्राह्मण घालावे, असें जर शास्त्रकार ह्मणतो, तर त्याला विचार नाहीं असें होईल, पण शास्त्रकार तसा अविचारी नव्हे, तर, पूर्वी शक्तिप्रमाणें, असे शब्द यावयाचे ते पाठीमागून आले

इतकेंच, व ते तसें आल्यामुळें, ज्याला शक्ति नाहीं तोचं कमी घालील. एरव्हीं कोणी कमी घालणार नाहीं. लोकांचा समज खरा मानावा तर, आपल्या मुलाबरोबर, धर्मार्थ, गरीब मुलाची मुंज केली असतां, दोघांचेही शंभर शंभर ब्राह्मण घातले पाहिजेत; ते बहुतकरून कोणी घालीत नाहींत, यावरून व दोनशांचे पुढें अधिक घालणें, ते, शक्तिप्रमाणें, असें मानावें तर शंभर, दोनशें, घालण्यास लोकांना शक्ति आहेच, असें त्या शास्त्रकाराचें ह्मणणें झालें, परंतु, इतक्या शक्तीचे सर्व आढळत नाहींत; तेव्हां तो अंध असें ह्मणावें लागतें, पण तो, तसा नव्हे, असें त्याच्या सर्व विचारांवरून ठरतें, यावरून तो लोकांचा समज बरोबर नव्हे. एकापासून कोट्यावधिपर्यंत, किंवा, जितकें सामर्थ्य असेल तितकी शक्ति समजावी. द्विजकन्येचा पुनर्विवाह युगांतरीं होत असे, परंतु, त्याकालीं, सत्य, शौच, दया, ईश्वरभाव, हे धर्म लोकांचे ठिकाणीं कडकडीत असत, ह्मणून, इच्छा असल्यास करावा, असें शास्त्र लागू होतें. पांडव द्रौपदीसारख्यांच्या ठिकाणीं तर, ते सत्यादि धर्म फारच कडकडीत होते; यास्तव पांचांची एक बायको, एकीला दहा नवरे, असे शास्त्रार्थ कारणप्रसंगीं लागू केले होते. कलियुगांत ते धर्म जनांचे ठिकाणीं बहुतकरून नाहींत ह्मटलें तरी चालेल; यास्तव ते शास्त्रार्थ बंद केले आहेत. युगांतरीं तरी विवाहहोम झाल्याच्या पूर्वी मुख्यत्वें होत असे. शूद्रादिकांत तो होमप्रकार नाहीं ह्मणून, त्याकालीं व हल्लींही होत आहेत. प्रस्तुतकालीं ते शास्त्रार्थ बंद केले नसते तर, स्त्रिया दुसऱ्या चांगल्या पुरुषांशीं संधान बांधू-

न, विषादि प्रयोगांनीं भर्त्यांना मारल्या, इत्यादि अनर्थ घडले असते. पहा, बंदोबस्त आहे तरी, किती घोर कृत्यें घडत आहेत. कोणी कल्पना करितात कीं, पुनर्विवाह बंदी आहे ह्मणून बालहत्या, गर्भपात, इत्यादि अनर्थ होत आहेत; नाहीं तर न होते. तर त्यांनीं इतकाच विचार करावा कीं, ज्यांच्यांत बंदी नाहीं, त्यांच्यांत अनर्थांची उणीव कितपत आहे. अस्तु. विधवांनीं कसें वर्तावें याविषयीं जे नियम आहेत त्यांप्रमाणें राजानें व त्यांचे बांधवांनीं त्यांस वर्तविलें ह्मणजे, अधर्म घडणार नाहींत, तसें न वर्तविलें तर; हल्लीं ज्यांचे भर्ते आहेत, त्यांच्या हातून जसे छुपीनें अन्याय घडतात, तसे पुनर्विवाह ज्यांचा झाला, त्यांचे भर्ते असतांही, अन्य सुंदर पुरुषांकडे त्यांचें लक्ष जात नाहीं असें होणें नाहीं; तेव्हां त्यांच्याही हातून, छुपीनें अन्याय घडतीलच. एवंच अनर्थाचें मूळ उरलेंच. केवळ विषयसौख्यवियोगाचें दुःख पाहून, जर कितीएकांस विधवांचा कळवळा येतो तर, जिचा भर्ता क्लीबासारखा आहे, तिचा कळवळा त्यांना कां येत नाहीं? आणि असे कळवळे वारंवार सर्वांना येऊं लागले तर, परिणाम काय होईल तें सांगवत नाहीं. ज्यांना कळवळे येतात, त्यांच्यांत खऱ्या कळवळ्याचे क्वचितच; बहुतेक बाह्यात्कारीं मात्र कळवळा आणि अंतर्यामीं बाल विधवा, मध्यम विधवा, चांगल्या गुटगुटित, रूपवान्, इत्यादि प्रकारच्या बघून पुनर्विवाहाचा शास्त्रार्थ असता तर बरें झालें असतें, अशा हेतूनें झुरणारे होत. एका कालींही एका स्त्रियेस बहुत पति नसावे, कारण, ते सर्वच मुक्त्यार पडले यामुळें अनर्थच. पुरुषानेंही एक स्त्री मृत झाली, पण तिला संतति आहे तर

दुसरी करण्यांत आणि पहिली जिवंत असून तिला पुत्र कन्या होत आहेत, व ती दुष्ट, द्वाड, नाहीं तर करण्यांत इशील नाहीं. आतां पहिली चांगली आहे पण तिला संतति होत नाहीं, अथवा, ती मृत झाली असून, तिचीं मुलें लहान आहेत त्यांचें रक्षण करण्याची दुसरी तोड नाहीं, व गृहस्थाश्रमाचा आपला हेतु पुरला नाहीं तर, दुसरी केली असतां चिंता नाहीं. एक असतांना होस पुरी होत नाहीं ह्मणून, आणखी करणें तें फार विचारानें करावें, व हल्लींच्या काळांत तर एकाला एककालीं एकीपेक्षां अधिक, अथवा एक मृत झाल्यावर दुसरी, अशा रीतीनें पुष्कळ करण्याची मोठीच पंचाईत; कारण द्रव्यादि आणि शरीरसामर्थ्य, यांची बहुतांचे ठिकाणीं उणीव आहे. स्त्रिया तीन प्रकारच्या त्या ह्या. स्वस्त्री, परस्त्री, व साधारण स्त्री. स्वस्त्री उत्तम, परंतु तिच्याशीं तरी शास्त्रनियमानीं वागलें पाहिजे. साधारण स्त्री (पतिविरहित स्वच्छंद वर्तणारी शूद्र जातीची) मध्यम, ही स्त्री आपल्या निर्वाहार्थ दुसऱ्यांचा कामधंदा करणारी किंवा नृत्य गायन करणारी असून, मैथुनार्थ दररोज एक वेगळा, किंवा एक मृत झाल्यावर मग दुसरा, अशा रीतीनें पुरुषसहवास करणारी, व त्यापासूनही निर्वाहार्थ द्रव्य घेणारी समजावी. ही सुद्धां उत्तम विचारांनीं वागणारी समजावी. तशी नसेल व भ्रष्ट (निघून गेलेली) असेल तर, तिचें तोंड बघणें व नृत्य गायनार्थ तिला बोलावणें बरोबर नव्हे. परस्त्री सर्वथैव वर्ज समजावी. मध्यम स्त्रीकडे जाणें तें प्रवास आहे, किंवा स्त्री मृत झाली आहे अथवा अशक्त आहे आणि काम आवरत नाहीं, तर जावें; व प्रायश्चित्ता-

नें शुद्ध व्हावें, परंतु त्या जाण्यांतही शास्त्रनियम न सुटती-ल अशी योजना बहुतकरून असावी. राजानें प्रजेस अ-न्यायाबद्दल शिक्षा करावी ते अन्याय हे होत. दुसऱ्याचा जीव घेणें, त्याला ठकाविणें, शिव्या देणें, त्याची वस्त त्या-चे इच्छेवांचून जुलुमानें किंवा नकळत हरण करणें, पर-स्त्रीस भुलथापीच्या गोष्टी सांगून वश करणें, एकादी स्त्री दुसरीचे नवऱ्याला तिची नालस्ती सांगून, आपण त्याचें मन ओढून घेत्ये असें करणें, दुसऱ्यास इजा होईल असें करणें, प्रजेस व राजास उपद्रव होईल असा जमाव जमवि-णें, कांहीं आधार आहे त्या बळावर दुसऱ्याचे घेतलेले द्र-व्यादि पदार्थ, त्यांबद्दल नाकबूल जाणें, अथवा नाहीं देत जा ह्मणून जबरीनें सांगणें, योग्य कारणावां-चून व त्याचे इच्छेवांचून दुसऱ्याचे घरीं जाणें, शक्तिपेक्षां अधिक खर्च करणें, आपलीं वेदशास्त्र-पुराणोक्त स्वकर्मे न करणें, मद्यमांस सेवन, दुसऱ्याला पाखंडपंथास लावणें व आपण लागणें, खोटा कागद क-रणें, खोटी साक्ष देणें, असत्य भाषण करणें, रिकामटवळें गांवांत हिंडणें, ईश्वरास न भजणें, श्रेष्ठांची अमर्यादा क-रणें, चाहाडी करणें, कुंटणपणा करणें इत्यादि, त्यांचे बलाबलाचा व उद्भव हेतूंचा आणि तदनुसार लहानमोठे-पणाचा विचार करून, त्याप्रमाणें शिक्षा योजावी. क्षमा करण्यास पात्र आहे, तर एक दोन वार क्षमा करावी. कि-तीएक लोकांची चाल अशी असत्ये कीं, अधिकारावांचून दुसऱ्याच्या कारभारांत पडावें, याचें कारण, आपण स्वतां उद्योग करायाचा नाहीं, सकाळीं उठलें ह्मणजे गप्पा मा-रीत बसावें; याला चांगलें ह्मण, त्याला वाईट ह्मण, हा

धंदा. मौजा कराव्या. असें करितां करितां द्रव्य संपलें ह्मणजे, मग दुसऱ्याच्यावर डोळा, तेव्हां त्याच्या कारभारांत हात घालून, ढवळाढवळी करणें आलेंच. अस्तु. अशा प्रतीचे लोक अन्यायी व प्रजेस अन्यायमार्गास लावणारे समजून, त्यांचा चांगला बंदोबस्त करावा. स्थावर जंगम मिळकतीच्या वांटणीबद्दल नियम व न्याय करण्यांत, प्रजेला अन्नान्नगत न होई व खरा वारसदार चुरमुरे खात न बसे, अशी सूक्ष्म नजर ठेवावी. ज्या विधवेला मुलगा नाहीं तिला वांटा नाहीं; परंतु दत्तक घेण्याचा अधिकार आहे, तो घेतल्यावर वांटा मिळेलच. तिचा पति जिवंत असतां वेगळेपणा झालेला आहे तर, तो वांटा, तो मृत झाल्यावर तिच्याजवळ असावयाचा, किंवा त्यानें मृत्युपत्रासारखें पत्र केलें असेल, त्याप्रमाणें त्याची व्यवस्था व्हावयाची, अथवा ती मृत झाल्यावर तिच्या मुलीस तो हिस्सा मिळावा, मुलगी नसेल तर राजानें त्याची योग्य व्यवस्था करावी. पूर्वी विभाग झालेला नाहीं व मुलगा नाहीं व दत्तकही घेत नाहीं आणि सत्कालांत तत्पर आहे तर तिला, अन्नवस्त्र, राहण्यास जागा, आणि यात्रा करण्यास आश्रय, तिच्यापासून आपला कामधंदा करून घेतल्याशिवाय दायादांनीं दिलाच पाहिजे. जोंपर्यंत बाप जिवंत आहे व सन्मार्गवर्ति आहे, तोंपर्यंत मुलांस विभाग मिळूं नये. त्यांनीं सोळा वर्षांच्या पुढें स्वकमाईनें निर्वाह करावा, किंवा ती कमाई बापाजवळ देऊन एकत्र रहावें. बापाच्या मागें, त्यानें केलेल्या व्यवस्थेप्रमाणें विभाग करून सर्वांस सारखे द्यावे. बाप मुलाबद्दल खर्च करो अथवा न करो, तो आणि मुलगा वेगळे होणें अनुचित होय. बापाजवळ आणून दिलेली मुलांची कमाई वांटणीचे

वेळेस ज्याची जितकी शिल्लक असेल, तितकी त्याची त्याला मिळावी आणि वडिलोपार्जित संपत्ति समविभागानें मिळावी. प्रजेचे देण्याघेण्याची वहिवाट राजकागदोपत्रीं दाखल असावी असें माझ्या बुद्धीनें वाटतें. आणि तसें झालें तर, साक्षीपुराव्याचें कारणच नाहीं. मग, केवळ, जीव घेणें, शिव्या देणें, चोरी करणें इत्यादि, अशा-प्रकारच्या न्यायांत साक्षीपुराव्याचें कारण उरलें, तथापि, त्यांत सुद्धां सूक्ष्म नजर ठेविली पाहिजे. कां कीं असे गुन्हे करणारे बहुधां दुसऱ्याच्या देखत गुन्हे करीत नाहींत व या सबबीमुळें एखाद्यावर निरपराध कोणी एखादा फिर्यादही करील. अस्तु. गांव, मोठें शहर, खेडें, पाडें, यांतून पाण्याचा पुरावा, रोग निवारणार्थ वैद्याची योजना, राजनीति, लोकव्यवहार, धर्म आणि भगवद्विचार यांत पारंगत, निरभिमानी आणि देवाचे ठिकाणीं उत्तम भक्ति-मान् असून निस्पृह असले विद्वानांचें वास्तव्य, राजबंदो-बस्त, उतारूचे मानानें धर्मशाळा, देवालयें, लोकांचीं दुराचरणें बंद होऊन ते सदाचरणी होण्याकरितां उत्साह-निमित्तानें अथवा अन्य नियमित वेळ बांधून देवालयांतून किंवा दुसऱ्या योजलेल्या ठिकाणीं कथापुराणें, व्याख्यानें, द्रव्याचा पुरावा, इतके प्रकार अवश्य असावे. कथा, पुराणें, व्याख्यानें, त्यांचे वक्ते व श्रोते उत्तम रीतीनें वर्ततात, किंवा नाहीं, ही चौकशी होत जावी. त्याचप्रमाणें श्रेष्ठ, प्रतिष्ठित, विद्वान ह्मणविणारे, यांचीही चौकशी होत जावी. "सारांश, प्रजा कुबुद्धि सोडून, परस्परांशीं प्रेमानें वागेल, ईश्वरास न विसरेल, शरीरेंकरून व मनेंकरून सुखी होईल, अशा तजविजी असल्या पाहिजेत. राज्याचे

प्रकार तीन. ते असे, १ ला—सर्व मनुष्यें सदाचरण संपन्न, परस्परांशीं प्रीति करणारीं, ईश्वरभाव व ब्रह्मज्ञानयुक्त, मिळेल त्यांत संतुष्ट, निराळशी, इंद्रियनिग्रह व मनोनिग्रहसंपन्न, अशीं असलीं ह्मणजे त्यांना वेगळा नियामक जो पूर्वीं सांगितला त्याची गरज नसून, ते स्वतांच आपआपले नियामक. याप्रमाणें सर्वांची सर्वदा स्थिति, २ रा—वेगळा नियामक असून सर्व प्रजा त्याचें एक कुटुंब. प्रजेला जवळ द्रव्य बाळगण्याचें, किंवा मिळविण्याचें कारण नसून, जें जें लागेल तें तें अधिकाऱ्यांकडून घेऊन येत जावें, नको असेल तें तें त्यांकडे परत करीत जावें, कामधंदा, उद्योग कसा मिळेल, काय करूं, अशी चिंता करण्याची गरज नाहीं; राजानें सर्वांस गणधर्माप्रमाणें, विद्या, कला, कुशलता, यांत तरबेज होण्याची तजवीज करून, योग्यतेनुरूप धंद्यांत त्यांना योजावें. ३ रा ज्यांनीं त्यांनीं आपआपली व्यवस्था बघावी. राजानें त्यांच्यांत अव्यवस्था, तंटे बखेडे होतील, त्यांचा बंदोबस्त करून, स्वस्थता राखीत जावी. हा तिसरा प्रकार प्रस्तुत पण फार काल चालत आहे. शास्त्रापेक्षां रूढी बलवत्तर याचा अर्थ असा समजावा कीं, शास्त्रांत जो प्रकार दाखविलेला असतो तोच रूढींत असतो. परंतु जेथें अमुक प्रसंगीं कसें वर्तावें हें शास्त्राच्या सामान्य नियमांवरून, किंवा संक्षिप्त लेखांवरून, ध्यानांत येत नाहीं, त्याप्रसंगीं शिष्टाचार पाहून, त्याप्रमाणें चालावें. शिष्टाचार रूढी समजावी. गणिताचे पुस्तकांत क्षेत्र मोजणी कशी करावी, ती रीति दाखविलेली असून, बहुत प्रकारचीं उदाहरणेंही दिलेलीं असतात; पण प्रसंगोपात बुद्धि कमी असल्यामुळें

त्या उदाहरणांहून वेगळीच तऱ्हा एखाद्या मोजणीच्या प्रसंगीं वाटते आणि कशी मोजणी करावी तें समजेनासें होतें अशा वेळीं, ज्याच्या हातून कैक मोजणीचीं कामें होऊन गेलीं आहेत, त्याच्या स्वानुभवानें त्याच निराळे तऱ्हेचे ठिकाणीं युक्ति बसलेली असते, पण ती सूक्ष्मदृष्टीनें पाहतां गणित पुस्तकांतील रीतीस अनुसरूनच असते, अशी जी युक्ति, ती गणितसंबंधानें रूढि होय. या गणिताच्या दृष्टांतानें शिष्टाचार (रूढि) शास्त्राला सोडून नसते. जी रूढि शास्त्राला सोडून असते, ती असमजदारांच्या योगानें चुकून चालत आलेली असते. यास दृष्टांत वैश्वदेव कर्मांत अग्नीचें आवाहन असून, बहुतेक लोक त्याचें विसर्जन करीत नाहींत, अशी रूढि बहुत दिवस चाललेली आहे. पण न्यायानें ती खरी ठरत नसून, अशी रीति स्थापन करण्यांत शिष्टांना कांहीं कारणही नाहीं, आणि चाललेली तर आहे, ती चुकीनें असें समजावें, व खरी रूढि कोणती आणि खोटी रूढि कोणती याचा विचार वरप्रमाणें करीत जावा. व जेव्हां रूढि (वहिवाट) वावगी वाटेल आणि करावें काय व न करावें काय हा विचार पडेल, तेव्हां शास्त्र प्रमाण धरून, त्याचा विचार करून तसें वर्तन करावें हेंच मुख्य. अस्तु. एवढ्यावेळपर्यंत कर्मकांडाचा विचार दाखविला. त्याप्रमाणें मनुष्यांकडून आचरण घडलें म्हणजे, त्यांच्या अंतःकरणाची शुद्धि होऊन, त्या अंतःकरणांतील दुष्ट भाव दूर होऊन, तें स्वच्छ होतें. तसें झाल्यावर, त्यांतील परमात्म्याचें प्रतिबिंब जो जीवात्मा, त्याचा बिंबभाव लक्षांत येतो आणि त्याकडे तो जीव विषयसंग सोडून, सप्रेम तन्मय होऊं इच्छितो. को-

णी ह्मणेल, कर्मानें अंतःकरणशुद्धि कशी ? तर असें आहे कीं, एखाद्याला नुसतें कोसभर जाऊन ये ह्मणून सांगितलें, तर तो कंटाळेल. पण त्यांतच अशी योजना केली कीं, अमुक ठिकाणीं अमुक गृहस्थ परम दयाळू व समर्थ आहे, त्याची भेट घेऊन, अलीकडे बाग आहे त्याची चौकशी करून, अमक्याला अमुक निरोप सांगून ये, तर तो तितका न कंटाळतां, तो कोस त्या कार्यामुळें सहज निघून जाईल. या दृष्टांतांतील कांहीं देशांप्रमाणें संध्या, देवपूजा, उपवास, दान, तीर्थयात्रा, इत्यादि कर; पण तीं करतांना क्रोध, कपट, मत्सर, चिंता, काम, इत्यादींकडे लक्ष देऊं नको. असें करशील तरच तीं कर्मे सिद्ध होतील, असें सांगितलें असतें. कर्माखेरीज नुसते क्रोधादि आवरण्याला व सर्वभूतीं एक परमात्मा आहे असा भाव बसून, त्या भूतांचे ( प्राणिमात्रांचे ) ठिकाणीं प्रेम नसण्याला कठीण. मुलांस औषधाचे वेळीं जशी गूळ, साखर इत्यादिकांची योजना, तशी, ज्यांचें मन कर्माकडे लागत नाहीं, त्यांचें तें लागावें ह्मणून, स्वर्गादि फलप्राप्ति सांगितली आहे.

---

## भाग ३ रा.

### उपासनाकांड.

पूर्व-कांडांत कर्मधर्मसंबंधी विचार केला. त्यांत कर्मानें अंतःकरणशुद्धि होऊन, जीवास स्वस्वरूप जो परमात्मा त्याच्या रूपीं तन्मय होण्याची इच्छा होते, असें सांगितलें आहे. त्याप्रमाणें तो मनुष्यरूपी जीव त्या परमात्म्याच्या सेवेविषयीं उत्सुक होतो. त्याकरितां परमात्म-

प्राप्तीस्तव जो आराधनेचा प्रकार त्याचें विवेचन ज्यांत आहे, त्या भागास उपासनाकांड अशी संज्ञा आहे. उपासना दोन प्रकारची. एक सगुण, व दुसरी निर्गुण. सगुण उपासना ह्मणजे गुणरूप जी सृष्टि तिचें सामिप्ययुक्त जी त्याच परमात्म्याविषयीं उपासकाचे वृत्तीची भावना, जी अनेक प्रकारची तद्रूप क्रिया. निर्गुण उपासना ह्मणजे गुणरूप जी सृष्टि तिचें सामिप्य जिच्यांत नसून, सत्य निर्विकार निर्गुण परमात्म्याचेंच अनुसंधान केवळ बुद्धिवृत्तीचे ठिकाणीं ज्या उपासकाचें असतें; त्या उपासकाची ती वृत्तिरूप क्रिया. आतां दोहीं तऱ्हांच्या उपासना करणारे ते दोहीं तऱ्हांचे उपासक होत. पण तसतशी उपासना करण्याला तसतसें ज्ञान पाहिजे. त्याशिवाय त्या होणें नाहींत. तें होण्याला गुरु पाहिजे. तद्द्वारा तें ज्ञान होऊन मग उपासना घडावयाची. गुरूचा प्रकार असा आहे कीं, जितका अधिकार शिष्याचा तितक्या बेतानें गुरूनें उपदेश करावा. ह्मणजे ज्याला मुळींच कांहीं मार्ग ठाऊक नाहीं, व समजूतही कमी, त्याला पंचायतनांतून इष्टदेवतेची सगुण रूपानें बाह्य उपासना सांगावयाची. ती ज्याची झाल्यासारखी आहे, त्याला सगुणच पण मानसिक (अंतरुपासना) सांगावयाची. ती ज्याची झाल्यासारखी आहे त्याला सगुणच पण साक्षीज्ञानरूप उपासना (केवलांतर) सांगावयाची. ती ज्याची झाल्यासारखी आहे, त्याला एक अद्वैत सच्चिदानंद प्रकृतीहून पर निर्गुण जें ब्रह्म (अंतर्बाह्यरहित) तेंच तूं आहेस अशी "अहंब्रह्मास्मि" ज्ञानरूप उपासना सांगावयाची. अशा रीतीनें अधिकारी शिष्यास तद्वदुपदेशाधिकारी गुरु आपल्यास ज्ञान कमी यास्तव आपल्यास बोध करून

तडीस नेणारा जो आपल्याहून अन्य तो आपला गुरु किंवा आपले ठिकाणीं संशय उत्पन्न होतात, ते ज्या विचारानें खंडन पावून आपलें समाधान होतें, तो विचार गुरु. जसें मंकीनें स्वविचारानें श्रेष्ठ पद मिळविलें. दत्तांनीं आपण होऊन चोवीस गुरु केले. व लक्ष्मण अर्जुनादिकांनीं रामकृष्णादिकांस शरण जाऊन, त्यांनीं केलेल्या बोधाचें मनन करून आपण समाधान पावले. व्यवहारज्ञान व परमात्मप्राप्तिज्ञान अशीं दोन प्रकारचीं ज्ञानें समजावीं. व व्यवहारज्ञानाचा बोधक तो गुरु, व परमात्मप्राप्तिज्ञानाचा बोधक तो सद्गुरु समजावा. कारण परमात्मप्राप्तिज्ञान सर्व ज्ञानांत श्रेष्ठ होय. अशासाठीं कीं, अनेक प्रकारचीं व्यावहारिकज्ञानें त्यांचा आदिकारण जो परमात्मा तो जर त्यांहून श्रेष्ठ तर, त्याला जाणण्याचें जें ज्ञान तें त्या ज्ञानाहून श्रेष्ठ. गुरु हा शब्द कधीं कधीं सद्गुरु या शब्दाचे ठिकाणींही लोक लावितात. सद्गुरु भेटणें, किंवा आपल्याच ठिकाणीं तत्तुल्य विचार उत्पन्न होणें, हें ईश्वरी कृपेनें घडणारें आहे. पण वास्तविक जे गुरु आहेत, ते, हल्लीं लोकांत बहुत गुरु आहेत तसे नव्हत. हल्लींचे गुरूंचे प्रकार आहेत, त्यांचें मुख्य लक्षण आपल्या नादीं लोकांना लावून त्यांपासून द्रव्य काढण्याकडे नजर ठेवणें व अशा युक्तीच्या डावपेचांत न येणारा त्याच्याशीं जितक्यास तितकें वागावयाचें, हें होय. तें लक्षण धरून ते गुरूंचे प्रकार पहा. कोणी रेशीमकांठी धोतरें, चकचकीत छाट्या, भ्रुकुटिस्थानीं शेंदराची छानदार आडवी रेषा लावलेली, घोटा पिऊन किंवा गांजा ओढून डोळे लाल झालेले, कधीं जटाधारण, कधीं नुसती शेंडी, जवळ त्रिशूळ उभा केलेला,

मंत्र तंत्र छांछूं अहेतच; मधून मधून सुस्कारा टाकून जगदंब, जगदंब असा उच्चार, इकडे जेवणीच्या दोहों बाजूंच्या कोंपऱ्यांतून विडा तंबाखूच्या प्रवाहाची लिकीर. असे कोणी गणपतिभक्त, कोणी शिवभक्त, भस्म लावणारे, घोटा विटा आहेच; कोणी वाममार्गी, मद्यमांस, जारकर्म, इत्यादिकांची लैलूट, कोणी आंगांत वारें आणणारे, कोणी भारलेल्या ताइत्या, भूर्जपत्रें, पेट्या, वनस्पति, आंगारे धुपारे देऊन पोरें देण्याच्या, भुतें घालविण्याच्या, द्रव्य काढण्याच्या कामीं झटणारे, असे. इत्यादि गुरुरूप धारण करून त्यासारखें शोभलें पाहिजे, ह्मणून थोडेंसें पंचीकरण माहीत करून ठेवितात. कोणी कांहीं वेदांतसंबंधी वाक्यें व श्लोक पाठ करितात. सारांश, आपले मताला जेणेंकरून बळकटी येईल, अशी तयारी थोडीबहुत ते सर्व गुरु राखितातच. भगवीं वस्त्रें, कुबडी, तप्तमुद्राधारण करणारे वैष्णवादि त्यांतलेच समजावे. अशा प्रकारचे गुरु यांचा डामडौल सत्यशील वास्तविक विचारी मनुष्याशीं गांठ पडली नाहीं, तेथपर्यंतच. तशाशीं गांठ पडली कीं, ते क्रोध, मौन, अप्रीति धारण करणारे. असल्या गुरूंपासून समाधान तर व्हावयाचें नाहीं, उलटे संताप उत्पन्न करणारे असें सहज लक्षांत येईल. मी ह्मणतों ते गुरु कसे असतात ते पहा. वरील कपटगुरूंप्रमाणें त्यांचा डामडौल कांहीं नसून, सत्यशील, श्रीमंत गरीब, आपल्याला देणारा न देणारा, कठोर बोलणारा, सौम्य बोलणारा, अपमान करणारा, मान करणारा, इत्यादि सर्व समान मानणारे, पंचायतनांतून कोणाची तरी एकाची एकनिष्ठपणें आराधना करणारे, पण बाकीच्यांशीं द्वेष न करितां स्नेह-

देवताच ते आहेत असें पहाणारे, ही आराधना तरी जगास भक्तिमार्ग लावण्याकरितां करणारे, एरव्हीं एक अद्वैत परब्रह्म परमात्मा तदाकारवृत्तीनें सर्व जग अवलोकन करणारे; स्वतां उद्योग करून अथवा याचना करून निर्वाह करणारे; परंतु चवींकडे व छानीकडे ज्यांची नजर अगदीं नसल्ये; केवळ निर्वाह मात्र मिळविण्याकडे नजर ठेवणारे; शिष्यादि जे कोणी सद्विचार संपादन करण्याच्या संबंधानें जवळ असतात त्यांच्याशीं मात्र वाजवी कारणानें अथवा लोक संग्रहास्तव लोकांना चांगला मार्ग लागावा ह्मणून, क्रोधादिकांचें अवलंबन करणारे; परम दयाळू पण दयेचा डौल घालून अपात्रीं दया करणारे, असे नव्हत. इत्यादि जीं हीं लक्षणें सांगितलीं, तिहींकरून युक्त असे होत. मुख्यत्वेंकरून शिष्याची तळमळ घालवून त्याला शांति उत्पन्न करणारे, त्यांपासून द्रव्यादि हरण करणारे नव्हत अशा सद्गुरूस शरण जाऊन देव जो परमात्मा त्याची उपासना करावयाची. परंतु देव कोणता तो विचार असा. कितीएक देव पुष्कळ आहेत, असें समजतात. कितीएक मुख्य देव तो एक आहे, असें मानतात. कोणी तो निराकार ह्मणतात. कोणी निराकारही आहे; आणि साकारही आहे, अशी कल्पना करितात. कोणी पाणी ज्या रंगांत मिळून जातें त्या रंगानें भासतें, तद्वत् देव निर्गुण, निराकार असून, देव, मनुष्य तिर्यगादि उच्च, नीच प्रकृतींत भरला आहे, ह्मणून तत्तद्रूप भासतो; यास्तव सम आहे असें समजतात. कोणी सर्व विश्व देवरूप आहे, परंतु त्यांत देव प्रकृतींत शिव, विष्णु, गणपति, सूर्य, देवी, या पांचांतून आपल्या आवडीप्रमाणें

प्रत्येकास किंवा सर्वांस श्रेष्ठ मानितात. कोणी तर आणखीं जोगाई, मल्हारी, मारुती, चेडोबा, बाबदेव, इत्यादि ज्याला जसें समजलें, व आवडलें त्याला त्याला धरून बसले आहेत. आतां देव अथवा देवी या शब्दानें, द्योतन करणारा अथवा करणारी, असा जो वास्तविक अर्थ तो धरून पाहिलें ह्मणजे, आपआपल्या अधिकारानुरूप कार्य-कारणाचें द्योतन करतात. ह्मणून राजाही देव, ब्राह्मणही देव. राजस्त्री, ब्राह्मण स्त्री, श्रेष्ठ स्त्री, देवी, इंद्रादि, विष्ण-वादि देव, शचि, लक्ष्मी, पार्वती, सावित्री, इत्यादि देवी. असे हे उच्च नीच सर्व अधिकारांप्रमाणें देव होत. तेव्हां देव पुष्कळ खरे. परंतु सर्वनियामक, सर्वज्ञ, सच्चिदानंद-स्वरूप, असा जो प्रकृति अधिष्ठाता पण प्रकृति आपल्या कार्यासह ज्याचे ठिकाणीं रज्जुसर्पन्यायेंकरून मिथ्या. प्रकृति सत्य मानली तर, प्रकृतिनियामक, सर्वज्ञ, सर्व-साक्षी, त्यालाच शैव, विष्णु, देवी, गणपति, सौर इत्यादि पुराणांत शिव, विष्णु, देवी, गणपति, सूर्य अशीं नांवें आहेत. ह्मणून कोणालाही अमुक श्रेष्ठ, अमुक कमी, असें ह्मणण्याला जागा नाहीं. आतां, वेदशास्त्र पुराणांत, त्या पांचांपैकीं अमुक अमक्यापेक्षां श्रेष्ठ, अमुक अमक्याला शरण गेला, असे कमी जास्तीपणाचे भाग आले आहेत. ह्मणजे शिवपुराणांत विष्णु शिवाला भजतात. रामायणांत शिवांनीं रामाची स्तुति केली. गणपतिपुराणांत, व देवी-पुराणांत, ब्रह्मा, विष्णु, महेशादि गणपति व देवी यांस शरण गेले. विष्णु व शिवपुराणांत लक्ष्मी, पार्वती, या विष्णु व शिव यांच्या चरणांची सेवा करताहेत. सौरपुराणांत, सूर्य सर्वांत श्रेष्ठ, इत्यादि प्रकार कमी अधिक मानण्याला

आहेत. तें असें आहे. प्रकृतिनियामक, सर्वज्ञ, सर्वशक्तिमान्, मायाशबल, सविशेषब्रह्म तूर्यस्थ जो ईश्वर, तो त्या त्या पुराणांत शिव, विष्णु, गणपति, देवी, सूर्य या नांवांनीं समजावा. व त्याला शरण जाणारे ह्मणजे, रामायणांत रामाची स्तुति करणारा शिव, तमोगुणाची देवता. व शिवपुराणांत शिवाला भजणारा राम, किंवा विष्णु स्वप्नावस्थात्मक मिश्र सत्वगुणाची देवता. वर जो ईश्वर सांगितला, तोच रामायणांत राम, व शिवपुराणांत शिव, गणेशपुराणांत गणपति, देवीपुराणांत देवी, सौरपुराणांत सूर्य, आणि विष्णुपुराणांत विष्णु. याप्रमाणें पुराणांतला व्यासांचा अभिप्राय आहे. याप्रमाणें त्या त्या पुराणांत, तूर्यस्थ ईश्वर जर राम शिवादि नांवांनीं आहे, तर तूर्यावस्थेहून कनिष्ठ ज्या सुषुप्ति, स्वप्न, जागृति अवस्था, तत्संबंधी ज्या राम शिवादि देवता त्या भजक आणि तूर्यस्थ राम शिवादि भज्य, हें अर्थात सिद्ध झालें. याकरितांच रामायणांतला राम, तूर्यस्थ ह्मणून भज्य; व त्याची स्तुति करणारा शिव सुप्त्यवस्थात्मक ह्मणून भजक. याचप्रमाणें बाकीचीं इतिहास पुराणें यांचे अभिप्राय समजावे आणि वाद सोडून स्वस्थ व्हावें, व पांचांतून कोणत्या तरी एका नामरूपानें ईश्वरास भजावें. पण पांचही एक आहेत, ही समजूत दृढ असूं द्यावी. एथें अशी शंका येईल कीं, एकाकालींच कमी शिव, श्रेष्ठ शिव, कमी विष्णु, श्रेष्ठ विष्णु, कमी राम, श्रेष्ठ राम, इत्यादि प्रकार कसा संभवेल? तर याचें उत्तर असें आहे कीं, ज्या काळांत ईश्वरानें शिव या नामरूपानें सृष्टीचा उत्पत्तिस्थितिलयरूपी खेळ केला, त्याहून भिन्न कालीं विष्णु या नामरूपानें

तसा खेळ केला. व आणखीं अन्यकालीं तो जो ईश्वर त्याचा पूर्णावतार राम हा झाला. सारांश, भजक जे राम शिवादि ते अंशावतार, किंवा अंशांशावतार, अथवा कलावतार, किंवा कलांशावतार, असें समजावें. व जे भज्य, ते पूर्णरूप समजावे. अस्तु. वर जो प्रकृतिनियामकादि विशेषणांनीं युक्त ईश्वर सांगितला, तो विद्यामायोपाधि होय. व तोच अविद्योपाधि, समष्टि व्यष्टि जीवरूपी समजावा. निराकार ईश्वर याविषयीं असें आहे कीं, अगोदर निराकार ह्मणजे आकाररहित. कोणी शून्यालाही निराकार ह्मणतात, पण शून्य ह्मणजे वस्तूचा अभाव. जर वस्तूच नाहीं, तर निराकार विशेषण विशेष्य वस्तूखेरीज कसें लागू होईल? यास्तव ईश्वर शून्य नव्हे. ही पंचमहाभौतिक सृष्टि हिचा नियामक, अर्थात् नियम्याहून नियामक वेगळा असून नियम्याकडे जडत्व, अज्ञानत्व, असलें पाहिजे, व नियामक चैतन्य ज्ञानवान् असला पाहिजे, तरच नियम्य नियामकपणा लागू होतो. आतां तो ईश्वर जर ज्ञानवान्, चैतन्य असा आहे, तर ज्ञानाला आकार काय? कांहीं नाहीं. ह्मणून निराकार ह्मटला आहे. फिरून साकार कसा तो पहा. साकार ह्मणजे आकारासहवर्तमान. यास्तव जेथें नियम्य आकार तेथेंच नियामक ज्ञानवान् चैतन्य, असा परस्परांचा योग आहे, ह्मणून ईश्वर साकारही समजावा. वरील विचारानें जीवही निराकारच, पण शरीरास धरून लोक त्याला साकार मानतात; परंतु तो निराकार नाहीं, असें जें त्यांचें समजणें ही भोंपळ्याएवढी चूक होय. आपण जे जीव, त्या आपल्याला केवळ साकार मानून,

ईश्वरास मात्र निराकार समजतात. त्या समजणारांचें निराकाराविषयीं ज्ञान विलक्षण समजलें पाहिजे. निराकार, साकार, आणि आकार असे तीन प्रकार झाले. त्यांत निराकार ह्मणजे निर्भेद्य, अपरिमेय, सच्चिदानंद ब्रह्म, (द्वैताद्वैतातीत ज्ञान.) साकार ह्मणजे ज्ञानशक्तियुक्त आकार सूक्ष्म, स्थूल, दोन्ही देह मिळून, या साकारांत ईश्वर, आणि जीव हे दोन्ही प्रकार समजावे. आकार ह्मणजे केवळ अचेतन पदार्थ. हे वर सांगितल्या प्रकाराप्रमाणें निराकारादि तीन प्रकार समजावे. रज्जुसर्पन्यायेंकरून, आकार व साकार हे दोन मिथ्या आणि निराकार सत्य. पण हा निराकार रस्त्यांतील विलक्षण दगड व प्राण्याचें मन इत्यादिकांसारखा नव्हे. तो दगड व तें मन इत्यादिकांस परिमेयत्व आहे; अर्थात् आकार आहे. इतकेंच कीं, तो आकार कोणत्या प्रतीचा आहे हें सांगतां येत नाहीं, यास्तव त्यांनांही निराकार मानलें आहे. पण खरोखर निराकार अपरिमेयच. सृष्टीची उत्पत्ति, स्थिति, लयकर्ता ईश्वर, व तदधीन जीव, हे दोन्ही साकार होत. कारण त्यांच्या विद्यारूप मन, व अविद्यारूप मन, या ज्या उपाधि, त्या आकार आहेत. व ते आकार ज्ञानशक्तियुक्त आहेत. आतां ते आकार कोणत्या प्रतीचे आहेत, हे सांगतां येत नाहीं; ह्मणूनच त्या आकारांनीं युक्त ज्या ज्ञानशक्ति, ह्मणजे ईश्वर व जीव, यांस निराकार ह्मटलें तरी शोभतें. तथापि सत्य निराकार तो त्यांहून वेगळा. या आद्य निराकाराला धरूनच, ईश्वराचें वर्णन व जीवास बोध तूं निर्गुण, निर्विकार सच्चिदानंद, परिपूर्ण ब्रह्म आहेस, असा श्रेष्ठ पुरुष करितात. हें

करणें यथार्थ होय. यासाठीं कीं, अधिष्ठान रज्जुच सर्परूप भासला आहे, याकरितां त्या सर्पाला तूं रज्जु आहेस असें ह्मटलें, तर विलग होत नाहीं. जसा कोळी हा किडा आपल्या पोटांतून सुतेरा बाहेर काढितो व गिळितो, तसा ईश्वर आपल्या विद्यारूप प्रकृतिपासून उच्च नीच सृष्टि उत्पन्न करितो, आणि ती क्रमानें गिळितो. या करण्याचेंच नांव उत्पत्ति व प्रलय असें समजावें. स्वस्वरूप निराकार अधिष्ठानानें साकारांतील ज्ञानशक्ति, व प्रकृति अधिष्ठानानें आकार मिळून जड चैतन्यरूप सृष्टि, ईश्वर आपणच झाला आहे. तेव्हां सर्व सृष्टीच देव आहे. पण तींत ब्रह्मा, विष्णु, शिव, इंद्र, चंद्र, वरुणादि जे आहेत, ते भज्य; व मनुष्यापर्यंत जे कमी पायरीचे ते भजक, असा प्रकार झाला आहे. भज्य जे आहेत त्यांच्यांत ज्ञान, क्रिया, आणि प्राण, यांच्या शक्ति विशेष आहेत. तितक्या कमी पायरीचे जे त्यांच्यांत नाहींत. स्थावरांतही तुलसी, वट, पिंपळादि पूज्य आहेत; याचें कारण श्रेष्ठ देवता कांहीं कारणांनीं तदाकार झाल्या व त्या आकारांजवळ त्या मुख्यरूपानें वास करून योग्य असेल तर भजकाचें कार्यही करितात. सर्व सृष्टींतील उच्च, नीच, साकार, जर ईश्वर त्रिगुणात्मक, प्रकृत्यनुरूप झाला आहे, तर तो समही होय. अस्तु. याच कांडांत पूर्वी सांगितल्याप्रमाणें सद्गुरूपासून शिष्य उपदेश ग्रहण करितात. त्याप्रमाणें ज्याची जशी समजूत पडते, व जसा विश्वास बसतो, त्याप्रमाणें ह्मणजे प्रकृति जगत्कार्यासह मिथ्या जर आहे, तर तिचा नियामक ईश्वर सेव्य व मी सेवक, आणि सेवा, ही त्रिपुटी मुळींच सत्य नाहीं. एक अद्वैत सच्चिदानंद परब्रह्म सत्य

आहे. पण तें आहे किंवा नाहीं हें ह्मणणें, आणि ह्मणणाराही त्या वेगळे सत्य नाहींत. अशा वृत्तीनें निरंतर राहणारा हर्षशोकरहित जो तो श्रेष्ठ उपासक समजावा. दुसरा स्वकार्यासह प्रकृति व तिचा नियामक सेव्य ईश्वर, मी सेवक व त्या ईश्वराची सेवा निरंतर करणें, हेंच उचित सेवा ह्मणजे शांति धारण करणें, देव, भक्त, शत्रुमित्र, दीन, इत्यादि ईश्वरच नटला आहे यास्तव भेदबुद्धि मुळींच न बाळगणें, हर्षशोकरहित असणें ही जी सेवा तीच ज्याची पुष्पधूपदीपादि पुजेचीं द्रव्यें असा तिसरा अनंतकोटिब्रह्मांडात्मक जें विश्व, तेंच ज्याचें रूप, ज्याचे सूर्य, चंद्र, पृथ्वी, अंतरिक्षादि नेत्र, मन, पाद, नाभी, इत्यादि अवयव होत. जो एक असून नानारूपी नटला आहे, व नानाप्रकारचे कारभार, शत्रु, मित्र, आप्त, ज्ञानी, अज्ञानी, राव, रंक, या भेदांनीं करितो आहे; अशी त्याची लीला समजून, आपण स्वतां प्रसंगाप्रमाणें वर्तन करणारा असून, शांतवृत्ति असा चौथा प्रकृतिनियामक जो ईश्वर त्यानेंच जीवप्रकृति उत्पन्न करून, तींत जीवरूपानें आपण प्रविष्ट आहे. तेव्हां सर्व जीवांप्रमाणें मीही या देहामध्यें तोच जीव आहें, असें लक्ष ठेवून, होतील तितके परोपकार व स्वतां पदार्थांचा शुद्धरीतीनें उपभोग आणि मर्यादेनें वागणें, हें तत्प्रीत्यर्थ करणारा असा. पांचवा त्या ईश्वराची निरवयव अथवा सावयव शिव, विष्णु, देवी, गणपति, सूर्य, यांच्यासारखी किंवा त्यांच्या अवताररूपांसारखी पाषाण, मृत्तिका, काष्ठ, धातु, स्फटिकादिकांची किंवा वस्त्राची, अथवा भिंतीवर किंवा कागदावर काढलेली आकृति किंवा अग्नि, सूर्य, नर्मदेंतील व गंडकी गो-

मती इत्यादिकांतील पाषाण, किंवा तशी मनानें कल्पिलेली मूर्ति, तिची पूजा शक्तिप्रमाणें, शुद्धरीतीनें, मनोभावानें, स्नान, वस्त्र, अलंकार, गंध, अक्षता, पुष्प, धूप, दीप, नैवेद्यादिकेंकरून षोडशोपचारें निष्कपटपणें करणारा, व माझ्यासुद्धां सर्व सृष्टींत जो व्यापक ईश्वर तोच या मूर्तींत आहे, अशी भावना ठेवणारा, आणि शास्त्रमर्यादेचें उल्लंघन न करणारा, सद्वृत्ति असा. कोणी शंका काढतील कीं, मूर्तींत कोठें देव असतो काय? जर आहे तर आह्मीं अर्पण केलेले अन्नादि पदार्थ स्वीकारीत कां नाहीं? ह्मणजे अन्न खात नाहीं, फुलें हुंगीत नाहीं, इत्यादि असें कां? मूर्तीला दिसतें कोठें? सगळे लटुपटीसारखे तिचे अवयव. तिच्यावर कावळे, चिमण्या इत्यादि पक्षी बसतात, हागतात, तींत देव असता तर तो त्यांना आपल्यावर बसूं हागूं देता काय? आपल्यादेखत लोकांना विचकट शब्द बोलूं देता काय? तो निराकार ह्मटला आहे तर, त्याची मूर्ति निरर्थक समजली पाहिजे, इत्यादि याचें उत्तर असें आहे कीं, सर्व सृष्टींत ईश्वर व्यापक जर आहे, तर बाबांनो, मूर्तींत त्याची व्याप्ति आलीच. कान, नाक, डोळे, इत्यादि अवयवांवांचून तो ऐकतो, वास घेतो, पाहतो, इत्यादि कारभार करितो, असा सिद्धांत आहे. तर मग त्याला अर्पण केलेले पदार्थ ह्मणजे, मूर्तिव्यापकाचेपुढें अर्पिलेले पदार्थ तो श्रवण करितो, हुंगतो, खातो, इत्यादि सिद्ध आहे. पण आणखीं असें वाटेल कीं, श्रवण करणें, हुंगणें, हीं राहूं द्या; अर्पण केलेलीं फळें, अन्नें हीं जशींच्या तशींच असतात, तेव्हां खातो हें कसें सिद्ध होतें? तर ऐका. खाणें ह्मणजे पोटांत गेलेलें अन्न जठराग्नीनें पचन होऊन

त्याचा रस होऊन तो शरीरांत भिनून तें शरीर सतेज सशक्त होणें असें समजावें. देवाची मूर्ति पाषाणादिकांची असते, आणि ती नेहमीं जशीच्यातशीच राखलेली असते, यास्तव अर्पण केलेल्या अन्नादिकांनीं तिच्या पुष्टीची जरूर नाहीं. आतां भक्तांनीं अर्पण केलेले ते पदार्थ खाल्ले पाहिजेत, ह्मणून देव ते नुसते हुंगतो. विधींत हुंगणें, हें भक्षणादाखल मानलें आहे यामुळें ते जसेच्यातसेच प्रसादार्थ असतात. पांखरांनीं तिजवर बसणें, हागणें, मुतणें, तिजपुढें मूर्खांनीं विच्कट शब्द बोलणें, इत्यादि प्रकार देवाची मूर्ति करा, अथवा न करा, सर्वव्यापक या सिद्धांतानें त्याला लागून आहेतच. कार्यकारणभावाचा पक्का विचार केला ह्मणजे विवर्तउपादानकारण कार्याच्या आदि, मध्य, अंत या तिहींत असतेंच. त्याप्रमाणें विवर्तउपादान परमात्मा स्वकार्य जें जगत् तद्रूपी आहेच. जगत् हा आकार आहे. त्यांत आणखीं जगत्कल्याणार्थ त्याचे अवतार प्रगट झाले आहेत. त्यांच्या प्रतिमा करून लोक पूजितात. आणि त्या अवताररूपांनीं केलेलीं कार्यें तत्पर, अनेक भाषांनीं ह्मणजे वेदोक्त, पुराणोक्त, प्राकृतादिकांनीं त्यांची स्तुति करितात, त्या कार्याचा विचार करितात, व दुसऱ्यांनाही सांगतात. सृष्टीच जर नसती, तर ईश्वर आहे, अथवा नाहीं, असें ह्मणणारा तरी कोण? त्यानें सृष्टिरूपांत अवताररूपें प्रगट केलीं, याचें कारण, तसें जर न केलें, तर लोकांनीं मला स्मरावें कसें? माझी स्तुति कशी करावी? व तसें करतां आलें नाहीं तर, त्यांनीं तरावें कसें? हा विचार मनांत आणला. सर्व विशालबुद्धि नसतात. मंद बहुत. असें समजून उच्च,

नीच असे भजनाचे अनेक विधि बांधले. मूर्तीवर पक्षांनीं बसणें, हागणें, मुतणें, इत्यादि प्रकार अज्ञांच्या अलक्ष्यानें घडतात. ह्मणून किंवा अन्य प्रकारांनीं देवाची मूर्ति करणें, वाईट अशा ह्मणण्यांत कांहीं जीव नाहीं. जशी एखाद्या नामांकित मनुष्याची तसबीर करून ठेवलेली असते. त्याप्रमाणेंच ईश्वरी अवतारांच्या मूर्ति करण्याची रीति आहे. ईश्वर सर्वांस पूज्य ह्मणून त्याची अवतार प्रतिमाही पूज्य समजावी. मूर्तीचे अवयव लटुपटीसारखे असोत, अथवा खरे असोत, तींत व्यापक जो देव तो अवयवांनीं किंवा अवयवांवांचून सर्व करण्यास समर्थ आहे. त्याला प्रसंगानुसार लटुपटीचे अवयव खरेखुरे करण्यास कांहीं अवघड नाहीं. तसबिरीकडे पाहून, त्या नामांकित पुरुषाचे गुण जर तो पाहणारा वर्णन करतो आहे, व त्याला स्मरून त्या तसबिरीचें गौरव करतो आहे, तर तें करणें पाहून, त्या नामांकित पुरुषास कोप कधींही येणार नाहीं. त्याचप्रमाणें जगत्कार्यार्थ सप्रकृति (साकार) जो ईश्वर त्यालाही मूर्तीचे संबंधानें कोप येत नाहीं. आनंदच होतो. असो. वर उपासनाकांडाविषयीं विचार सांगितला. आतां तद्विषयीं विशेष विचार. पहिली सांगितलेली उपासना श्रेष्ठ व पुढील चारी एकीपेक्षां एक पायरीनें कमी कमी समजाव्या. व अधिकाराप्रमाणें ह्मणजे समजूत किंवा विश्वासाप्रमाणें त्यांतील एकीचें सेवन करावें. अशा रीतीनें वरिष्ठ पायरीला पोंचावें. योग्यतेवांचून जर वरिष्ठ पायरीला हात घातला, तर फळ कांहीं नसून, दंभ व हानि मात्र आहे. उपासना करणाराला इंद्रियनिग्रह, मनोनिग्रह, ईश्वराचे ठिकाणीं प्रेमळ भाव, व तदाकार मनाची एकाग्रता, ती न साधेल तर प्राणायामादि प्रकारां-

चा अभ्यास करून ती साधणें, कोणाशीं कठोरपणा न करणें, दंभ, मत्सर, काम, क्रोधादि रिपु आंवरणें, इत्यादि उत्तम प्रकार संपादन केलेच पाहिजेत. उपासना या शब्दानें नेहमीं ईश्वराजवळ तन्मय व तत्पूज्य मनोवृत्तीनें असणें, असें समजावें. सगळ्या दिवसांतून किंवा कधींमधीं एखादवेळ थोडेंसें स्मरण झालें, आणि दंभार्थ मोठ्यानें नारायण, नारायण, गजानन, गजानन, शिव, शिव, शिव, शिव, इत्यादि ह्मटल्यानें ह्मणजे उपासक होतो, असें समजूं नये. आराधनेंत मद्यमांसाची मुळींच जरूर नसून उलटें ते पदार्थ देवाचा कोप होण्यास कारण होत. वाममार्गादि मार्ग कर्मकांडांत देवी इत्यादिकांचे आराधनेंत आहेत ते वेदशास्त्र पुराणांविरुद्ध असून, ते आचरण करणारांस जातीपावनता नाहीं. बहिष्कृतता आहे. व वेदादिकांस धरून जेथें मद्यमांसादि पदार्थ देवी इत्यादिकांस अर्पण करण्याविषयीं कर्मकांडांत आहे, तेथें देखील ब्राह्मणांखेरीज जे कोणी ते पदार्थ खाणारे असतील, त्या लोकांस धरून आहे. तथापि हा प्रकार देखील वरील वाममार्गादिक जे मार्ग त्यांसारखा नव्हे. कारण ते मार्ग विपरीत आहेत. अस्तु. भक्ति ह्मणजे देवाची आवड. तिचें लक्षण कसाही प्रसंग असो, व कोणताही कारभार असो, त्या ईश्वराचें स्मरण व त्यामुळें कर्तेपणाचा अभिमान न बाळगणें, व दुसऱ्याला तुच्छ न करणें, अवश्य जो व्यवहार तो त्याची प्रार्थना करून करणें, व ह्या सांगितलेल्या प्रकारांत किंचित् सुद्धां हयगय होऊं न देणें. कदाचित् विसर झाला, तर मनाला भय व वाईट वाटून लगेच त्याला शरण जाणें. व पुन्हा तसें

न होण्याविषयीं प्रार्थना करणें. आत्मवत् सर्वभूतीं अव-
लोकन करणें, ह्मणजे आपल्याला जसें दुःख होतें, तसेंच
दुसऱ्याला होतें. व आपल्याला जसें सुख पाहिजे, तसेंच
दुसऱ्याला पाहिजे, असें जाणणें आणि सर्वभूतीं ईश्वर
समान व्यापक आहे असें समजून, सर्वांशीं प्रेमानें व निष्कप-
टपणानें वागणें, ईश्वराचे गुणानुवाद सप्रेम ऐकणें व वर्णन
करणें, त्याचें नामस्मरण व नामोच्चार करणें, आणि यथाश-
क्ति त्याला प्रिय अशी त्याची पूजा उत्सवादि करणें, हें
होय. हाच भक्तीचा जिव्हाळा जाणावा. अशा भक्तीनें युक्त
असून, नम्र व गुरूचे ठिकाणीं ईश्वरतुल्य भाव ठेवणारा,
त्यालाच शरण आल्यास अधिकाराप्रमाणें गुरूनें उपदेश
करावा. वर उपासनेचे प्रकार सांगितले आहेत, परंतु ईश्व-
राचे ठिकाणीं सप्रेम भक्ति ह्मणून जी नुकतीच वर सां-
गितली, तिच्यापरती अन्य उपासनाच नाहीं, असें सम-
जावें. कारण वरील उपासनांत ती भक्तीच मुख्य आहे.
त्यांतही भगवन्नामस्मरण व नामोच्चार पराकाष्ठेचींच श्रेष्ठ
समजली पाहिजेत. पहा नामस्मरण व नामोच्चार यांवाचून
व्यवहारच नाहीं. त्या प्रमाणेंच ईश्वरप्राप्तीरूप जो व्यवहार तो-
ही नामस्मरण व नामोच्चारावांचून होणें नाहीं. कोणाचेंही नाम
घेऊन हाक मारिली असतां, तो नामाधिपति ती हाक ऐकून,
मला कोण हाक मारितो, इत्यादि आपले ठिकाणीं विचार क-
रितो व योग्य असेल तर हांक मारणाराचें कार्य करण्यास
शक्तिप्रमाणें झटतो. थट्टा किंवा कपटानें हाक मारितो,
असें वाटल्यास न ऐकल्यासारखें करितो. तसाच ईश्वर
आपलें नांव घेणाराविषयीं तत्पर आहे. तो सर्वांचे अंतर्बाह्य
व्यापक आहे, ह्मणून हळू किंवा मोठ्यानें अथवा अगदीं

हळू मनांत ) त्याचें नांव घेतलें असत त्याला तत्काळ ऐकूं जातें. एखादा मनुष्य दुसऱ्याला कांहीं कार्यार्थ हाक मारितो आहे, व ज्याला तो हाक मारितो, त्याचें नांव तेंच आपलें नांव जर आहे तर, त्या हाकेनें आपल्यालाही वाटतें कीं, आपल्याला कोणी हाक मारितो आहे. विचाराअंतीं त्या हाक मारणाराचें कार्य आपण करण्यासारखें असून, ज्याला तो हाक मारितो, तोही त्याला भेटत नाहीं, असें आहे तर आपण त्याचें करितों. तसाच ईश्वरही अन्य निमित्तानें ह्मणजे मुलगा, बांधव, स्त्री, दास इत्यादिकांचे उद्देशानें हाका मारल्या असतां तीं नांवें आपलीं घेतो आहे, असें समजून त्या घेणारावर कधींना कधीं तरी कृपा करितोच. आतां मुद्दाम ईश्वरोद्देशानें प्रेमयुक्त नाम घेणारास त्याची कृपा सुलभ आहे. कसेंही असो, नाम घेणारानें सत्य, दया, ईश्वरभाव, परस्त्री मातेसमान, इत्यादि पथ्यें अन्य साधनें करणारांप्रमाणें संभाळलीं पाहिजेत. तथापि नामांत व अन्यकर्मांत भेद आहे, तो असा कीं, शुचि असो, अशुचि असो, किंवा कसाही असो, नाम घेण्यास मोकळीक आहे; व नामाशिवाय कोणतेंही पूजा यज्ञादि कर्म घडणें नाहीं. आणि नामानें मला कोणी हाक मारितो आहे, अशी ईश्वराचे ठिकाणीं प्रेरणा होते, व तिच्या योगानें तो नाम घेणाराविषयीं लौकरच विचार करितो. कलियुगांत अन्य साधनें करण्यास कलीण यास्तव पाहिजे तेव्हां व कोणत्याही काळीं घेण्यास योग्य असें ईश्वराचें नामच मुख्य समजावें, व अन्य युगांतही नाममहिमा नाहीं असें समजूं नये. व प्रायश्चित्तांतही नामस्मरणासारखें व नामोच्चारासारखें श्रेष्ठ प्रायश्चित्त दुसरें नाहीं. अस्तु. वर सांगितलेल्या भक्तियुक्त उपासनेच्या

योगानें ईश्वर कृपा करून, त्या उपासकाला आपल्या स्वरू-पाचें ज्ञान प्राप्त होऊन शांति ( मोक्ष ) प्राप्त होई, अशी बु-द्धि देतो. हा सिद्धांत समजावा. व कधीं कधीं अशा यो-ग्यतेचा उपासक संसारसंबंधानें धैर्य कमी असल्यामुळें का-म्यउपासना जरी करितो, तरी त्याची कामना परिपूर्ण क-रून, त्याला तो शांति देतो, हेंही समजावें. कोणी दुरा-चारी असून त्याला आपलें कर्म वाईट वाटून जर तो ई-श्वरभजन अनन्यभावेंकरून करूं लागला; व संवयीमुळें त्याचें वाईट कर्म लगेच जरी सुटलें नाहीं, तरीही तो ल-वकर त्या शांतीस पावतो, असें समजावें. खराखुरा मात्र प-श्चात्ताप झाला पाहिजे ह्मणजे झालें. वाईट कर्म एकदम जरी सुटलें नाहीं, तरी पश्चात्ताप झाला असल्याकारणानें त्यांत फांटा येऊन, कमी होत होत, अगदीं कमी होऊन त्वरित तो त्यापासून मोकळा होतो. पश्चात्तापाशिवाय प्रा-यश्चित्त व्यर्थ होय. अनन्यभाव ह्मणजे ईश्वरापेक्षां अन्य कांहीं श्रेष्ठ व सुखदायक नाहीं, असा भाव. किंवा सर्व विश्व तोच आहे, असा भाव. असें समजावें. कितीएक सत्पुरुष, लोक शरण नाहीं आले तरी, त्यांना बोध करीत असतात. पण ह्या करण्यांत चतुराई व निरभिमान जबरदस्त पाहिजे. कारण शरण आलेला शिष्या बहुतक-रून बोधाविषयीं भक्तिमान् असून, त्यास प्रसंगीं रागें भ-रलें असतां तो सोशितोही.

# भाग ४ था.

## ज्ञानकांड.

एवढावेळपर्यंत कर्म व उपासना या दोन कांडांचें विवेचन केलें. त्यांत कर्मानें अंतःकरणशुद्धि होऊन भगवत्प्राप्तीची इच्छा उत्पन्न होते. ती झाल्यावर उपासनेनें व सद्गुरुसेवेनें मोक्ष प्राप्ति होई, अशी बुद्धि भगवान् (ईश्वर) देतो, असें सांगितलें. मोक्ष प्राप्त होण्याची बुद्धि म्हणजे जीव, ईश्वर, शुद्ध चित्स्वरूप, त्यांचा भेद, अविद्या, त्या चित्स्वरूपाचा योग, हे सहा अनादि होत. त्यांत चित्स्वरूपाखेरीज बाकीचीं पांच अनादि म्हणजे त्यांचा प्रारंभ कधींचा हें कळत नाहीं. व चित्स्वरूप अनादि म्हणजे त्याला प्रारंभच नाहीं. तें नित्य आहेच. यास्तव त्या चित्स्वरूपाखेरीज तीं पांच मिथ्या, आणि तें चित्स्वरूप सत्य म्हणून, भज्य, भजक, भजन ही त्रिपुटी मुळींच नसून, त्याहून (चित्स्वरूपाहून) विचार करणारा, मीही दुसरा कोणी नाहीं, इत्यादि समजूत अपरोक्ष होणें, या बुद्धीलाच ज्ञान असें म्हटलें आहे. त्याचें विवरण ज्यांत केलें आहे त्याला ज्ञानकांड अशी संज्ञा आहे. जीवाला ईश्वरकृपेनें मोक्ष (पुनर्जन्म न होणें) होणें असला म्हणजे, त्याला असें वाटूं लागतें कीं, अरे! अरे! अरे! मी आजपर्यंत या संसारांत किती गर्क झालों. ज्यांपासून वास्तविक पाहिलें असतां, सुख नाहीं, त्यांना सुख दायक मानिलें. आणि त्या हेतूनें जें न करायाचें तें केलें. अगोदर मी देहाहून वेगळा असतां, त्या वेगळेपणाचें स्मरण सुद्धां माझ्या गुलहौसीपणानें मला झालें नाहीं. व तें झालें नाहीं तर नाहीं, पण आणखीं मी गोरा, मी विद्वान्,

मी देखणा, मला सर्व लोक चाहतात, मी अशी संपत्ति मिळविली, प्रस्तुत मिळवितों आहें, आणखीं मिळवीन, मजपुढें कोण गडबड करणार आहे पाहूं? अशा गर्वांत दिन दुनया खातरेंत नाहीं, अशी माझी दशा झाली. मग सर्वांतर्यामी, सर्वज्ञ, सर्वशक्तिमान्, ज्ञानवान्, जो परमात्मा, तोच जविरूपी, किंचिज्ञादि लक्षणेंकरून युक्त आहे. सर्वज्ञादि व किंचिज्ञादि लक्षणें हीं माया म्हणजे मिथ्या होत. एक द्वैताद्वैतातीत परमात्मा सत्य हा विचार नाहीं झाला, यांत काय नवल? गर्भवास, बाळपण यांत किती दुःखें? एक तर अत्यंत परतंत्रपणा. आपली इच्छा दुसऱ्याला दाखविण्याची तजवीज करणें, चांगलें साधत नाहीं. तारुण्यपणांत तरी संपत्ति मिळविण्याचें काम, रोग, हे सुखांत अडथळा करितातच. वृद्धावस्था तर फारच कठीण. कोणी पुसत नाहीं. जवळ पैसा असला तर तो निघेपर्यंत जवळचीं जी जी करीत असतात. व एकीकडे हंसून, थट्टाही करितात. या वरील सर्व प्रकारांनीं मनाला किती अस्वस्थता होते? अस्तु. प्रस्तुत मला परमात्म्याच्या दयेनें संसारांत सुख नाहीं, ज्ञानाशिवाय सद्गति नाहीं, हें ज्यापेक्षां समजलें त्यापेक्षां त्याच्या मनांत मला मोक्ष द्यावयाचा आहे, यांत संशय नाहीं. असें वाटूं लागलें ह्मणजे, तो, मी कोण? ब्रह्म तें काय? अद्वैतता कशी? हें समजून घेऊन, ह्या अज्ञानरूपी संसारांतून सुटण्याची इच्छा करितो. व तें समजलें नाहीं, तोंपर्यंत, त्याला चैन पडत नाहीं. असें झालें ह्मणजे, त्याला मुमुक्षुत्व आलें, असें जाणावें. मग तो कोठें कथा, कोठें पुराणें, कोठें सत्पुरुषाचीं भाषणें चालतात, तेथें लक्षपूर्वक श्रवण करण्यास टपत असतो.

कोणी ब्रह्मसंबंधी कांहीं बोलतो आहे, असें जर वाटलें तर, होईल तितकें करून, तें ऐकण्यांत तत्पर होतो. ही जी त्याची आवड तींत गृहकृत्यें नसतीं तर, बरें झालें असतें, असें मानूं लागतो. गृहकृत्यें (संसारखटला) व त्यांतच नानातऱ्हेच्या चवी, डामडौल, इत्यादि यांचा कंटाळा येणें, याचेंच नांव वैराग्य. त्यानें युक्त होतो. मानापमान, द्वेषमत्सरादि शत्रु, यांचे नादीं मी लागलों तर, माझ्या ब्रह्मविचारांत अडचण होईल, असें समजून त्यांकडे अलक्ष करितो. अमुकाचें भाषण त्या दिवशीं मीं ऐकिलें. काल एकजण कथा करीत होता. परवां एकानें योगवासिष्ठाचा अध्याय वाचून, त्याचा अर्थ सांगितला. परंतु अमक्याची सांगण्याची धाटणी मनांत भरण्याजोगी निःसंशयपणाची अशी टेहेळ, दुसऱ्यास दूषण देण्याकरितां नव्हे, तर आपल्याला त्यापासून सद्विचार कळावे, याकरितां ठेवितो. आराध्यदैवत जो नारायण, शिव, गणपति, देवी, सूर्य, यांतून कोणत्याही नामरूपानें परमात्मा त्याची उपासना पूर्वींप्रमाणेंच, पण आपल्या विचारास मिळती, अशी त्याचीं प्रार्थना करून, करतो. जेथें त्याच्या मनाचें समाधान होऊन, शांति मिळण्यासारखी, तेथेंच नेहमीं जाणें येणें ठेवितो. इकडे कितीएकांस असें वाटत असतें कीं, आह्मांकडे कांहीं समजून घेण्याकरितां किंवा बसण्याकरितां तो गृहस्थ येत नाहीं. जिकडे जात असतो, तिकडे कितपत विद्या आहे, तें समजलें. पण तो त्यांच्या बोलण्याला न मानितां, व त्यांना न दुखवितां, आपलें समाधानाचें स्थळ सोडीत नाहीं. व आपल्या आवडत्या विचारानें युक्त समाजाखेरीज समाजांत जाणें, उठणें, बसणें, बोलणें,

इत्यादिकांत तत्पर होत नाहीं. अशा साधनांनीं युक्त तो मुमुक्षु असतो. त्याचें मुख्य कर्म, श्रवण, मनन, निदिध्यासनादि, समजावें. प्रथम संसारांतून सुटावें, असें वाटणें, ही मुमुक्षूची कनिष्ठ पायरी. दुसरी, तिच्याहून श्रेष्ठ स्वस्वरूप जो परमात्मा त्याविषयीं विचार, श्रवण करणें. तिसरी, त्या दोहोंहून श्रेष्ठ, श्रवणाचें मनन करणें. चौथी, सर्वांत श्रेष्ठ निदिध्यासन करणें. मुमुक्षु जो आहे, तो कधीं कधीं ज्यापासून आपल्याला सद्विचार संपादन करणें आहे, त्याची काम, क्रोध, लोभादि शत्रुवशता, कितपत आहे याची चांचणी पहात असतो. पण त्याच्या स्वानुभवशरि भाषणानें समाधान जर होत आहे, तर मग त्याच्या त्या शत्रुस्फूर्तीकडे तादृश लक्ष पुरवीत नाहीं. तद्विषयीं तो असें समजतो कीं, स्वानुभवशीर, व समाधानकारक ज्याचें भाषण, त्याचे आलेले काम, क्रोध, लोभादि, केवळ निष्कारण नव्हत. माझ्या ध्यानांत आलें नाहीं म्हणून, तो मला कामादि रिपुयुक्त वाटला. आणि ही गोष्ट खरीच आहे कीं, जो केवळ त्या रिपूंच्या स्वाधीन असतो, त्याला आत्मानुभव असणें कठीण. ज्याला तो अनुभव आहे, त्याच्या अंकित, ते मित्ररूपानें असतात. तो व्यवहारार्थ वाजवी कारणानें त्यांचें अवलंबन कधीं कधीं करतो काठी किंवा चाबूक इत्यादिकांवांचून घोडा, बैल, इत्यादि जसे सदोदित चालावयाचे कठीण, त्याप्रमाणें व्यवहारकामादिकांवांचून सदोदित चालणें कठीण. योग्य कारणावांचून त्यांचें अवलंबन करणें, हेंच अविचार किंवा त्यांच्या स्वाधीन होणें समजावें. ही वर सांगितलेली चांचणी पाहणें ह्मणजे, ती पाहणारा मुमुक्षु निदान बुद्धिमान् व न्याय

जाणणारा पाहिजे. याप्रमाणें मुमुक्षु सत्समागम करितो ते- व्हां, नम्रपणानें शरण जाऊन प्रश्न करितो; हे गुरो, मीं कोण? ब्रह्म तें काय? संसार मिथ्या कसा? त्यांतून सुटा- वें कसें? इत्यादि विचार मला कृपाकरून सांगावे. आप- ण समर्थ आहां. तेव्हां तो गुरू त्याची ती भक्ति व वि- श्वास पाहून त्याला पुढीलप्रमाणें बोध करितो. बाबारे! तूं मी कोण आहें? हें मला विचारितोस तर ऐक. या सृष्टींत दोन पदार्थ तुझ्या दृष्टीस पडतातना? दोन कोण- चे ते पहा. एक जड, व दुसरा चैतन्य. जडाचें लक्षण स्वतां मी कोणीएक आहें, व मजहून दुसरें कोणी आहे, अ- सें न समजणें. व चैतन्याचें लक्षण, मी कोणीएक आहें, व मजहून अन्य देहादि पदार्थ आहेत, असें समजणें. या दोन पदार्थांच्या लक्षणांप्रमाणें पाहतां, तूं जड नव्हस, चैत- न्य आहेस. नुसता वर वर विचार केला तर, जडचैतन्या- चें मिश्रण तूं आहेस, असें वाटेल. परंतु तूं देहाहून वेग- ळा आहेस. कसा तो पहा. अगोदर हें ध्यानांत ठेव कीं, ज्ञाता ज्ञेयाहून भिन्न असतो. जर तूं देहाला व अन्य पदा- र्थांना जाणतोस, तर वरील निर्णयानें त्या देहादिकांहून तूं भिन्न झालास. अर्थात् ते तुझ्याहून भिन्न ठरले. आतां ज्या देहाहून तूं भिन्न, तो दृश्य देह स्थूल समज. फिरून तुला असें वाटेल कीं, या स्थूल देहाच्या आंत मी आहें, तो मी आंत जे पंचप्राण वा- यु, मन इंद्रियादि आहेत, ज्यांच्या योगानें हें शरीर चाल- तें, त्यांचा समुदायच होय. तर तो समुदाय लिंग (सू- क्ष्म) देह समजावा. तूं त्याला जाणतोस, तो जाणारा तूं त्याहून वेगळा, व तो तुजहून वेगळा. याउपर तुला

मी कोण हें कळण्यास विचार पडेल. कारण, प्रथम स्थूलदेह दृश्य, त्याशीं मिळून मी अमुक म्हणण्याला तुला जागा होती. तो देह मी नव्हे, असें समजल्यावर त्याच्या आंत वायु, मन, इंद्रियें, यांचा समुदाय तो मी म्हणण्याला तुला जागा झाली. आतां त्या समुदायाहूनही तूं जाणणारा वेगळा आहेस. तेव्हां त्या समुदायाखेरीज दुसरा भाग तो मी ह्मणण्यास जागा लक्षांत येण्यास कठीण आहे. पण पहा. प्रस्तुत तुला मी कोण हें कळत नाहीं, तें न कळणें, अविद्या, तीच कारणदेह, अशासाठीं कीं, मी कोण हें तुझें स्वरूप तुझ्या लक्षांत येत नाहीं. हें न येणेंच, सूक्ष्म व स्थूल देहाला मी मानण्यास कारण. व त्या दोन्ही देहांहून वेगळा मी कोण, हा शोध लागत नाहीं, ह्मणून प्रयत्नोत्तर शोध लागण्यास कारण. अस्तु. त्या दोन्ही देहांहून मी अन्य अमुक असें कळल्याखेरीज जी मी मी अशी स्फूर्ति होते, तीच त्या अविद्येचें अहंकाररूपी कार्य समजावें. व हें कार्यच देहाचा अभिमान धरून, मी अमुक असें अविचारानें मानतें. स्थूलदेहाची जागृत् अवस्था, सूक्ष्मदेहाची स्वप्नावस्था व कारणदेहाची सुषुप्त्यवस्था समजावी. त्यांत सुषुप्त्यवस्थेंत तूं गेलास, ह्मणजे तुला मी एक आहें व अन्य कांहीं आहे, हें भान सुद्धां नसतें. अशी अज्ञानव्याप्ति असते. आणि त्या वेळेस तुझी केवळ आनंदरूपता असते. कशावरून तर पहा. तूं जेव्हां जागा होतोस, तेव्हां असें समजतोस किंवा ह्मणतोस कीं, मला आतां दोन घटका काय छान झोंप लागली होती, तेव्हां मला कांहींएक सुद्धां भान नव्हतें. केवळ सुखमय होतों. जर त्या अवस्थेंत आनंद व अज्ञान नसतें तर, तुला जागा

झाल्यावर तें कसें स्मरतें ? जी वस्तु आपण अनुभविली नाहीं, तिचें स्मरण कदापि होणें नाहीं. असो. यांत इतकें ठरलें कीं, तें अज्ञान व तो आनंद यांहून तूं वेगळा. कारण त्यांना जाणतोस. एवंच स्थूल, सूक्ष्म, कारण, या तिन्ही देहांहून तूं वेगळा होस. तो तूं कोण ? तें फिरून चांगलें लक्ष देऊन ऐक. जागृति, स्वप्न, सुषुप्ति, या त्र्यावस्थांचें साक्षित्व करणारा, त्यांच्या आदि, मध्य, अंताचे ठिकाणीं तूं आहेस. कसा तो पहा. जागृति अवस्थेंत तूं असून, ती गेल्यावरही तूं असतोस. स्वप्नावस्थेंत तूं असून ती गेल्यावरही तूं असतोस, व सुष्प्यवस्थेंत तूं असून, ती गेल्यावरही तूं असतोस, त्या अवस्थांच्या नाशानें तुझी नष्टता नाहीं. अवस्था नाशिवंत आणि तूं अविनाश होस. अविनाशास सत् ही संज्ञा आहे. म्हणून तूं सत् आहेस. व त्या अवस्थांस जाणणाऱ्या मनोवृत्ति तुझ्या ठिकाणीं रज्जुसर्पन्यायानें उत्पन्न होऊन, तूं जो मूळ चित् ( ज्ञान ) त्या तुझा त्यांत प्रवेश होतो. आणि तूंच चैतन्य जीवात्मा बनून, इंद्रियद्वारा जागृतींतील नानाप्रकार जाणतोस. व स्वप्नांतील नानाप्रकारही जाणतोस. सुष्प्यवस्थेचेंही पश्चात् साक्षित्व करतोस. तो तूं मनोवृत्तींत प्रवेश होण्याच्या पूर्वीं, जें मूळ अधिष्ठान चित् तें होस. चित्स्वरूपाचा आकार चित्तच म्हणून, चिदाकार ही संज्ञा व त्याशिवाय अन्य आकार नाहीं, यास्तव निराकार ही संज्ञा. आतां अविनाशित्व चित्व जेथें आहेत, तेथेंच आनंद कसा तो पहा. नाशामुळें जर दुःख, तर अविनाशामुळें सुख. व अज्ञानामुळें जर दुःख, तर ज्ञानामुळें सुख. कोणी अशी कल्पना करील कीं, आपलें कोणी मेलें, अगर कांहीं गेलें, तर मेलें गेलें

हें ज्ञान आपल्याला होतें, ह्मणून त्याबद्दल दुःख होतें. मग ज्ञानापासून सुख कसें? तर ऐका. मेलें गेलें एवढेंच ज्ञान झालें, पण ज्ञाता ज्ञेय वस्तुहून वेगळा. तेव्हां आपला त्याचा काय संबंध? व तें नाशिवंतच, किंवा जाणरेंच ह्मणून, मेलें गेलें इत्यादि वास्तविक ज्ञान झालें नाहीं. ह्मणून, दुःख झालें. खरोखर ज्ञानापासून आनंदच. एवंच सच्चित् जेथें तेथें आनंदता. यावरून तूं जर सच्चित् आहेस, तर आनंदीही आहेस. याकरितां तूं सच्चिदानंदरूप मी आहें, असें आपल्याला समज. मी कोण हें स्वरूप तुझें तुला समजलें, तेव्हां कारणशरीराहून तूं वेगळा झालास. सच्चिदानंदरूप जें तेंच ब्रह्म. तेव्हा तूं ब्रह्म होस. पण मी ब्रह्म अशी वृत्ति जी तुझ्या ठिकाणीं उठते, तींत राहून, मी ब्रह्म अशी कल्पना तूं करतोस. मी ह्मणणाराच जर ब्रह्म आहे तर, त्याचे ठिकाणीं मी ब्रह्म हे भिन्न शब्द कसे उठले? यास्तव मी ब्रह्म अशी जी वृत्ति उठली, ती तूं जाणतोस. ह्मणून तूं तीहून वेगळा. ती वृत्तीच महाकारणदेह. त्याची अवस्था तूर्या. महाकारण ह्मणण्याचा हेतु असा आहे कीं, अज्ञान जो कारणदेह, त्यांतून सुटलास. पण मी ब्रह्म या वेगळेपणाचे वृत्तीनें राहिलास. ही वृत्तीच जन्म होण्यास महा (मोठें) कारण आहे. ती नष्ट झाल्याशिवाय मोक्ष (विदेहमुक्ति) नाहीं. जागृति, स्वप्न, सुषुप्ति, आणि तुर्या, या चारी अवस्थांचे ठिकाणीं आत्म्याचीं स्थानें अनुक्रमानें इंद्रियें, कंठ, (इंद्रियांत प्रवेश होण्यापूर्वीचें ठिकाण अथवा सर्वेंद्रिय मध्य) हृदय (लीन मन), मूर्धा (ब्रह्मरंध्र), हीं होत, तेव्हां तूर्यावस्थेंत तूं ब्रह्मरंध्रस्थानीं असतोस. जें ब्रह्म त्याचे ठिकाणीं अहं अशी वृत्ति प्रथम उठली. ती ब्रह्म-

रंध्रस्थानीं. त्या वृत्तींत त्या ब्रह्माचा प्रवेश झाला तोच त्या वृत्तीसह चिदात्मक. मायाशबल, सविशेष ब्रह्म, व प्रवेश होण्यापूर्वीं ब्रह्मरंध्रासुद्धां सर्व देहाच्या बाह्याभ्यंतर उपाधीसंबंधानें भरलेला असें ह्मणावयाचें. उपाधी जर मिथ्या तर तिच्या बाह्याभ्यंतर हें ह्मणणें नाहीं, असा निर्विशेष मायातीत शबलब्रह्माहून पर ह्मणून, परब्रह्म अशी संज्ञा, व ही संज्ञा सुद्धां वृत्ति धरून, एरवीं नाहीं. असा तूं होस. जसा तुझा प्रवेश या देहांत ब्रह्मरंध्रस्थानाकडून होऊन, चारी अवस्थांनीं त्यांत वागतोस, तसा अन्य जे उच्च नीच सर्व प्राणी त्यांच्या शरीरांतही त्यांच्या ब्रह्मरंध्रस्थानाकडून प्रविष्ट होऊन, त्यांच्या शरीरांत वागतोस. सर्व ब्रह्मांडें, त्यांच्यांतील स्थावर जंगम प्राण्यां सुद्धां, तीं. त्यांच्या बाह्याभ्यंतर भरलेला असून, त्या सर्वांच्या ब्रह्मरंध्रादि रंध्रद्वारा खंडरहित होस, ह्मणून अखंड. तीं अनंत ब्रह्मांडेंच विश्व. तूं जर देहाचा अभिमान धरणार तर, त्या विश्वरूपी देहाचा अभिमान धरला पाहिजे. कारण सर्व विश्वांत तुझा प्रवेश तेव्हां त्यांतील हजारों प्राण्यांचे शिर, कान, नाक, डोळे, हात, पाय, इत्यादि जे अवयव ते तुझेच होत. तेव्हां तूं सहस्रशीर्ष, सहस्राक्ष, सहस्रपाद, इत्यादि संज्ञायुक्त झालास. मग त्या प्राण्यांकडून ज्या ज्या गोष्टी घडतात, जे जे उपभोग ते घेतात, त्या त्या सर्व गोष्टी घडणें, व ते ते उपभोग घेणें, तुजकडूनच होतें, असें तुला समजलें पाहिजे. जर अभिमान सोडतोस तर, तें तुझें करणें वास्तविक होय. कसें तें पहा. निर्भेद्यता ह्मणून एक धर्म आहे त्याचें लक्षण हें कीं, ज्या ठिकाणीं एक वस्तु भरली आहे त्या ठिकाणीं दुसरी वस्तु, ती पहिली तेथून गेल्याशिवाय राहूं शकत नाहीं. या धर्माप्र-

माणें तूं सच्चिदानंद सर्व ठिकाणरूपी असा जिकडे तिकडे आहेस. त्या तुझ्या सत्तेंत तें विश्व कसें राहिलें? तूं सत् ( अविनाश, जाणेंयेणें रहित ) त्या तुझ्या अस्तित्वांत जड व नाशिवंत विश्वाचें अस्तित्वं कसें संभवेल? नाहीं संभवणार. आतां कोणी असें ह्मणेल कीं, विश्व जर नाहीं तर अनुभवास येतें तें. तर त्याचें उत्तर असें आहे कीं, मन इंद्रियद्वारा पंचविषयरूपी पदार्थांस जाणतें. पण तें ज्ञाता ज्ञान ज्ञेयरूपी मन, इंद्रियें व विषय मायिक होत. तेव्हां मायाज्ञाती, मायाज्ञान, आणि मायाविषय, असें झालें. परंतु माया ह्मणजे मिथ्या. यावरून तें ज्ञाता, ज्ञान, ज्ञेयरूपी विश्व मिथ्या. जसा रज्जु अधिष्ठानीं सर्पभास तसा तूं जो परब्रह्म त्या अधिष्ठानीं विश्वभास होय. रज्जु एक पदार्थ, तिचे ठिकाणीं भासलेला सर्प दुसरा पदार्थ, व या आकृतीस सर्प हें नांव देण्यास कारण त्या पूर्वीं पाहिलेला सत्य सर्प तिसरा पदार्थ, आणि पाहाणारा चौथा पदार्थ. असे चार पदार्थ झाले तसे त्या दृष्टांतानें. परब्रह्म, विश्व भास, तो भास होण्यास कारण त्या पूर्वीं पाहिलेलें सत्यविश्व व पाहाणारा हे चार रज्वादि स्थानापन्न दृष्टांतापैकीं होत. पण परब्रह्माखेरीज बाकीचे तीन पदार्थ ह्मणजे विश्वभास, सत्य विश्व, व पाहणारा, हे विश्वभासपैकींच होत. जर ते त्या पैकींच, तर दृष्टांताप्रमाणें ते तीन वेगळाले कसे मानिले? तर असें आहे कीं, जोंपर्यंत या जिवास ज्ञान नसतें, तोंपर्यंत, तो भासमान विश्व, तेंच खरें विश्व. परब्रह्म ह्मणून एक मुख्य तत्व आहे, असें साधुसंत ह्मणत असतात. इत्यादि समजुतीनें असतो. पुढें ईश्वरी कृपेनें सद्गुरू भेटून त्यानें त्याची चांगली समजूत घालून दिली ह्मणजे, त्याला ज्ञानकालीं

तेंच विश्व परब्रह्म जें आपण त्या स्थानीं भास आहे, असें वाटूं लागतें. तेव्हां हा विश्वभास, तो होण्यास कारण, सत्य विश्व समजूत होण्यापूर्वींचें व भासमान विश्वापैकींच मी वृत्तिरूप, असें समजण्यापूर्वींचा मी वेगळा पाहणारा, असे प्रश्नाप्रमाणें तीन पदार्थ जुळले. अस्तु. ज्ञाता, ज्ञान, ज्ञेयरूपी माया ह्मटली. पण माया ह्मणजे अज्ञान व जड. मग तिच्यांत ज्ञाता, ज्ञान, ज्ञेयपणा कसा आला? कारण ज्ञातृत्व चैतन्यधर्म आहे. तर एक मायेचीं दोन रूपें. एक विद्या, दुसरें अविद्या. प्रथम परब्रह्माचे ठिकाणीं विद्यारूप अहंकार प्रगट झाला. विद्या ह्मणण्याचें कारण त्यांत स्वस्वरूप ह्मणजे परब्रह्म त्याचें ज्ञान असतें. त्या ज्ञानासह तो जो अहंकार तोच मायाशबल, सविशेष ब्रह्म, गुणसाम्यावस्थात्मक, सर्वज्ञादि लक्षणांनीं युक्त ईश्वर, ह्मटला आहे. त्यालाच माया, शिव, विष्णु, गणपति, सूर्य हीं नावें आहेत. माया या स्त्रीलिंगी शब्दावरून, तो बायको. किंवा शिवादि पुलिंगी शब्दावरून तो पुरुष. व ब्रह्म या नपुंसक शब्दावरून, तो नपुंसक असें समजणें निरर्थक होय. तथापि त्याणें अनेक प्रकारचीं स्त्रीपुरुषरूपें धारण करून, अनेकवेळां जगद्रूपी अनेक खेळ केले, व हल्लींही करीत आहे, व पुढेंही करील. हा सर्वात्मा किंवा जगदात्मा परम प्रेमेंकरून, याला जो भजतो, त्याचे मनोरथ तो तत्काळ पुरवितो, हाच तुर्यस्थ. जीव जरी तुर्यावस्थेप्रत पावतो, तरी यांतच मिळून जातो. आतां जीवस्वरूप तरी तोच झाला, कसा तो पहा. असा पहिल्यानें परब्रह्माचे ठिकाणीं अहंकार उठला, त्यांत स्वस्वरूपअधिष्ठानसान्निधानानें ज्ञानशक्तीचा प्रवेश, लोहाचे ठिकाणीं आकर्षणशक्तीच्या प्रवेशाप्रमाणें

झाला. तसा स्वस्वरूप ( परब्रह्म ) विस्मृतिरूप जी अविद्या, तिचे ठिकाणीं अहंकार उठला, तोच अंतःकरण किंवा बुद्धि किंवा मन किंवा चित्त या शब्दांनीं वाच्य होय. त्याचे ठिकाणीं प्रवेश झाला, त्या ज्ञानशक्तिप्रवेशासह तो अहंकार जीव होय. हाच चिदाभास, यास्तव कोणी असें समजेल कीं, जीव हा वायु आहे, तर असें समजूं नये. तर ज्ञानशक्तिप्रवेशयुक्त अज्ञान व्याप्य, वायुसारखें एक अहंकाररूप द्रव्य आहे, असें समजावें. पहा, त्याला सुप्त्यवस्था प्राप्त झाली ह्मणजे, मीतूंपणाचें कांहीं भान नसतें. आणि शरीराचे जागृती स्वप्नरूपी कारभार नष्ट होतात. पुन्हा स्वप्न जागृति उठल्या कीं, मीतूंपणाचें भान, व ते कारभार चालू होतात. यावरून असें एक वायूसारखें अति सूक्ष्म द्रव्य असलेंच पाहिजे कीं, त्याचा एकाप्रकारचा बदल झाला ह्मणजे, सुप्ति व्हावी; व दुसऱ्या एकाप्रकारचा बदल झाला ह्मणजे, स्वप्न व्हावें, व आणखीं एकाप्रकारचा बदल झाला ह्मणजे जागृती व्हावी. अस्तु. त्या द्रव्याचे लीन स्वरूपांत (सुप्त्यवस्था स्वरूपांत ) जेव्हां पूर्वीं सांगितल्याप्रमाणें ज्ञानशक्तीचा प्रवेश होतो, तेव्हांच स्वप्न किंवा जागृति उभी राहते, या बदलाचेंच नांव विज्ञानमय कोश ( बुद्धि ) होय. व यालाच कधीं कधीं अंतःकरण, मन, अहंकार, चित्त, हीं नांवें दिलीं जातात. हा जीव व तो ईश्वर या दोन्ही माया होत. त्यांच्यांत जर ज्ञानशक्तीचा प्रवेश आहे, तर ज्ञातृत्व जो चैतन्यधर्म, तो आहेच. मायिक जो जीव त्याला विश्वानुभव आला तरी, विश्व सत्य होणें नाहीं. असो. विश्वच जर नाहीं, तर विश्व नाहीं ब्रह्म मात्र आहे, असें ह्मणणारा तरी कोण ? कोणी नाहीं. तेव्हां कोणाचा

अभिमान कोणी धरावा? एवंच, द्वैताद्वैतातीत सच्चिदानंद परब्रह्म परमात्मा वृत्तिरहित विचाराअंतीं सिद्ध होय. हीच खरी परमार्थता. याउपर जन्म, मरण, बंध, युक्त, साधक, मुमुक्षु, आणि मुक्त, हे प्रकार कांहींच नाहींत. अशा या समजापुढें वेद ह्मणजे समजणें समाप्त झालें, किंवा हा समज वेदांच्या अंतीं आहे ह्मणून, यास वेदांत ही संज्ञा आहे. कोणी कल्पना काढील कीं, चारी देहात्मक सकल विश्वांत योजना व तीप्रमाणें योज्य कार्यें घडतात, त्यापेक्षां योजनाधिष्ठान ज्ञानशक्तियुक्त अहंकार, ज्याच्याखेरीज योजना घडावयाचीच नाहीं, तो अहंकार त्या विश्वांत असलाच पाहिजे व आहे हें उघड दिसतें. त्याप्रमाणें तो अहंकार व तें विश्व यांच्या अतीत अद्वैतचित्तस्वरूप (परब्रह्म) आहे हें लक्षांत येत नाहीं हें कसें? तर याचें उत्तर असें आहे कीं, रात्रीस (काळोखांत) प्रकाशव्याप्ति जिकडे तिकडे आहे. तिच्यांत मार्जारादि प्राणी चोहींकडे आहेत. त्यांच्या नेत्रांत त्या प्रकाशव्याप्तीच्या किरणांचा प्रवेश होऊन, त्यांपासून मूषकादिकांवर पारधरूप कार्य घडतें. फिरून असें मनांत आणावें कीं, मार्जारादि नेत्रांखेरीज ती प्रकाशव्याप्ति आपल्या लक्षांत येत नाहीं. आणि नेत्रप्रवेशसिद्ध पारधरूप कार्य लक्षांत येतें, तेव्हां त्यांच्या नेत्रांत प्रकाशकिरण प्रविष्ट आहेत हेंही स्पष्ट होतें. नेत्रांखेरीज प्रकाशव्याप्ति असल्याशिवाय, नेत्रांत प्रवेश व पारधरूप कार्यसिद्धि कशी घडेल? कारण तो केवळ नेत्रांचा धर्म नव्हे. नेत्रांचाच जर धर्म असता तर घुबडास दिवसास मुळींच दिसत नाहीं, आणि मनुष्यादिकांस रात्रीस (काळोखांत) दिसत नाहीं, हें कां? एथें इतकेंच समजावें कीं, यांच्या ने-

त्यांची रचना दिवसाचे प्रकाशकिरण व रात्रीचे प्रकाशकिरण प्रविष्ट होण्यासारखी नाहीं. अस्तु. या दृष्टांताप्रमाणें प्रकाशव्याप्तिस्थानापन्न चिद्रूपव्याप्ति असल्याशिवाय, नेत्रस्थानापन्न अहंकाराचेठायीं किरण प्रवेशस्थानापन्न ज्ञानशक्तिप्रवेश, व त्यापासून मूषकादिस्थानापन्न देहादिकांवर पारधरूप कार्यस्थानापन्न उठणें, बसणें, बोलणें, पहाणें, चालणें, भोगणें, इत्यादि धर्म कसे सिद्ध होतील? कारण, ज्ञानशक्तियुक्तता केवळ अहंकाराचा व विश्वाचा धर्म नव्हे, यासाठीं कीं, त्यांचा अवस्थांतरांनीं बदल होतो. दुसरें नेत्र जिकडे जिकडे जातील तिकडे तिकडे प्रकाशकिरणव्याप्ति आहेच. प्रवेश मात्र होत जातो. याप्रमाणें अहंकारयुक्त लिंगशरीर जिकडे जिकडे जाईल, तिकडे तिकडे चिद्रूपव्याप्ति आहेच. प्रवेश मात्र लक्षांत न येऊं देतां होत जातो, इकडचा तिकडे जात नाहीं. याकरितांच सूत्राचे ठिकाणीं मणी, त्याप्रमाणें चित्सूत्राचे ठिकाणीं सूक्ष्म स्थूल शरीरें फिरताहेत. अस्तु. हा जो वर ज्ञानकांडसंबंधीं विचार दाखविला, त्याप्रमाणें सच्चिदानंद परब्रह्म ज्याचे वृत्तींत उदय पावेल, तोच कृतकृत्य, तोच धन्य. त्याचें वर्णन करावें तितकें थोडेंच. त्याला कोठें जाणें येणें नाहीं. कारण त्याखेरीज अन्य स्थल, पदार्थ, व काल नाहींतच. स्वर्गास किंवा विष्णवादि लोकांस जाणें ही क्रममुक्ति असून, सोपाधिक व नाशिवंत होय. तींत तरी शेवटीं वरीलप्रमाणें परब्रह्मोदय झाल्याशिवाय गति नाहीं. परब्रह्मोदय वृत्तींत असला ह्मणजे, जीवन्मुक्ति व अशा अवस्थेंत वृत्तिलय, अथवा चारी देहांचा नाश झाला ह्मणजे विदेह कैवल्यमुक्ति समजावी. असो. वरील कांडाविषयीं विशेष विचार. आत्मा चारी

देहातीत असून, त्याचे ठिकाणीं विश्व, रज्जुसर्पन्यायानें मिथ्या आहे, असा वरील ज्ञानकांडांत विचार दाखविला, पण तोच आत्मा पंचकोशातीत आहे अशी व्याख्या करून कितीएक ज्ञाते शिष्यास बोध करितात; पण जे चार देह सांगितले तेच पंचकोश समजावे. ह्मणजे स्थूलदेह तो अन्नमय कोश, लिंगदेह तोच प्राणमय, मनोमय, विज्ञानमय (बुद्धि) हे तीन कोश मिळून समजावा. कारण व महाकारण हे दोन देह मिळून आनंदमय कोश समजावा. आनंद हें ब्रह्माचें स्वरूप आहे, परंतु आनंदमय कोशांतलि जो आनंद तो वृत्तिजन्य ह्मणून त्याची कोशांत गणना केली. नाहीं तर कोश चारच. हा बोध करतांना ज्याचेठायीं हे सर्व प्राणी उत्पत्ति, स्थिति, संहार, ह्या तिन्हीं रूपांनीं भासतात असें अधिष्ठानरूप सच्चिदानंद ब्रह्म पंचकोशातीत समजावें, असें सांगितलें जातें. तेंच ब्रह्म त्रिगुणातीत होय, असाही बोध कितीएक करितात. शांति (सत्वगुण), घोरत्व (रजोगुण), मूढत्व (तमोगुण), ह्या तिन्ही वृत्तिरूप गुणांहून तें ब्रह्म अतीत ह्मणून, त्रिगुणातीत समजावें. कसें तें पहा. शांत, घोर, मूढ, ह्या तिन्ही वृत्ति जागृति व स्वप्न ह्या दोन्ही अवस्थांत असतात. पण सुषुप्ति व तूर्या ह्यांत त्या मुळींच अभावातें पावतात. कां कीं, त्यांत निर्विकल्पता असते, व वृत्तीस विकल्पतेंतच होत. आत्मप्राप्तीचे उपाय, आत्मविचार, वासनाजय, मनोजय, प्राणनिरोध, हे मुख्य समजावे. त्यांत आत्मविचार मुख्य पायरी. तेथपासून प्राणनिरोधापर्यंत कनिष्ट कनिष्ट समजाव्या. आत्मविचारांत आत्मा, त्याचें स्वरूप असें आहे, व सर्व जगद्रूप अमुक प्रकारानें मिथ्या इत्यादि विचार असतो. वासनाजय ह्मणजे ज्या ज्या वा-

सना उठतील, त्या त्या आंवरणें. मनोजय ह्मणजे, इंद्रियद्वारा मन विषयाकडे जातें तें न जाऊं देणें, व त्याचे संकल्प विकल्प न होऊं देणें. प्राणनिरोध ह्मणजे, अष्टांगयोगसाधन. त्यांत प्राणायाम मुख्य समजावा. आत्मविचार जाणण्याची ज्याची शक्ति आहे, व तीप्रमाणें त्या विचारांत जो तत्पर, त्याला खालच्या तिन्ही पायऱ्यांचें श्रेय प्राप्त झालेंच समजावें. वासनाजय करणारास खालच्या दोन्ही पायऱ्यांचें, व मनोजय करणारास प्राणनिरोधाचें श्रेय प्राप्त झालें, समजावें. वर वरच्या पायरीवर जाणारास प्राप्ति त्वरित त्वरित समजावी. ह्मणजे प्रथमच आत्मविचार जाणण्यायोग्य बुद्धि असून त्यांत तत्पर होतो त्याला खालचे तीन प्रकार नाहीं केले तरीं, त्यांचें तात्पर्य मिळाल्यासारखेंच समजावें. कारण प्राणनिरोध करून मनोजय करून, आणि वासना जिंकून, जें कर्तव्य ह्मणजे, वृत्ति आत्मस्वरूपाकडे बिनहरकत एकाग्र लागावी, तशी त्याची लागते, व याचप्रमाणें खालच्या पायऱ्यांविषयीं समजावें. खाल खालची पायरी सेवन करणारास एकदम वरचे पायरीवर जाण्याची योग्यता नसते. व एकदम वरचे पायरीवर जाण्याची ज्याची योग्यता झाली, त्याच्या त्या खालच्या पायऱ्या मागील जन्मांत झाल्या, असेंही समजावें. कितीएक ज्ञानसिद्ध झाल्यावरही प्रारब्धवशेंकरून, परोपकारार्थ चूडालेप्रमाणें, योगानें वायु साध्य करून, आकाशगमन, हवें तें रूप धरणें, हवें तें करणें, इत्यादि सिद्धि संपादन करतात. पण ज्ञानसिद्ध झाल्यावर तसें करूं इच्छिणारे विरळा. कितीएक ज्ञान परिपक्व होण्यापूर्वीच, आपली मानप्रतिष्ठा व्हावी, या इच्छेनें सिद्धींच्या नादीं

लागतात, ते फसतात. अशासाठीं कीं, सर्वत्र एक परिपूर्ण आपण आत्मा आहों, त्या ठिकाणीं कोणी कोणाचा मान करावा, व प्रतिष्ठा कोणाची व्हावी, स्वस्वरूपाखेरिज कोणत्या पदार्थांत गर्क व्हावें, इत्यादि विचार ते जाणत नाहींत. जे ते जाणतात, ते वरील सिद्धींच्या नादीं लागायाचेच नाहींत. व परोपकारसंबंधानें जरी लागले तरी, त्या करण्यास सत्य मानून, त्यांत लिप्त व्हावयाचे नाहींत. वर सांगितलेल्या प्राणनिरोधाच्या खालच्याही अनेक साधनरूपी पायऱ्या आहेत. त्या कर्म व उपासना ह्या दोन कांडांत आल्या आहेत. आत्मविचारांत मृगजल, रज्जुसर्प, शुक्तिकारजत, इत्यादि दृष्टांत आले आहेत, त्यांचा ब्रह्म व जगत् या दार्ष्टांताकडे असा उपयोग करावयाचा कीं, प्रखर सूर्यकिरणयुक्त वातावरणाविषयीं जें मनामध्यें अज्ञान, तेंच नेत्रेंद्रिय वृत्तीला जल वाटण्यास कारण. त्याचप्रमाणें ब्रह्माविषयीं जें मनाचेठायीं अज्ञान, तेंच पंचज्ञानेंद्रिय वृत्तींस जगत् वाटण्यास कारण. रज्जुसर्प, शुक्तिकारजत हे दृष्टांत तसेच समजावे. जल, सर्प, रजत, हीं खोटीं असें जरी समजलें, तरी नेत्रांस तीं जलादि; दिसत असतात, अशा न्यायानेंच जगत् जरी दिसलें तरी; जलादि दिसत असून, त्यांस मन ज्ञानानें खरें मानीत नाहीं, तसेंच तें मन ज्ञानानें त्या जगतास खरें मानीत नाहीं. येथें जगत् ह्मणजे स्वदेहासुद्धां असें समजावें. ब्रह्म ही संज्ञा तरी सोपाधिक आहे. कारण ब्रह्म ह्मणजे मोठें. पण लहानाशिवाय मोठें संभवतच नाहीं. यास्तव कीं, ब्रह्म संज्ञा ज्याला आहे त्याखेरिज अन्य पदार्थच नाहीं. कोणी असें ह्मणेल कीं, त्याखेरिज अन्य कोणी नाहीं, तर

तें आहे तरी कशावरून? मला नाहींच वाटतें. तर याचें उत्तर असें आहे कीं, जर कांहीं नसतें, ह्मणजे शून्य असतें, तर निरधिष्ठान भ्रम मुळींच नाहीं. यावरून शून्य आधिष्ठानीं जगत् भ्रम होणें नाहीं. ज्यापेक्षां तो आहे, त्यापेक्षां कांहीं एक अधिष्ठान असलेंच पाहिजे, व तें अधिष्ठान विरुद्ध भ्रम. अर्थात् भ्रम विरुद्ध अधिष्ठान, या न्यायानें जगत्, भ्रम विरुद्ध होय. तें ज्ञानाज्ञानातीत असें सिद्ध होतें. कां कीं, जगत्, ज्ञान अज्ञानरूप आहे, आणि तें जगत् नामरूपात्मक आहे, ह्मणून तें अधिष्ठान नामरूपरहित असेंही समजावें. जगत् असत्, अचित्, दुःखरूप आहे यावरून आधिष्ठान सत्, चित्, आनंदरूप होय. असें तें स्वरूप ज्याचे अंतरांत दृढतर होऊन, जगत् स्वदेहासुद्धां मिथ्या, हें पक्कें बाणलें, तोच मुक्ति या लौकिकी पदवीस योग्य झाला. लौकिकी ह्मणण्याचें कारण, ज्याला वरप्रमाणें विचार प्राप्त झाला त्याला एक अद्वैत सत्य अधिष्ठान सच्चिदानंद ब्रह्मखेरिज अन्य कल्पनाच नाहीं. त्याला जन्म, मरण, बंध, मुमुक्षु, साधक आणि मुक्त असा भावच नाहीं. एवंच मुक्ति ही पदवी लौकिकीक ह्मणजे लोकसमजुतीलाच. ती मुक्ति दोन प्रकारची; एक जिवन्मुक्ति, व दुसरी विदेहकैवल्यमुक्ति. यांचें लक्षण पूर्वीं आलेंच आहे. बहुतेक लोकांची अशी समजूत आहे कीं, जो मुक्त झाला त्याचे हातून चमत्कार घडावे, लोकांचीं इच्छित कार्यें सिद्ध व्हावीं, त्याला कोणी मारलें, भाजलें, इत्यादि प्रकारांनीं दुःख दिलें, तरी त्यानें तें सोसावें. कोणी ह्मणतो, आमचे येथें एक आला होता, खोलींत बसत असे, आणि घागरभर पाणी नाहींसें करीत असे. तो मोठा योगी.

कोणी ह्मणतो, अमक्यानें इतका हरताळ गिळला. एक ह्मणतो, अमुक ठिकाणीं एक बोवा होता, तो नित्य काशी-स स्नानाला जात असे. अमुक तीन तीन दिवस खोलींत असतो, आंत काय करितो, तें कोण जाणे. कोणी ह्मणतो, अमुक बोवा ज्ञानी असेल, पण तो पाहिजे त्याचे हातचें खातो, तो बाटला. अमुक पाहिजे त्याचे हातचें खातो खरें, पण तो चमत्कार करतो, ह्मणून त्याला तसें करण्या-चा दोष नाहीं. एखादा ह्मणतो, विदेहकैवल्यमुक्ति ब्र-ह्मदेवासारख्या कोणाला होत असेल ती होवो, ती मोठी दुरापस्त आहे. जिवन्मुक्तीच बरी; तींत राहावें, खावें, प्यावें, चैन करावी, यांतच मौज. कोणी ह्मणतो, तसा झाला तो गांवांत कशाला येईल? कांहींचें ह्मणणें, तसा जो आहे त्यानें कर्म सोडलें, तरी चिंता नाहीं. पण अमुक तसा आहे का? अशीं अनेकांचीं अनेक ह्मणणीं आहेत. परंतु उगीच कांहीं तरी बोलून बकवा करण्यांत काय हशील? विचार करून पहा कीं, चमत्काराचा आणि ज्ञानाचा काय संबंध? त्यांना तमाशा करून, गारोड्याप्रमाणें लोक भुल-वून, पैसे किंवा प्रतिष्ठा मिळवायाची आहे? गारोडी इत्या-दि कितीएक लोक चमत्कार करतात ह्मणून, ते ज्ञानी झाले काय? ज्ञानी आपल्या स्वस्वरूपाखेरिज अन्य पाहतच नाहीं. ह्मणजे सर्व जगद्रूपी माया, जे मिथ्या समजून राहि-ले, त्यांना त्या मायेच्या पोटांतील जे चमत्कार, लोक, पैसा, प्रतिष्ठा, व अप्रतिष्ठा हीं कशीं सत्य वाटतील? त्यां-च्यापासून लोकांचीं इच्छित कार्यें होणें, हा प्रकार विश्वा-साचा व कधीं कधीं बोलाकुलास गांठ पडावी, तसा ईश्व-राचे मर्जानुरूप आहे. ह्मणून कितीएकांस प्रत्यय येतो, कि-

तीएकांस येत नाहीं. कितीएकांचीं तद्विषयीं बोलणीं गप्पाच ठरतात. इत्यादि सर्वांस अनुभव आहेच. पाणी नाहींसें करणें, हरताळादि गिळणें, यांत कांहीं मोठा योग झाला असें नाहीं. तशीं अल्प योगांगें पुष्कळच आहेत. पहा, पहा, नारद क्षणमात्रेंकरून हवें तिकडे जात येत असत. व्यासांनीं धृतराष्ट्रादिकांकरितां गंगेंत दुर्योधनादि मृत झालेली, सर्व फौज दाखविली. अगस्तीनीं खोलींत बसल्याखेरिज उघड एका आचमनानें समुद्र प्राशन केला. विश्वामित्रांनीं प्रतिसृष्टीस आरंभ केला. इत्यादि हे योग पुराणप्रसिद्ध कसे आहेत, तें पहा. ह्मणजे हल्लीं फडकीं गिळणें, इत्यादि योग यांत आणि त्यांत जमीन असमानाचें अंतर आहे, तें सहज ध्यानांत येण्यासारखें आहे. चमत्कार करणाऱ्या ज्ञान्यानें, पाहिजे त्याच्या हातचें खाल्लें तरी, दोष नाहीं, व एरवींच्यानें खाल्लें तर त्याला दोष असा लेख कोठें आढळत नाहीं. हा लेख मनसोक्त ग्रंथांत असेल. ज्ञाता दोषाचरण कसें करील? ब्रह्मज्ञानी अभेदवृत्तीनें असून, केवळ शरीरनिर्वाहापुरतें खाणें, पिणें, वस्त्रप्रावरणादि स्वीकारतो. पण त्यांतइष्ट अनिष्टबुद्धीनें सक्त होत नाहीं. व कोणाच्यांत मिसळत नाहीं. वाटला ह्मणजे, कोणा एखाद्याचा किंवा एखादे जातीचा आचार चांगला मानून तसा वागूं लागून, त्या जातीचा आपल्यास ह्मणवूं लागून, आपला पूर्वीचा सद्धर्माचार सोडतो, असें समजावें. विदेहकैवल्य व जीवन्मुक्ति हे शब्द तोंडानें नुसते बोलून कांहीं उपयोग नाहीं. अर्थानें व स्वानुभवानेंच समजले पाहिजेत. जो ह्मणतो कीं, जीवनमुक्ति बरी, तींत राहून खावें, प्यावें, ऐषआराम करावे, हेंच चांगलें. तर त्या ह्म-

णणारास मुक्ति ह्मणजे काय? हें समजलेंच नाहीं, असें समजावें. एखाद्यास प्रारब्धेंकरून विलास करावे अशी इच्छा होईल, पण तें जीवन्मुक्तीचें लक्षण नव्हे. मुख्यत्वेंकरून मुक्तलक्षण, हर्षशोक नसणें, इष्टानिष्टाचे ठिकाणीं सम ह्मणजे संगरहित असणें, व स्वस्वरूपवृत्तींत जागृत असणें, हें होय. व अशा वृत्तींत च्यारी देहांचा लय झाला ह्मणजे, विदेहकैवल्यमुक्ति समजावी. तसा झाला तो गांवांत कशाला येईल? व तसा जो आहे त्यानें कर्म सोडलें, तरी चिंता नाहीं. पण तसा ह्मणजे कसा? आतां तसा ह्मणजे ब्रह्मवेत्ता असें जर ह्मणाल तर, त्याला गांव कां खातो? अमुक ठिकाण चांगलें, अमुक वाईट, असें तो मानतो काय? जर मानील, तर देश, काल, वस्तु, परिच्छेदरहित ब्रह्म त्या स्थानीं, अमुक वाईट, चांगलें असें जर तो देश, काल, वस्तु, संबंधानें सत्य मानील, तर त्याला ब्रह्मवेत्ता ही संज्ञा योग्य होईल काय? व ब्रह्मवेत्त्याला ज्या प्राप्तीकरितां साधनरूप कर्में करावयाचीं, ती प्राप्ती जर आहे तर, ब्रह्मवृत्तीस अडथळा करणारीं कर्में हवींत काय? पहा, पहा, रोगनिवारण होऊन, स्वस्थता प्राप्त करूं इच्छिणाऱ्यास औषधादि उपचार करणें आहे. ती स्वस्थता परिपूर्ण झाल्यावर मग ते उपचार हवेत काय? उलटे रोग नसून औषध घेतलें तर हानि करील. ज्ञान्याच्या देहाला समजून उमजून कोणी इजा देणार नाहीं, पण एखाद्या मूर्खानें दिली तर तो खरोखर ज्ञानी आहे जर, तर सोसणें, न सोसणें, याचा संबंध देहाकडे, त्याचेकडे काय? तथापि देणारावर कृपा करावी, यास्तव देहद्वारा सोशील, अथवा न सोशील. अस्तु. वास्तविक स्वानु-

भवीं झाला जो आहे, त्याचें लक्षण, इष्ट, अनिष्ट, मान, अपमान, सुख, दुःखादि द्वंद्वें यांत समानवृत्तीनें राहणारा. ह्मणजे सुषुप्ती अवस्थेंत जर आत्म्याला देहाचें भान नाहीं, अर्थात् तत्संबंधी सुखदुःखाचेंही भान नाहीं. तेंच स्वप्न जागृतींत असतें, तसें असतें. ह्मणून त्या आत्म्याला तें चिकटलें आहे असें समजूं नये. कां कीं, चिकटलेलेंच असतें, तर सुषुप्तींत कळतें, तें तींत कळत नाहीं, यावरून आत्म्यास सुखदुःख स्पर्श नाहीं. आतां नाहीं तर, स्वप्न जागृतींत तरी कसा स्पर्श? तर असें आहे. सुषुप्तींत अहंकार नसतो ह्मणून वेदना नाहीं. व स्वप्न जागृतींत तो असतो, ह्मणून त्यांत वेदना आहेत. वेदना ह्मणजे कळणें. लोक वेदना ह्मणजे तिडका असें समजतात, पण खरोखर कळणें असाच अर्थ समजावा. कारण गळवाच्या ठणका, तापाचा दाहा, इत्यादि प्रकार मनोद्वारा जीवाला कळलेच नाहींत, तर ठणका, दाहा होताहेत असें कोणी ह्मणावें? यास्तव वेदना लागली आहे, असें ह्मणणें, ह्मणजे दुःख कळणें असें समजावें. तें अहंकाररूप उपाधीच्या योगानें, एरवीं नाहीं. व सुख तरी कळतेंच, पण त्याला वेदना कोणी ह्मणत नाहीं. इत्यादि विचार पक्के होऊन, अहंकाराहून वेगळें भान, भावरहित निर्विकल्प मी आहें असें समजणारा, हें होय. तो देहद्वारा कर्मे करितो, तीं इच्छा, अनिच्छा व परेच्छा, या तीन प्रकारच्या प्रारब्धानें करितो. इच्छाप्रारब्ध ह्मणजे, स्वताहांचे ठिकाणीं अमुक करावें, किंवा न करावें, अशी इच्छा होणें. मातापितरादि जे दुसरे, त्यांच्या आग्रहास्तव जी तशीच इच्छा होणें, तें परेच्छाप्रारब्ध. व स्वतः व दुसरे यांशिवाय जी तशी इच्छा होणें, तें अनिच्छाप्रारब्ध समजावें. जरी

प्रारब्धवशात् तो कर्मं करितो, तरी कोणत्याही प्रकारांत असें असावें, किंवा नसावें, असा आग्रह धरीत नाहीं, असा जो तो ब्रह्मवेत्ता समजावा. त्याची तऱ्हा परोपकारार्थ, सन्मार्गदर्शक किंवा बालोन्मत्त पिशाच यांतून कोणत्या तरी प्रकारानें असते. ब्रह्मवृत्ति धरून अवस्थांत राहाणें, याचें नांव अन्वय. व अवस्थेचें साक्षित्व सोडून केवळ ब्रह्मवृत्तींत तल्लीन होणें, हा व्यतिरेक. "तत्वमसी" यांत, तत्, त्वं, आणि असी, हीं तीन पदें आहेत. त्यांत तत्वं पदाचे दोन अर्थ. वाच्य आणि लक्ष. वाच्य ह्मणजे सर्वज्ञ, सर्वशक्तिमान् असा विद्योपाधि परमात्मा. व किंचिज्ञ, किंचिच्छक्तिमान्, अविद्योपाधि जीवात्मा. तच्छब्देंकरून परमात्मा, व त्वं शब्देंकरून जीवात्मा, असें समजावें. लक्ष ह्मणजे परमात्मा व जीवात्मा या दोघांच्या वरील उपाधिखेरीज त्यांत जें चैतन्य आहे तें. जीवानें आपल्या उपाधीचा, व परमात्म्याच्या उपाधीचा त्याग करून, आपल्यांतील चैतन्य व त्याच्यांतील चैतन्य एक अखंड अद्वैत जें आहे, तें मीच आहें अशी, भावना धरावी. आणि जीवत्व व परमात्मत्व सोडून अखंड सच्चिदानंदवृत्तीनें असावें. याकरितां सद्गुरु त्यास असि, या क्रियापदानें उपाधिद्वयरहित जें अखंड अद्वय चैतन्य तें तूं आहेस, असें समज, असा बोध करितो. त्यांत दोन्ही उपाधींचा जहत् ह्मणजे त्याग कर, व या उपाधींत साक्षित्वरूपानें अलिप्त जें अखंड अद्वय चैतन्य तेंच मी, अशा समजुतीनें त्याचा अजहत् ह्मणजे अत्याग कर, असा जहदाजहल्लक्षणेचा ह्मणजे भागलक्षणेचा बोधांत आहे. असो. हा ज्ञानकांडाचा विशेष विचार झाला. वरील तीन्ही कांडांचा विचार श्रीलक्ष्मीनारायणचरणारविंदीं अर्पण असो.

**समाप्त.**